# ५ इतिहास लेखनशास्त्राचे विविध प्रवाह


५:१ साम्राज्यवादी इतिहास लेखन
५.२ राष्ट्रवादी इतिहास लेखन
५.३ मार्क्सवादी इतिहास लेखन
५.४ वंचितांचे इतिहास लेखन


## ५:१ साम्राज्यवादी इतिहास लेखन

**पार्श्वभूमी :** इतिहास म्हणजे सनावल्या, इतिहास म्हणजे राजाची गोष्ट किंवा इतिहास म्हणजे गतकालीन राजकारण या कल्पना आता बदलून इतिहास म्हणजे काय? या मूलभूत प्रश्नाच्या विचाराला तात्वीक बैठक येऊ लागली आहे.

इतिहास ही मानवी जीवनाची सर्वांगीण कथा आहे. वेगवेगळ्या इतिहासकारांनी केलेल्या इतिहासाच्या व्याख्या आपण पहिल्या प्रकरणात पाहिल्या त्यातील महत्वाच्या म्हणजे सर्व इतिहास केवळ घटना वर्णन नाही तर ते विश्लेषण असते. वादग्रस्त घटितांच्या गराने वाढलेला अन्वयार्थाचा गाभा म्हणजे इतिहास ई. एच. कार यांच्या मते इतिहास म्हणजे भूतकाळ आणि वर्तमान काळ यांच्यात सातत्याने चाललेला तो एक संवाद असतो. एका विशिष्ठ तात्वीक अर्थाने सर्व इतिहास समकालीन असतो. आणि इतिहास लिहीणे हाच इतिहास घडविण्याचा मार्ग असतो.

प्रत्येक क्रियेमागे, घटनेमागे काही एक विचार असतो. घटितांचा अभ्यास म्हणजे त्या विचारांचा अभ्यास अशा विचारांना त्या काळातील विचार प्रणाली व भौतीक परिस्थितीने प्रेरित केलेले असते. अर्थात कोणताही सिद्धांत स्वतःहून इतिहासाला सामोरा जात नाही. तर तो ऐतिहासिक प्रश्नाच्या अन्वेषणासाठी अर्थपूर्ण प्रश्न आणि भाषा देतो. याचाच अर्थ इतिहास लेखनाची प्रक्रिया ही वर्तमानाच्या संदर्भातच तपासावी लागते. त्या काळावर प्रभुत्व असणाऱ्या मूल्यांच्या संदर्भातच इतिहास लेखनाची प्रक्रिया गतिमान होऊ शकते. इतिहास म्हणजे श्रेष्ठ व्यक्तीची चरित्रे समाज मनाची कथा नैतीकमूल्यांचे स्पष्टीकरण व संग्रह, घटनांची शृखंला अश्या विविध प्रकारे इतिहासाच्या व्याख्या करण्याचा प्रयत्न झाला. रँकेने कागदपत्र नाही तर इतिहासच नाही असा वस्तुनिष्ठ



Scanned with ACE Scanner

दृष्टिकोन स्विकारला. औद्योगिक क्रांतीच्या १ ल्या टप्यानंतर मार्क्स एंगल्सने आर्थिक दृष्टिकोन ठेवून ऐतिहासिक घटनांचा आर्थिक दृष्टिकोनातून अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला. इतिहासाचे वर्गीय दृष्टीकोनातून मूल्यामापन केले. (संदर्भ - अब्राहमणी स्त्रीवादी इतिहास लेखनशास्त्र, संपा. - भागवत विद्युत, प्रतिमा परदेशी)

विशिष्ठ पद्धतीने इतिहासाचा विचार करण्याची सवय विशिष्ट गृहितके, पद्धती, सैद्धांतिक भूमिका यांच्या आधारे इतिहास लेखन केल्याने साम्राज्यवादी, राष्ट्रवादी, मार्क्सवादी तळागाळातील इतिहास लेखन अश्या अनेक पातळ्यांवर लेखन सुरू झाले.

इंग्रजी शिक्षणाने विकसित केलेली इतिहास लेखनाची प्रारूपे वसाहत काळात पुढे आली. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धापासून शिक्षित भारतीयांचे इतिहास लेखन सुरू झाले. इतिहास हे सांस्कृतिक वर्चस्व निर्माण करण्याचे साधन झाले. मागास, स्थितीशील, पौर्वात्य समाज विरूद्ध गतिशील ख्रिश्चन आणि शास्त्रीय पाश्चात्य समाज असे सरळ दोन गटांमध्ये समीकरण झाले.

ब्रिटीशांनी वसाहतवादाच्या गरजेतून भारताच्या इतिहास व संस्कृतीची ज्ञान सामुग्री पुढे आणली. तिची मीमांसा केली. प्राच्याविद्या विशारद ब्रिटीश उपयुक्ततावादी आणि ख्रिश्चन हे भारतासंबधी ज्ञान सामग्री पुढे आणणारे तीन प्रवाह आहेत.

औद्योगिक क्रांतीनंतर युरोपात चाललेल्या उलथापालथीच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या गूढरम्य वृत्तीमधून प्राचीनता हा इतिहास व संस्कृतीच्या गौरवाचा निकष मानून भारताच्या इतिहास व संस्कृतीच्या ठायी प्राच्य विद्याविशारदांनी हा गौरव चिकटवला. गतकाळाचे वैभव शोधण्याच्या गरजेतून भारतीय बुद्धीजीवीच्या केंद्रस्थानी इतिहास आला.

१९ व्या शतकात अध्यापन शास्त्रात इतिहासाचे महत्व वाढले. युरोपीयन सत्तेच्या भारतातील व्यापार व अन्य उदयोगाने भारतीय इतिहास लेखनास निरनिराळ्या प्रकारचे वळण व दिशा मिळाली. व्हॉल्टेअर व गिबनच्या काळापासून युरोपियन इतिहास लेखनाची एक स्वतंत्र परंपरा निर्माण झाली होती. धार्मिक व भौतिक इतिहास लेखन मागे पडून त्याची जागा बुद्धीप्रामाण्यवाद व शास्त्रोक्त अश्या सिद्धांतानी घेतलेली होती. युरोपीयनांच्या आगमनाने भारतीयांच्या इतिहास लेखनात आमूलाग्र परिवर्तन झाले. हे परिवर्तन दृष्टीकोन, विषयाची हात मिळवणी, लेखनतंत्र ह्या बाबतीत लक्षणीय



Scanned with ACE Scanner

होते. युरोपीयनांनी प्रचंड इतिहास लेखन केले. त्याचा प्रभाव भारतीय इतिहास लेखनपद्धतीवरही पडलेला दिसतो.

१८ व्या शतकाच्या उत्तरार्धात आधुनिक भारतीय इतिहास लेखनाला सुरूवात झाली. १७५७ च्या प्लासीच्या युद्धाने भारतात ब्रिटीश सत्ता स्थिर झाली. यानंतर १८५७ पर्यंत त्यांनी भारतात सत्ताविस्तारचेच धोरण आखले. सत्ता विस्तारावरोबरच ब्रिटीशांनी प्रशासन यंत्रणेचीही उभारणी केली. हजारो मैल दूर असलेल्या राष्ट्रावर राजकीय नियंत्रण प्रस्थापित करणे, तिथले प्रशासन पाहणे यासाठी ज्या पद्धतीचे प्रशासन अभिप्रेत आहे. त्याच्या योग्य अंमलबजावणीसाठी सूत्रबद्ध व योजनापूर्वक मार्गदर्शनाची आवश्यकता होती. व हे सर्व आजच्या काळासारख्या दळणवळणाच्या, आधुनिक सोयी नसल्याने पत्राद्वारेच शक्य होते. प्रत्येक धोरण कागदावर आखणे क्रमप्राप्त होते. त्यातुन राज्यधोरणाचे खलिते, चर्चा विचारविनिमय, वृतांत, गोपनीय पत्रे व पत्रव्यवहार लिहीले गेले. त्यांच्या एक प्रचंड संग्रह उदयास आला. मालक इंग्लंडला व नोकर भारतात त्यामुळे नोकरांबद्दल संशय व शंका मालकांच्या मनात असल्याने अत्यंत काळजीपूर्वक मार्गदर्शन व सूचना पाठविल्या जात. अहवाल माहिती अगदी लहानशा खेड्यापासून ते थेट केंद्रशासनापर्यंत मागविले जात. त्यावर संचालक मंडळ आपले धोरण आखून सूचना देई. यामुळे लंडन ते भारत असा फायलींचा प्रवास सुरू झाला. हा सर्व पत्रसंग्रह सध्या इंडिया ऑफीसमध्ये जतन करण्यात आलेला आहे. त्यामुळे ब्रिटीशांच्या भारतातील अंतर्गत धोरणामागची मानसिकता समजून येते. ही भूमिका पूर्णपणे साम्राज्यवादी होती. ब्रिटीशांमुळे सामाजिक-धार्मिक जीवनात परिवर्तन झाले हे खरे पण त्याचबरोबर त्यांच्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था धोक्यात आली. भारतीयांचे आर्थिक शोषण ते सातत्याने करीत राहिले. १८५८ नंतर भारत ह्या साम्राज्यवादी ब्रिटीशांच्या हातचे खेळणे बनला व त्यांनी जागतिक प्रभुत्वासाठी ह्या वसाहतीचा दुरूपयोग केला. त्याला भारतीयांनी राष्ट्रीयसभे मार्फत विरोध केला. ह्यातून ब्रिटिश व भारतीय यांच्यातील स्वातंत्र्ययुद्धाचा इतिहास निर्माण झाला. ह्या पत्रव्यवहारात हा वृत्तांत पहायला मिळतो. आधुनिक भारताच्या इतिहास लेखनाची ही ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे.

भारतात ब्रिटीश सत्ता प्रस्थापित होण्याच्या सुमारास बुद्धीप्रामाण्यवादी सिद्धांतवादी लिखाणाला बोधप्रद इतिहास लेखनाची परंपरा निर्माण होऊ लागली होती. इतिहास घडवीत असतानाच इतिहास लेखनाची परंपराही निर्माण होऊ



Scanned with ACE Scanner

पहात होती. शिपाई, व्यापारी, प्रशासक एक ठाम इतिहासाची भूमिका घेऊन बोधप्रद लेखन करीत व प्रशासकांना मार्गदर्शन करीत इंग्लड, फ्रान्स व हॉलंडमध्ये सनातनी व उदारमतवादी असे दोन पंथ ह्या काळात उदयास आले. ह्या युरोपीयन सत्तांना राजकीय सत्तासूत्रे ही आपल्याच हातात हवी होती. तरी त्यांची प्रशासन पद्धती ध्येये-धोरणे मात्र निराळी होती. जेम्समिल व त्याचा पंथ उपयुक्ततावादी धोरणाचा पुरस्कर्ता होता. जात, हक्क, पूर्वग्रह त्यावर आधारित भारतीय समाज पूर्णपणे बदलावयाचा झाल्यास त्यावर उपकारक हुकूमशाही शासनाचीच गरज आहे. त्यासाठी कायदा व भक्कम प्रशासन हाच योग्य मार्ग असल्याचे ह्या पंथाचे ठाम मत होते. तर दुसरा पंथ सरविल्यम जोन्स, कॅनिंग हॅम, विल्कीस, मन्रो, माल्कम व एलफिन्स्टन ह्यांचा होता. त्यांना भारतीय व त्याची जीवनपद्धती, समाजरचना ह्याविषयी आदरयुक्त सहानभूती होती. त्यामुळे ते त्याच दृष्टीकोनाचा पुरस्कार करीत होते. सर जॉन शोअर व ग्रँट डफ सारखे धर्माधिष्ठित दृष्टीकोन असणारे तिसऱ्या वर्गातील अधिकारी शिक्षण व धर्म प्रसाराच्या माध्यमातून प्रशासनाकडे पहात होते. त्यांना ब्रिटीश सत्ता ईश्वरी संकेत व परमेश्वराची इच्छा वाटते व त्याच मुद्यावर त्याचे ते समर्थनही करतात. त्यामुळे त्यांना भारतीयांच्या परिवर्तनासाठी धर्मातर हा एकच मार्ग दिसतो. ४थ्या गटात आल्फ्रेड लायर हेन्री, मेन व विल्यम हंटर सारखे विद्वान पूर्व व पश्चिम विचारसरणीचा संयोग भारतात पहातात. त्याच भूमिकेतून त्यानी भारतातील आचार विचार संस्थाचा मोठ्या आत्मीयतेने अभ्यास केला. शेवटी आधुनिक पद्धतीने अभ्यास करणारे पाचव्या गटात मोडतात. त्यात पी. ई. रॉबर्टस् , पर्सिव्हल स्पीयर, सी. एच. फिलीप्स, होलन कर्बर, बॉल हॅचेट व इतर रँके पद्धतीने साधन सामुग्रीची सखोल तपासणी करून त्यावर आधारित वस्तुनिष्ठ इतिहास लेखनाचा आग्रह धरतात. एकूणच प्रा. एम. ए. कुलकर्णी यांच्या मते ''तात्वीक सैद्धांतिक अश्या ह्या बौद्धीक संघर्षामध्ये सरशीच्या रस्सीखेचीत भारतीय इतिहास आकार घेत होता. त्यामध्ये भारतीय इतिहासकार उशीरा उतरले. सुरूवातीस वर्णनात्मक व निवेदनात्मक पद्धतीने त्यांनी इतिहास लेखन केले. त्यात अर्थ अन्वयार्थ नव्हता. परंतू राजाराममोहन रॉय यांच्यापासून भारतात प्रबोधनाला सुरूवात झाली त्यांनी पाश्चात्य तंत्र पद्धती वापरून इतिहास लेखनाला सुरूवात केली व त्यातून त्यांना ज्ञात झाले की कंपनीच्या उद्योगात आपला इतिहास नाही तर ब्रिटीश राज्यकर्त्यांची धोरणे - साम्राज्यवादी उद्योग ह्याचा अभ्यास त्यांनी सुरू केला.



Scanned with ACE Scanner

राष्ट्रीय दृष्टीकोनाचा पुरस्कार केला. ह्यातून भारतीय इतिहास लेखन आकाराला आले. यामध्ये साम्राज्यवादी, राष्ट्रवादी, मार्क्सवादी व आणि नव्याने उदयास आलेला सबाल्टर्नवादी असे वेगवेगळे इतिहास लेखनाचे प्रवाह यातून उदयास आले.

यातला १ ला प्रवाह ''प्राच्यविद्या विशारदांचा'' (Orientalist Trends) होता. ज्या प्रदेशावर आपण राज्य करतो या लोकांचा - स्थानिक - इतिहास आपणाला माहिती पाहिजे व तो जाणून घेण्यासाठी त्या देशातील साहित्याचा अभ्यास करावा लागेल याची ब्रिटीशांना जाणीव होती. भारताचा सांस्कृतिक ठेवा व्यापक समृद्ध होता. परकीय राज्यकर्त्यांना, प्रशासकांना या ऐतिहासिक वस्तू वास्तू, ग्रंथ यांचे फार मोठे आकर्षण वाटले. या विविध वस्तू, वास्तू व ग्रंथाचा अभ्यास करावा असे त्यांना वाटले त्याच प्रमाणे काही सुशिक्षित भारतीयांनाही प्राचीन वस्तू वास्तू व ग्रंथाचा अभ्यास करावा असे वाटले. प्राचीन भारतातील शिलालेख, ताम्रपट, नाणी, दानपत्रे, हस्तलिखिते पोथ्या, मंदिरे व मूर्ती, बौद्ध लेण्या, भांडी, अलंकार लिपी, साहित्य, तत्वज्ञान, प्राचीन शहरे इत्यादीचा अभ्यास करणाऱ्या व्यक्तीला प्राच्य विद्या विशारद (Oriertalist) असे म्हणतात.

'प्राच्यविद्या' हा भारतीय इतिहास लेखनातील एक महत्त्वाचा प्रवाह आहे. विल्यम जोन्स, जेम्स प्रिन्सेप, चार्लस विल्किन्सन, सर जॉन मार्शल, अलेक्झाडंर कॅनिंगहॅम, एलफिन्स्टन, मॅक्समुल्लर, हे पाश्चात्य प्राच्यविद्या विशारद होते. तर डॉ. भाऊ दाजी लाड, राजेंद्रलाल मित्र, राखालदास बंडोपाध्याय, भांडारकर आर. डी., के. टी. तेलंग, पी. व्ही. काणे, आर. डी. बॅनर्जी, दयाराम साहनी सर मार्टिमर व्हिलर हे भारतीय प्राच्यविद्या विशारद आहेत.

## साम्राज्यवादी इतिहास लेखन प्रवाह

साम्राज्यवादी इतिहासकार भारतातील आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेला इंग्रज राज्यकर्त्यांनी, नोकरदारांनी व भांडवलदारांनी पुढाकार घेऊन कशी चालना दिली यांचे वर्णन व विश्लेषण करतात. १८५७ च्या उठावास ब्रिटीश साम्राज्यवादी **शिपायांचे बंड** म्हणतात. तर राष्ट्रवादी त्याला **भारतीय स्वातंत्र्याचा पहिला संग्राम म्हणतात.** वसाहतवादी किंवा साम्राज्यवादी ब्रिटीशांनी भारतीयांचे आर्थिक शोषण केले. या वास्तवतेकडे दुर्लक्ष करतात. ब्रिटीशांमुळेच भारतीय समाजाला आधुनिक ज्ञान - विज्ञान तंत्रनाज्ञाची ओळख, झाली असा युक्तीवाद



Scanned with ACE Scanner

करतात. पण खरेतर ब्रिटीश येण्यापूर्वीच बदलाची सुरूवात झाली होती. भारतीय बदलास सज्ज झाले होते असे काही नव संशोधक म्हणतात.

आर. सी. मुजुमदार साम्राज्यवादी इतिहास लेखनाच्या संदर्भात म्हणतात, ब्रिटीश इतिहासकारांनी इतिहास लेखनात साम्राज्यवादाचे भूत निर्माण केले. हे भूत भारतीयांच्या मनावर फार पक्के बसले. या त्यांच्या लेखनात सत्यार्थ कमी असून शुद्ध खोटेपणा व भंपकपणा मोठ्या प्रमाणात आहे. त्यांनी अनेक ठिकाणी पुराव्याचे विकृतीकरण केले आहे. त्यांनी नेहमीच पूर्ण सत्य सांगितले नाही. म्हणूनच हा इतिहास जो ब्रिटीशांनी लिहून ठेवला तो परिपूर्ण नाही.

जेम्समिल, पीटर, ओबर, जॉन कॅपर, सरजॉन सिले मूरलँड, किंकेड सी. ए., व्हर्नी लव्हेट, जॉन माल्कम एडवर्ड थॉर्नटन, विल्यम हंटर, जॉन मार्शयन, व्हॅलेनटाईन, चिरोल, व्हि. ए. स्मिथ, माऊंट स्टुअर्ट, एलफिन्स्टन, जॉन के, एडवर्ड थॉमसन, जॉन गॅरेट, थॉमस मेकॉले, इलियट डाऊसन, लॉर्ड मेकॉले, रॉबर्ट आर्म हे सर्व पाश्चात्य. त्यातले काही भारतात राहून साम्राज्यवादी इतिहास लेखन करीत होते. यातील काही इतिहासकारांच्या इतिहास लेखनशैलीचा अभ्यास आपण प्रातिनिधिक स्वरूपात करणार आहोत. साम्राज्यवादी इतिहास लेखनाची सर्व वैशिष्ठ्ये त्यांच्या इतिहास लेखनात दिसतात.

**साम्राज्यवादी इतिहासकार**

**१) जेम्स मिल** (१७७३ ते १८३६ ) १८ व्या शतकात इंग्लड मध्ये जॉन स्टुअर्ट मिल हा श्रेष्ठ विचारवंत होऊन गेला इंग्लड मध्ये १८ व्या शतकात जेन्री बेन्थॅम याने उपयुक्तवादाचा सिद्धांत मांडला. मिल हा या वादाचा प्रवक्ता होता. तो ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीमध्ये नोकरी करीत होता. कंपनीच्या कारभारावर त्याचा प्रभाव होता. त्यामुळे ईस्ट इंडिया कंपनीची अनेक सरकारी कागदपत्रे त्याला जवळून पाहता आली. त्याने कागदपत्रांच्या आधारे वयाच्या ३३ व्या वर्षी History of British India हा ग्रंथ लिहीला. पुढच्या १२ वर्षात या ग्रंथाचे वेगवेगळे भाग प्रसिद्ध झाले. १९ व्या शतकात ज्या लेखकांनी भारताचा इतिहास लिहीला त्या लेखकांनी मिलचा ग्रंथ आधारभूत मानला. प्रत्यक्ष भारतात न येताही त्याने सहा खंडचा हा आपला ग्रंथ लिहीला १८०६ ला हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. त्याच्या लिखाणाने मोठा वाद निर्माण केला पण त्याचा प्रभावही तेवढा प्रचंड होता. हिंदू व मुस्लीम इतिहास संकल्पना, प्रशासनपद्धती यांच्या तुलनेत ब्रिटीशांची प्रशासन प्रणाली खचितच चांगली आहे. येथील



Scanned with ACE Scanner

व्यवहार, रितीरिवाज बदलण्यासाठी कायदा व शिक्षण हे महत्वाचे साधन तो मानतो. उपयुक्ततावादी कायदा महत्वाचा मानीत म्हणून मिलने सर्वत्र कायद्याचे राज्य स्थापण्यावर भर दिला. कायदा व न्याय यावर आधारित शासन देण्याऐवजी मिलने कायदा व सुव्यवस्था यावर लक्ष केंद्रीत केले. पूर्वीच्या राजवटींना विशेषतः हिंदूना या संदर्भात अपयश आले. कारण त्यांची समाज रचना असमतेवर आधारित होती. अशी मांडणी त्याने आपल्या ग्रंथात केली. ही मांडणी विद्वानांच्या जगात गोंधळ उडवून देणारी ठरली. कारण ह्याचवेळी प्राच्यविद्यावाले विल्यम जोन्स सारखे संशोधक भारतीय संस्कृती उच्च कोटीची होती असे म्हणत होते. कोलब्रुक, विलकीन्स, प्रिन्सेप यांनी जोन्सची विचारसरणी उचलून धरली होती. त्यामुळेच वादविवादास सुरूवात झाली. मिलने आपला ग्रंथ रॉबर्ट ओर्मेच्या इतिहासाच्या आधारावर लिहीलेला आहे. वास्तविक ओर्मेने भारतातील लष्करी सत्तांतरावर भर दिलेला आहे. बुचनन, टेलर, दुबोईस यांच्या ग्रंथाचे वाचन करून मिलने स्वतःच्या विधानांना दृष्टी व भक्कमपणा आणण्यासाठी त्यांच्या अहवालात मनाजोगे बदल करून भारताचा इतिहास लिहीला. भारतात न येता इथली संस्कृती, जीवन पद्धती, संस्कृत भाषा आत्मसात न करता मिलने हा ग्रंथ लिहील्याने त्यांच्या इतिहास लेखनाला गंभीर मर्यादा पडतात. त्याचे सर्व सिद्धांत पटण्यासारखे नाहीत. तरीही त्याने लिहीलेल्या इतिहासाला फारच महत्व आहे. मिलचा इतिहास विजेत्यांनी पराभूतांचा लिहीलेला इतिहास असला, एकांगी, दोषपूर्ण असूनही भारताकडे येणाऱ्या सर्वांचा आधार ठरलेला होता. मिलने ह्या दृष्टीकोनाचा वापर भारतातील ब्रिटीश प्रशासनास घडविण्यासाठी केला आहे.

**जेम्समिलच्या इतिहास लेखनाचे मूल्यमापन. डकान फोर्बेस** (द केंब्रीज जर्नलचा कर्ता) हा मिलच्या लिखाणावर टीका करताना म्हणतो की, ''बेन्थमच्या विचाराचा प्रसार व प्रचार करण्यासाठी मिलने हा ग्रंथ लिहीला. भारतीय संस्कृती ही युरोपीयन संस्कृतीपेक्षा निष्कृष्ट दर्जाची आहे या आधारावर त्याचे लिखाण अवलंबून होते. हिंदी लोकांविषयी पूर्वग्रह दूषित वृत्ती, आपल्याला आवश्यक वाटणारे पुरावे गृहीत धरणे, बाकीचे सोडून देणे या साम्राज्यवादी भूमिकेतून मिलने लिखाण केले. प्रो. विल्सन यांच्या मते अपरिपक्व आणि हिंदु विरोधी भावनांवर आधारित मिलचे लिखाण आहे, तर डॉ. आर. सी. मुजुमदार म्हणतात ''मिलच्या ग्रंथात अनेक दोष असले तरी त्याचे गुण सुद्धा श्रेष्ठ आहेत. इतिहास लेखनशास्त्राचे ज्ञान असणारा इतिहासकार असे मिलला म्हणतात.



Scanned with ACE Scanner

एलफिन्स्टनच्या मते मिलचा इतिहास उत्कृष्ट आहे, पण तो दिशाभूल करणारा आहे. ग्रँट डफच्या मते उणे शोधण्याची प्रवृत्ती, प्रतिभेचा पूर्ण अभाव, भारतीय मूल्ये व येथील सामाजिक जीवनाच्या सामान्यज्ञानाचा अभाव हे मिलच्या इतिहासातील दोष होते. लॉर्ड मेकॉले म्हणतो. On the whole the greatest Historical work which has appeared in our language since that of Gibban जॉन स्टुअर्ट मिलच्या मते " one of the most instructive histories ever written." प्रो. गूचच्या मते - व्यापक विश्लेषणात्मक माहिती हे मिलच्या इतिहासाचे वैशिष्ट्य आहे. त्यामुळे समकालीन लेखकात त्याला वरची श्रेणी प्राप्त होऊन इंडिया हाऊस मध्ये वरचा दर्जा मिळाला.

**११) जेम्स कॅनिंगहॅम ग्रँटडफ** - जेम्स कनिंगहॅम ग्रँट डफ हा ईस्ट इंडिया कंपनीच्या लष्करातील कप्तान या हुद्यावर होता पुढे त्याने सातारा छत्रपती प्रतापसिंहाच्या दरबारात वकिल म्हणून व साताऱ्याचा पहिला कलेक्टर म्हणून काम केले. सातारा येथे असतानाच त्याने मराठ्यांच्या इतिहासाची साधने जमविली. मराठ्यांच्या इतिहासाचा कच्चा मसुदा तयार केला. तो एलफिन्स्टन व्रिग्ज वैगरेकडून तपासून घेतला. मराठ्यांचा इतिहास सुसंगतपणे लोकांसमोर विशेषतः युरोपीय वाचकांसमोर मांडवा या हेतुने प्रेरित होऊन त्याने इतिहास लेखनास प्रारंभ केला. त्याने ही कल्पना एलफिन्स्टन जवळ मांडली. एलफिन्स्टनला मराठ्यांच्या इतिहासाची बरीच माहिती होती. एलफिन्स्टनलाच स्वतःला खरेतर मराठ्यांचा इतिहास लिहायचा होता. पण प्रचंड कामामुळे त्याला सवड नव्हती. त्याने डफला प्रोत्साहन दिले. अनेक उपयुक्त सूचना केल्या. इतिहास लेखन करताना कोणती प्राथमिक व दुय्यम साधने आहेत. तसेच फारसी साधने याबद्दल माहिती देऊन प्रौढ व अलंकारिक भाषा वापरू नये. असेही सुचविले. त्याला मुंबईच्या कागदपत्रांचे रेकॉर्डही उपलब्ध करून दिले. डफला मराठी भाषेचे ज्ञान होते. त्याने प्रामुख्याने बखरींचा उपयोग इतिहास लेखनासाठी करून घेतला डफला संभाजी ते शाहूच्या काळातील कागदपत्रे मिळाली नाहीत. झुल्फीकार खानाने रायगड घेतला तेव्हा ती नष्ट झाली असावीत डफने फारसी साधनांचा वापर इतिहास लेखनासाठी केलेला दिसतो. डफचा ग्रंथ प्रकाशित करण्यास कोणी प्रकाशक तयार होईना. जे कोणी तयार होत होते. त्यांना या ग्रंथाचे नाव बदलून राईज ऑफ ब्रिटीश पॉवर इन इंडिया असे नाव द्यावे असे वाटत होते. पण तो प्रस्ताव डफला मान्य नव्हता. सरतेशेवटी स्वखर्चाने डफने आपला ''हिस्ट्री ऑफ दि मराठाज्'' हा तीन



Scanned with ACE Scanner

खंडातील इतिहास १८२४ मध्ये प्रकाशित केला. पहिला प्रयत्न म्हणून डफचा इतिहास लेखन प्रयत्न कितीही कौतुकास्पद असला तरी त्याच्या लेखनात साम्राज्यवादी दृष्टीकोन स्पष्टपणे जाणवतो. डफच्या या ग्रंथाच्या छपाईचे काम इंग्लडमधील लॉंगमन या कंपनीने अवघ्या आठ आठवड्यात केले. छापाईसाठी २०० पौंड खर्च आला. डफला ३०० पौंड मानधन मिळाले. १९२१ पर्यंत या ग्रंथाच्या सहा आवृत्त्या निघाल्या. सहावी आवृत्ती ऑक्सफर्ड युनिर्व्हसिटी प्रेसने एस. एम. एडवर्ड यांच्या प्रस्तावनेसह प्रसिद्ध केली.

**डफच्या लिखाणाची विभागणी** - डफने पहिल्या १०० पानात दक्षिण देशाचा इ. सन १००० पासूनचा इतिहास दिलेला आहे. यामध्ये बहामनी राजे, मराठा सरदार व शिवपूर्वकाल यांचा समावेश आहे.

१०१ ते ३११ मध्ये औरंगजेबाच्या मृत्यूपर्यंतचा इतिहास आहे. तर पुढील ८०० पानांमध्ये १८ व्या शतकाचा इतिहास दिला आहे. तर १९ व्या शतकामधील इतिहासासाठी डफने २३४ पाने लिहीली आहेत. खरेतर या ग्रंथाचे नाव ''Down fall of the Mugnal and the rise of the English असे ठेवायला हवे होते. परंतु ग्रँट डफ History of the Marathas या नावावर ठाम होता.

डफने मराठ्यांचा इतिहास लिहीला. त्यामुळे मराठ्यांच्या अस्मितेला धक्का बसला. त्याच्या लिखाणावर सर्वच स्तरातून टीका झाली ह्या टीकेचा मतितार्थ असा होता :

**१) मल्हार रामराव चिटणीस याच्या बखरीवर आधारित इतिहास डफने लिहीला. पण मूळातच ही बखर चिटणीसाने १८१० मध्ये लिहीली असल्याने उत्तरकालीन बखरीतील सर्व दोष त्यात आहेत.**

**२) डफच्या लिखाणात अनेक उणीवा आहेत.**

**३) घटनाक्रम चुकीचा आहे.**

**४) नावांमध्ये गोंधळ आहे.**

**५) अनेक महत्त्वपूर्ण प्रसंग डफने वगळले आहेत.**

**६) डफने वस्तुनिष्ठ इतिहास लिहीला नाही.**

**७) डफचा इतिहास साम्राज्यवादी दृष्टीकोनातून लिहून इंग्रजाच्या पदरात झुकते माप टाकणारा होता.**

या सर्व गोष्टीमुळे डफच्या इतिहासावर पुरेपुर टीका झाली.

डफच्या इतिहासावर पहिला हल्ला १८६८ साली डेक्कन कॉलेजात शिकणाऱ्या नीलकंठ जनार्दन कीर्तने नावाच्या एका विद्यार्थ्याने केला. त्यांनी



Scanned with ACE Scanner

त्यासाठी ५४ पानी निबंध लिहीला. किर्तन्यांच्या टीकात्मक निबंधामुळे मराठी भाषिकांनी या ग्रंथाकडे अधिकच विवेचक दृष्टीने पाहिले, त्यातील गुणदोषांची चर्चा केली. किर्तने असे म्हणतात की ''**डफचा इतिहास हा मराठ्यांच्या मोहिमांचा इतिहास आहे. ग्रँट डफने महाराष्ट्राची वसाहत केव्हा झाली. भोसले, पवार आणि शहाजीचे वर्णन लिहिले नाही. डफ शिवाजीची प्रजा अतिदरिद्री होती असे म्हणतो. त्याला कीर्तने यांनी विरोध केला आहे. कल्याणच्या सुभेदाराची हकीकत आणि बाळाजी विश्वनाथाची कार्मागिरी डफ लिहीत नाही.**

वि. का. राजवाडे यांनी मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड ८ मध्ये ग्रँट डफच्या लिखाणातील दोष मांडले ते म्हणतात.

१) **ग्रँट डफच्या इतिहासातील कित्येक सन बरोबर नाहीत.**
२) **ग्रँट डफच्या इतिहासातील मजकूर त्रोटक व तुटक आहेत.**
३) **बखरीत दिलेल्या कित्येक मजकुराचा आपल्या लिखणात त्याला उपयोग करून घेता आला नाही.**
४) **अस्सल पत्रांचा जितक्या तारतम्याने उपयोग करून घ्यावा तितका त्याने करून घेतला नाही.**

**न्यायमूर्ती रानडे** यांनीही ग्रँट डफच्या या ग्रंथाची नोंद घेऊन १८९४ मध्ये पुण्यात वसंत व्याख्यान मालेतील व्याख्यानात आपली भूमिका मांडली. ''मराठी सत्तेच्या उदय म्हणजे सहयाद्रीच्या डोंगरात अचानक पेटलेला वणवा होय'' मत त्यांनी अमान्य केले. **मराठी सत्तेचा उदय ही एक सूत्रबद्ध योजना होती.** हा विचार रानडे यांनी मांडला. डफने मराठ्यांना चोर, लुटारू असे म्हटले होते. हा युक्तीवाद कसा चुकीचा आहे हे न्या. रानडेनी मांडले. डफच्या ग्रंथाला उत्तर देण्यासाठीच न्या. रानडे यांनी Rise of the Maratha Power हा ग्रंथ लिहीला होता. ग्रँट डफचा मराठ्यांविषयी जो एक गैरसमज झाला तो दूर करण्याचा व मराठ्यांच्या इतिहासाचे नेमके सूत्र शब्दबद्ध करण्याचा यशस्वी प्रयत्न न्या. रानडे यांनी केला.

**वासुदेव शास्त्री खरे म्हणतात** - नाव, तारखा, ठिकाणे याबाबत डफच्या इतिहासात अनेक चुका आहेत. माधवराव पेशवा कृष्णेच्या पलिकडे गेला नाही हे डफचे विधान चुकीचे आहे.

**रियासतकार सरदेसाई म्हणतात**- डफ हा एक कच्चा अधिकारी होता, तर **सर जदुनाथ सरकारांनी** - डफने वापरलेल्या संदर्भ साधनांवर टीका



Scanned with ACE Scanner

केली आहे. डफच्या या लिखाणावर विविध नामांकित इतिहासकारांनी जरी टीका केली असली तरी तो ग्रंथ दुय्यम दर्जाचा व अविश्वसनीय आहे असे म्हणता येत नाही. **विष्णूशास्त्री चिपळूणकरांनी निबंधमालेतील इतिहास या आपल्या निबंधात ग्रँटडफच्या भगिरथ प्रयत्नांचे कौतुक केले आहे.** डफने सनदी आणि लष्करी सेवेत कार्य करण्यास अनेक वर्षे घालविल्याने इतिहास लेखनास आवश्यक ते शांततापूर्ण वातावरण इंग्रजी सत्ता भारतात स्थिर होण्याच्या धामधुमीच्या काळात त्याला मिळाले नाही. मराठी नावे इंग्रजांना उच्चार करण्यास कठीण असून कुशल लेखकाला सुद्धा या नावाचा संभ्रम पडतो. ग्रँट डफवर ग्रंथ लिहीणारे मराठ्यांच्या इतिहासाचे **प्रसिद्ध संशोधक डॉ. अ. रा. कुलकर्णी असे म्हणतात की ''ग्रँटने केलेले पत्रव्यवहार पाहताना आणि त्याने लिहीलेल्या तळटीपा पाहिल्यावर त्याचा इतिहास खोटा आहे असे म्हणणे किंवा तो साधारण आहे असे म्हणणे धाडसाचे होईल.**

थोडक्यात मराठ्यांना भारतीय इतिहासात मानाचे स्थान देणारा व त्यांच्या कर्तृत्वास इंग्रजी भाषेतून जगासमोर ठेवणारा डफ हा पहिला इतिहासकार होय. डफ हा मराठ्यांचा आद्य इतिहासकार आहे.

**३) व्हिसेंट स्मिथ** - साम्राज्यवादी दृष्टीकोनातून भारतीय इतिहासाचे परिशीलन करणारांमध्ये व्हिन्सेंट स्मिथ अग्रभागी आहे त्याने ऑक्सफर्ड ''हिस्ट्री ऑफ इंडिया'' हा ग्रंथ इ. सन १९९९ मध्ये प्रकाशित केला. भारतीय इतिहासाचे समग्र चित्र ह्या ग्रंथात त्याने मांडले आहे. भारतीयांना इतिहासाचे भान व ज्ञान नाही असे तो वारंवार म्हणतो. भारतीयांकडे सामान्यजनांना सांगण्यासारखा इतिहास नाही. संस्था संकल्पनांचे विश्व नाही. विध्वसंक शक्तीपुढे त्यांचा टिकाव लागणे अशक्यच आहे. त्यामूळे परस्परांत संघर्ष करणाऱ्या छोट्या छोट्या राज्यांचा उदय झाला. शक्तीशाली अशा मध्यवर्ती सत्तेच्या नियंत्रणातून सुटल्याबरोबर भारताचे तुकडे तुकडे झालेले आहेत. १९०९ मध्ये विद्यार्थ्यांसाठी लिहीलेल्या त्याच्या ग्रंथात त्याच्या साम्राज्यवादी वृत्तीचे मर्मज्ञ दर्शन घडते. तो म्हणतो ''इतिहासापासून धडा घ्यायचा असतो. तो म्हणतो ब्रिटिश साम्राज्याच्या प्रगतीमध्ये शांतता सुबत्ततेमध्ये आपण सुखी समाधानी आहोत हेच शिकायचे असते. ब्रिटीश राजवटीचा तो कट्टर पुरस्कर्ता होता. वस्तुनिष्ठ असल्याचा दावा करणारा स्मिथ पूर्वग्रहाचा बळी होता स्मिथ अकबर बादशहाला परकीयच मानतो. विभिन्नतेमध्ये एकता हा प्रकार पूर्णपणे हिंदू मनोवृत्तीचा प्रकार आहे. भारत हा पूर्णपणे हिंदूचा देश आहे. येथे



Scanned with ACE Scanner

मुस्लीमांना भारतीय जनतेमधील एक असे फारसे वाटत नाही हे स्मिथ याचे मत मोर्ले मिंटो सुधारणांच्या पार्श्वभूमी वर लक्षणीय ठरते.

स्मिथची ग्रंथ संपदा विपुल आहे त्यातील निवडक पुढीलप्रमाणे -

१) आंध्र इतिहास आणि नाणी

२) प्रिंपावा स्तूप

३) मॉंटेग्यु चेम्सफर्ड आणि भारतीय सुधारणा याचे टीकात्मक परीक्षण

४) भारतीय गॅझेटीयर

५) गुप्तपूर्व नाणी

६) ग्रीक आणि रोमन संस्कृतीचा प्राचीन भारतीय संस्कृतीवरील प्रभाव

७) समुद्रगुप्त

८) इंडो- पाशिर्यन घराणे

९) उत्तर भारतातील शक

१०) कनोजचा इतिहास

११) अशोकाचा स्तंभ

१२) अशोक आणि भारतातील बौद्ध साम्राज्य

१३) भारताचा प्राचीन इतिहास

१४) अकबर दि ग्रेट

१५) ऑक्सफर्ड हिस्ट्रीं ऑफ इंडिया

स्मिथने अशोकाच्या शिलालेखांचे केलेले भाषांतर तसेच बौद्ध धर्माविषयीचे मुद्दे त्याच्या अशोकाच्या ग्रंथात त्याने दिलेले असल्याने अनेक विद्धान लेकांना या ग्रंथाने अशोकाचा अभ्यास करण्यासाठी उद्युक्त केले गेले. त्याच्या नाणेशास्त्राच्या ग्रंथात त्याने अनेक नाण्यांविषयी माहिती दिल्याने नाणे शास्त्राच्या अभ्यासाच्या दृष्टीने हा ग्रंथ फारच उपयुक्त आहे.

भारतीय प्रशासनात वरिष्ठ अधिकारी असल्याने स्मिथ यांना अस्सल कागदपत्रे पहावयास मिळाली. इतिहास लेखनाबाबत त्यांचे विचार वैशिष्ठपूर्ण आहेत. मॉंटेग्यू चेम्सफर्ड सुधारणा कायद्यावर टीका करताना स्मिथ म्हणतात की ''सुधारणा करणारांनी भारतीय इतिहास लक्षात घ्यायला हवा. भारताचा राजकीय इतिहास हा येथील लोकांच्या राजकीय विचारांचा इतिहास आहे. भारतीय पुराणांबद्दल त्यांची मते अनूकूल आहेत. ऐतिहासिक घटनांचा क्रम जोडून सलग इतिहास लिहीण्याचा त्याने प्रयत्न केला.

एलफिन्स्टन व मिल यांच्यापेक्षा आपला वर्ग वेगळा आहे हे माहित



Scanned with ACE Scanner

असूनही त्यांचीच साम्राज्यवादी वृत्ती स्मिथच्याही लिखाणात दिसते.

**४) माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन** - माउंट स्टुअर्ट एलफिन्स्टन १७९६ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीच्या मुलकी सेवेत आला. नागपूरकर भोसले यांच्या दरबारात तो रेसिडेंट म्हणून होता. (१८०४ ते १८०७) १८११ साली तो पुण्याला पेशवे दरबारात रेसिडेंट होता. १८१९ ते २७ या काळात तो मुंबई प्रांताचा गव्हर्नर होता. तो उत्तम प्रशासक होता. सेवानिवृत्त होऊन मायदेशी गेल्यावर १८४१ मध्ये त्याने History of India नावाचा ग्रंथ लिहीला. हिंदी लोकांविषयी आदराची व सहानभूतीची भावना त्यांच्या मनात होती. मिल्ने हिंदी मुस्लीमांचे जे विकृत चित्र इंग्रजांपुढे उभे केले होते ते एलफिन्स्टनने नष्ट करण्याचा प्रयत्न केला. **एलफिन्स्टनला आधुनिकइतिहासकारातील टॅसीटस असे म्हणतात.** त्याने आपल्या हाताखालील अधिकाऱ्यांना इतिहास लिहीण्याची प्रेरणा दिली. ग्रँटडफ, जेम्स टॉड, विल्यम अर्स्किन यांना ग्रंथ लिहीण्यास एलफिन्स्टनने मदत केली. एलफिन्स्टनच्या सर्वच लिखाणावर साम्राज्यवादी विचारांचा प्रभाव जाणवतो.

**एलफिन्स्टनचे ग्रंथ १) हिस्टरी ऑफ इंडिया** (भाग १-२)

**२) राइज ऑफ ब्रिटिश पॉवर इन ईस्ट**

**३) अकाउंट ऑफ दि किंगडम ऑफ काबूल**

**४) रिपोर्ट ऑफ दि टेरिटोरिज कॉन्कर्ड फॉर्म दि पेशवाज्**

**५) जॉन माल्कम** - हा प्रशासकीय अधिकारी होता. त्याला अनेक प्रांतात कामे करण्याची संधी मिळाली होती. त्याने **''पॉलिटीकल हिस्टरी ऑफ इंडिया''** (१७६४ ते १८२३) हा ग्रंथ लिहीला. माल्कमच्या लिखाणात साम्राज्यवादी वृत्तीचा अभिमान प्रामुख्याने जाणवतो. इतर ब्रिटीश इतिहासकारांप्रमाणेच त्याने हिंदुस्थानातील ब्रिटीशांचे यशाबद्दल खूपच गोडवे गायले आहेत.

**६) रॉबर्ट ऑर्म** - (१७२८-१८०१) ईस्ट इंडिया कंपनीने याला आपला इतिहासकार म्हणून नेमले होते. इंडिया हाऊस मधील साधन सामुग्रीचा मुक्तपणे वापर करण्याची परवानगी दिली होती. १७८५ मध्ये **''हिस्टॉरिकल फ्रॅगमेंटस''** हा ग्रंथ त्याने प्रसिद्ध केला. ह्या ग्रंथात त्याने मुघल, मराठे व इंग्रज यांच्या इतिहासाचा परिचय करून देण्याचा प्रयत्न केला. संभाजी संबधीची ऑर्मची माहिती ही ऐकीवी स्वरूपाच्या साधनांवर आधारलेली होती संभाजी संबंधी अनेक दंतकथा त्यात आहेत. शिवाजी - संभाजी विषयी



Scanned with ACE Scanner

साधनांच्या आधारे लिहीणारा आर्म हा पहिलाच इतिहासकार होय.

**७) एम. सी. स्प्रेंगेल** - हा जर्मन विद्यापिठात प्राध्यापक होता. त्याने मराठ्यांच्या इतिहासाचा जो ग्रंथ लिहीला त्याचे "**हिस्टरी ऑफ दि मराठाज** अपटू दि लास्ट ट्रिटी वीथ इंग्लड (१७ मे १७८२) हे नाव होते. या ग्रंथाचे १७८१, १७८५, १८१४ ला पुर्नमुद्रण झाले. तो प्रशिक्षित इतिहासकार होता. मराठ्यांच्या इतिहासाचे त्याने चार भागात विभाजन केले. (१)१६३०-१६८९ (२)१६९८९ ते १७४० (३)१७४० ते १७६१ (४)१७६१-१७८५

मराठ्यांचा एक संक्षिप्त व सर्वसाधारण इतिहास लिहीणे हा त्याचा मुख्य उद्देश होता. जर्मनीत राहून त्याने इतिहास लिहीला तोही इंग्रजी साधनांच्या सहाय्याने पण त्याचा ग्रंथ ऑर्म पेक्षा निश्चितच चांगला आहे. **मराठ्यांच्या इतिहासावरील प्रारंभीच्या काळातील एक चांगला ग्रंथ असे या ग्रंथाबाबत म्हणता येईल.**

**८) एडवर्ड स्कॉट वेअरिंग** - हा पुण्याच्या रेसिडेंसी कार्यलियात नोकरीस होता. याने **मराठ्यांच्या इतिहास** हा ग्रंथ १८१० मध्ये लिहीला. तो पुण्याच्या रेसिडेन्सी कार्यलियात नोकरीस होता. त्याने १७७३ पर्यंतचा मराठ्यांचा इतिहास लिहीला आहे. मराठी साधनांचा मोठ्या प्रमाणावर वापर करणारा तो पहिलाच पाश्चिमात्य इतिहासकार होय, पण त्याने मराठ्यांचा सर्वंकष इतिहास लिहीला नाही. बखरीपेक्षा थोडासा सुसंगत असा मराठ्यांचा इतिहास कथन करणारा हा ग्रंथ होता.

या काळातील बहुतेक पाश्चात्य इतिहासकारांनी विद्वानांनी साम्राज्यवादी दृष्टीकोनातूनच भारताचा इतिहास लिहीला. त्यात जोसेफ, कॅनींगहॅम, मार्क विल्कीन, किंकेडे सी.ए. विल्यम हंटर, सर ऑकलंड कॅलविन, जॉन के, सरजॉन सिले, जॉन मार्शमन, जॉन पोप, लॉर्ड मेकॉले, यासारख्या अनेक लेखकांचा उल्लेख करावा लागतो.

## ५.२ राष्ट्रवादी इतिहास लेखन

ब्रिटीश इतिहास संशोधकांनी साम्राज्यवादी भूमिकेतून लिहीलेल्या इतिहास लेखनाला उत्तर देण्यासाठी भारतीय लोकांनी राष्ट्रवादी भूमिकेतून इतिहास लेखन करण्यास सुरूवात केली. भारताविषयी चुकीची वक्तव्ये करणारे जेम्स स्टुअर्ट मिल, इलियट, डाउसन्स, मेन, स्टीफन व्हिलर असे अनेक इतिहासकार होते. भारतीयांनी सुरूवातीस संरक्षणात्मक पावित्रा घेतला. अफाट

सहनशक्ती दाखविली. त्यानंतर त्यांना तोंड देण्याची तयारी केली. इतिहास लेखनाचा भक्कम पाया तयार केला. खरंतर या साम्राज्यवादी इतिहास लेखनामुळेच भारतामध्ये इतिहासासंबधी नवीन जाण निर्माण झाली. या लेखनामुळे भारतीयांनी ब्रिटीशांवर प्रतिहल्ला करण्यासाठी दोन प्रकारे तयारी केली.

**१) पहिल्या प्रकारात त्यांनी आपला भूतकाळ व्यवस्थित शोधण्यास सुरूवात केली. अस्सल साधनसामुग्री ते शोधू लागले. दप्तरखान्याचा शोध घेऊन साधने मिळवू लागले संस्कृत व प्राकृत शिकू लागले.**

**२) दुसऱ्या प्रकारात त्यांनी पाश्चिमात्यांनी केलेल्या आरोपाचे नवीन माहितीच्या आधारे खंडन करण्यास प्रारंभ केला.**

यातून नवे युग प्रारंभ झाले. भारतीयांनी आत्मसात केलेल्या नव्या तंत्रामुळे व इतिहासामुळे राष्ट्रभावना जागृत झाली. राष्ट्रवादी इतिहासकारांनी पाश्चात्य लोकांच्या विरोधातच पवित्रा घेतला. चर्चा, संवाद, परिसंवाद, आरोप आणि खंडन यामधून इतिहास संशोधनाला वेगळे वळण मिळाले. इतिहासाच्या अनेक महत्वपूर्ण मुदयांकडे पाश्चात्यांचे दुर्लक्ष झालेले होते. ते त्यांनी दाखवून दिले. परंतू राष्ट्रवादी इतिहास लिहीण्याच्या भरात इतिहास लेखनाचे जे गुण उदा. निरपेक्ष दृष्टी, समतोल निर्णय, योग्य आकलन अशा वस्तुनिष्ठ भूमिकेचा त्यामुळे विकास झाला नाही.

भारतीय प्रबोधनाचे शिल्पकार राजाराममोहन रॉय यांनी इतिहासाचा वापर सामाजिक सुधारणेच्या प्रस्तावासाठी तसेच राष्ट्रीय एकात्मेसाठी केला. भारतीयांच्या प्राचीन पराक्रमाचे उदात्तीकरण केले जाऊ लागले. प्राचीन भारतीय लोकांची नैतीक, भौतीक, आध्यात्मीक क्षेत्रातील प्रगती व उंची पाश्चात्यांपेक्षा अधिक आहे हे स्वामी दयानंद सरस्वती, विवेकानंद, सावरकर, ॲनीबेझंट या सर्वांनीच वारंवार प्रतिपादन केले. के. पी. जयस्वालांनी सभा-समिती संकल्पनेचा वापर करून पाश्चात्यांपेक्षा लोकशाही प्रगती बाबत भारत हजारो वर्ष आघाडीवर होता. हे दाखविण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे भारतीय विद्वतेला एक वेगळीच झालर मिळाली. भक्कम पुराव्यावर एखादी गोष्ट सिद्ध होऊनही पाश्चात्यांनी ती ग्रीक, रोमन, असेरियन, बॅबिलोनियन यांकडून भारतीयांनी घेतली असावी असे अनुमान पाश्चात्य काढू लागले. पल्लवराजे म्हणजे पर्शियन असे खुळचट-हास्यास्पद अनुमान काढण्यासही त्यांनी कमी केले नाही. महाकाव्ये होमरकडून तर नाट्यशास्त्र, गणित, तत्वज्ञान, खगोलशास्त्र



Scanned with ACE Scanner

यांचा विकास उधार - उसनवारीवर झाला. कृष्णसंप्रदायही या टिकेत ख्रिस्ताचाच मानला जाऊ लागला. भारतीयांनीही ह्या द्वंद्वात आपल्या प्रतिस्पर्धांना तितकेच तडफेने उत्तर दिले. काही ब्रिटीश इतिहासकारांनी मुस्लीम राजवटीचे उदात्तीकरण करून हिंदू - मुस्लीमांमध्ये दुहीचे बीज पेरण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी काही भारतीय इतिहासकारांनी हिंदु - मुस्लीम समाजाचे सांस्कृतिक - सामाजिक - भावनिक ऐक्य दाखविण्यासाठी नवे मध्ययुगीन इतिहास लेखन आरंभले. त्यात ताराचंद त्यांच्या **''भारतीय संस्कृतीवरील इस्लामचा प्रभाव''** या ग्रंथाचा उल्लेख करणे गरजेचे आहे. अशाच स्वरूपाचे लेखन डॉ. बेनी प्रसाद, डॉ. बनारसीप्रसाद सक्सेना, डॉ. ईश्वरी प्रसाद इत्यादींनी केले.

परंतू साम्राज्यवादी इतिहास लेखनाला प्रत्युत्तर देण्याच्या ह्या द्वंदात नवे संशोधन सुरू झाले, राष्ट्रीय बाण्याच्या इतिहास लेखनाची सुरूवात झाली हे सर्व ठीक झाले परंतू उत्तर प्रत्युतराच्या या लढाईत इतिहास लेखनाची मात्र ओढाताण झाली व तो आपले खरे स्वरूप हरवून बसला. जातीयवाद ही फोफावला. देश फाळणीपर्यंत येऊन पोचला.

## राष्ट्रवादी इतिहासकार

**१) डॉ. काशीप्रसाद जयस्वाल (२७ नोव्हेंबर १८६१ ते ४ नोव्हेंबर १९३७) -** डॉ. काशी प्रसाद जयस्वाल हे प्राच्यविद्या पंडित म्हणून अत्यंत सुपरिचित आहेत. विद्वान सव्यसाची पंडित म्हणून २० व्या शतकातील भारताला ते ज्ञात आहेत. त्यांच्या मौल्यवान संशोधनामुळे प्राचीन भारताचा इतिहास व राज्यपद्धती या क्षेत्रांत त्यांना आजही मान आहे. प्राचीन भारताच्या इतिहास संशोधन क्षेत्रात त्यांनी एक नवे दालन खुले केले. भारतामध्ये एक वेगळ्या प्रकारचा राष्ट्रवाद निर्माण केला. डॉ. के. पी. जयस्वाल हे बहुमुखी व्यक्तिमत्त्व होते. ते व्यवसायाने वकील असूनही इतिहास संशोधनाची भरीव कामगिरी त्यांनी केली. २० व्या शतकाच्या पहिल्या पन्नास वर्षात जयस्वालनी संशोधनाच्या क्षेत्रात नवा पाया घातला. ब्रिटिशांनी भारताचा इतिहास विकृतपणे लिहिला. या विकृत इतिहासाला आव्हान देणारा पहिला इतिहासकार म्हणून डॉ. जयस्वाल इतिहास जगताला माहीत आहेत. ब्रिटिशांनी लिहिलेल्या भारताच्या इतिहासाला आव्हान देण्याचे काम जयस्वाल यांनी केले. जेम्स मिलने भारताचा विकृत इतिहास लिहिला त्याची प्रतिक्रिया म्हणून भारताचे गतवैभव

शोधून काढण्याची प्रक्रिया सुरू झाली. युरोपीय संस्कृतीचे मोठेपण सिद्ध करून भारतीय संस्कृतीला हलक्या प्रतीची ठरविण्याचा जो अश्लाघ्य प्रकार ब्रिटिश इतिहासलेखनामध्ये घुसला होता. तसेच ख्रिश्चन मिशनरींनी हिंदू धर्म हिंदू समाज, चालीरीती यावर पद्धतशीर हल्ला चढवून भारताला नामोहरम करण्याची जी प्रक्रिया त्याकाळी भारतात सुरू होती. त्याच्या विरोधात भारतातील राष्ट्रीय वृत्तीच्या तरूणांनी जी स्वाभाविक प्रतिक्रिया दाखविली त्यामध्ये के.पी. जयस्वाल यांचे नाव अगदी वरच्या स्थानावर आहे.

**पूर्व वृत्तांत** - काशी प्रसाद जयस्वाल यांचा जन्म २७ नोव्हेंबर, १८८१ मध्ये एका श्रीमंत घराण्यामध्ये झाला. त्यांचे मूळ ठिकाण उत्तर प्रदेशातील मिर्झापूर हे होय. त्यांच्या वडिलांचे नाव महादेव प्रसाद असे होते. जयस्वाल यांची ''काशी प्रसाद महादेव प्रसाद ॲण्ड कंपनी, लॅक ॲण्ड कारपेट मर्चन्टस'' या नावाची व्यापारी कंपनी होती. जयस्वाल कंपनीची वार्षिक उलाढाल काही दशलक्ष रुपयांची असे. काशी प्रसाद यांचे प्राथमिक शिक्षण मिर्झापूर येथेच झाले. मिर्झापूरमध्ये 'लंडन मिशन स्कूल' नावाची शैक्षणिक संस्था होती. त्याचेच रूपांतर पुढे ''बाबूलाल जयस्वाल हायस्कूल'' असे झाले. तेथे यांचे माध्यमिक शिक्षण झाले. संस्कृत हा काशी प्रसादाचा आवडता विषय होता. 'हंडीबाबा नावाचे प्रसिद्ध संस्कृत पंडित त्यांना संस्कृत शिकवित असत. हंडीबाबांच्या संस्कारांना काशी प्रसादच्या जीवनात मोठे आदराचे स्थान आहे. इ.स. १८९९ मध्ये ते एन्टरन्स परीक्षा पास झाले. नंतर त्यांनी वाराणसी येथील ''क्वीन्स कॉलेज'' मध्ये प्रवेश घेतला. घरगुती कारणांनी त्यांना शिक्षण मध्येच सोडावे लागले. परंतु त्यांना शिक्षणामध्ये खूप रस असल्याने व्यवसायात काशी प्रसादची स्थिती पाण्याबाहेर तडफडणाऱ्या माशासारखी झाली होती. त्यामुळे त्यांनी व्यवसाय आपल्या इतर भावांकडे सोपविला व इंग्लडला शिकण्यासाठी गेले. इ. स. १९०६ साली वयाच्या पंचविसाव्या वर्षी त्यांनी 'ऑक्सफर्ड युनिर्व्हसिटी' मध्ये प्रवेश घेतला. ऑक्सफर्ड मधून त्यांनी, एम. ए. ची पदवी घेतली. त्यामधील यशाबद्दल त्यांना 'डेव्हिस स्कॉलरशिप' ही चिनी भाषेच्या अभ्यासासाठी ठेवलेली शिष्यवृत्ती मिळाली. त्यानंतर त्यांनी बॅरिस्टर होण्यासाठी ''लिंकन्स इन'' मध्ये प्रवेश घेतला व बॅरिस्टर ही पदवी प्राप्त केली.

लंडनच्या मुक्कामात त्यांचा संबंध ''इंडिया हाऊस'' मधील श्यामजी कृष्ण वर्मा. वि. दा. सावरकर, एस. आर. राणा, लाला हरदयाळ, मॅडम कामा यांच्याशी आला. या व्यक्तींच्या सहवासामुळेच काशीप्रसाद कट्टर राष्ट्रीय



Scanned with ACE Scanner

वृत्तीचे आणि हिंदू संस्कृतीचे अभिमानी झाले. इतिहासाचे विद्यार्थी असल्याने भारतीय गतकाळ आणि वर्तमान यांची तुलना त्यांनी सुरू केली आणि आपण भारतासाठी काहीतरी केले पाहिजे ही जाणीव निर्माण झाली. पाहिजे. 'डॉन मार्टिनो द सालवा' या पौर्वात्य विद्या पंडीताशी त्यांचा संबंध आल्यामुळे इंग्लंडमधून आल्यावर त्यांना पौर्वात्य विद्याचे श्रेष्ठत्व कळले. त्यानंतर कलकत्याला आल्यावर कलकत्ता विद्यापीठ मध्ये त्यांना 'इतिहास आणि अर्थशास्त्र' या विषयाचे प्राध्यापक म्हणून नोकरी मिळाली. परंतु इंग्रज सरकारचे गुप्तहेर त्याच्या वर्गातील लेक्चरवर बारीक नजर ठेवत. सरकारचे हे धोरण पाहून जयस्वाल यांनी वकीली सुरू केली. परंतु वकीली पेक्षा इतिहास संशोधक म्हणून त्याचे लिखाण जास्त आहेत.

**जयस्वालांचे लिखाण** - जयस्वाल यांनी **''हिंदू पॉलिटी'' आणि भारताचा घटनात्मक इतिहास''** (हिंदू काळातील भारताचा घटनात्मक इतिहास) या नावाचा ग्रंथ लिहिला. याशिवाय कुशाण, मिथीला, पुराणे, मौर्य या विषयावरती तसेच पुष्यमित्र, सातवाहन, नागकालखंड या विविध विषयावर त्यांनी लेख लिहून भाषणे दिलेली आहे.

प्राचीन भारताच्या इतिहास संशोधकांनी असा सिद्धांत मांडला होता की, कुशाणांच्या ऱ्हासापासून ते गुप्ताच्या उदयापर्यंतचा काळ हा भारतीय इतिहासामधील अंधार युगाचा कालखंड आहे. परंतु जयस्वाल यांनी हा सिद्धांत खोडून काढला व हाच कालखंड भारतीय इतिहासामधील राष्ट्रीय संघर्षाचा व विरोधकांना मोडून काढण्याचा आहे. याच काळात राजकीय व सांस्कृतिक इतिहासात नव्या दैदिप्यमान युगाची सुरुवात झाली व याच संशोधनामुळे प्राचीन भारतीय इतिहासाचे संशोधक म्हणून त्यांना मान्यता मिळाली.

**'हिंदू पॉलिटी'** या त्यांच्या ग्रंथामध्ये भारतीय प्रजासत्ताका संबंधी माहिती आहे. हिंदू राज्य पद्धतीमध्ये प्रतिनिधीत्वाचे तत्त्व मान्य करण्यात आले होते. व सर्व सामान्य जनताही या तत्त्वाला मान देत असे. असे म्हटले आहे. मौर्य, शुंग, शक, कुशाण त्यापूर्वी महाभारत वाङ्मयाचा आणि अलाहाबाद येथील समुद्रगुप्ताच्या स्तंभावरून इ. स. पू. ६०० ते इ. स. ४५० या काळात भारतात रिपब्लिक अथवा प्रजासत्ताक होते. हे त्यांनी सिद्ध केले. तर दुसऱ्या भागामध्ये त्यांनी हिंदू राज्यासंबंधी चर्चा केली आहे. त्याच्या मते, ऋग्वेदाकालीन राजा लोकनियुक्त असे. प्रजेने राजाला द्यावयाचा कर ही



Scanned with ACE Scanner

संकल्पना समाजामध्ये रूढ झालेली होती. जयस्वाल यांनीच पहिल्यादा राज्याभिषेकांचे घटनात्मक स्वरूप समाजाच्या निदर्शनास आणून दिले. हिंदूचे राजे पद हा एक करार असे आणि राजा कोणत्याही परिस्थिती मध्ये एकतंत्री होणार नाही यांची खबरदारी घेण्यात आलेली होती. त्यांचे असे म्हणणे होते की, ब्रिटिश राजेशाही ही जरी आदर्श मानली गेली असली तरी प्राचीन भारतीय राजेशाही ही सुद्धा आदर्शच होती व ती ब्रिटिश पार्लमेंटइतकीच सामर्थ्यवान संस्था होती.

काशी प्रसाद जयस्वाल यांची शिलालेख शास्त्रामधील कामगिरी ही वाखाणण्यासारखी आहे. खारवेलाच्या हाथीगुंफाचा शिलालेख वाचण्याचा त्यांनी यशस्वी प्रयत्न केला व खारवेलाच्या राजवटीवर प्रकाश टाकला. अशोकाचा शिलालेखाचा भुवनेश्वर येथील ताम्रपट वाचून त्यांनी अशोकांच्या आणि ओरिसाच्या इतिहासावर भर टाकली. तर अयोध्येच्या शिलालेखाचे वाचन करून शुंग घराण्यावर प्रकाश टाकला. या वेगवेगळ्या शिलालेखाच्या वाचनातून जयस्वाल यांनी प्राचीन भारतातील इतिहासा संबंधी अनेक नवीन गोष्टी उजेडात आणल्या.

जयस्वाल यांनी नाणक शास्त्रामध्ये ही भर घातली आणि गंगेच्या प्रदेशात वापरलेल्या अनेक नाण्याची माहिती त्यांनी दिलेली आहे. शुंग घराण्यातील सहा वैशिष्ट्यपूर्ण चांदीच्या नाण्यावर काशीप्रसाद जयस्वाल यांनी विद्वत्तापूर्ण संशोधन केले जयस्वाल यांनी नंद, मौर्य, या काळातील नाण्यावर ही संशोधन केले.

**जयस्वाल यांच्या इतिहास लेखनाचे मूल्यमापन** - जयस्वाल यांनी शकांच्या हिंदू विषयक धोरणावर टिका केली. प्राचीन भारताच्या सामाजिक व राजकीय इतिहास ठिसूळ करून देशांचे नुकसान करण्याची जबाबदारी शकांवर आहे. शकांनी या देशात ब्राम्हण आणि क्षत्रिय यांच्या अधिकाराविरूद्ध सामाजिक क्रांती करून तत्कालीन समाजातील या दोन अधिकारी वर्गांना नेस्तानाबूत करण्याचा प्रयत्न केला. हा सिद्धांत जयस्वाल यांनी मांडला. नाग आणि वाकाटक या घराण्यांचा उदय ही राष्ट्रीय आकांक्षा होती, ती त्यावेळी पूर्ण झाली. असा सिद्धांत जयस्वाल यांनी मांडला.

भारत शिव गटाचा उदय आणि त्यांनी कुशाणांचा केलेला पराभव याला जयस्वाल यांनी भारतीय चळवळीशी जोडले. ज्या प्रमाणे भारत शिव गटाने कुशाणांना हाकलून लावले. त्याप्रमाणे हिंदी लोकांनी ब्रिटिशांना हुसाकावून



Scanned with ACE Scanner

लावावे. असा नवा सिद्धांत जयस्वाल यांनी मांडला. जयस्वाल यांच्या लिखाणामध्ये काही किरकोळ दोष असतीलही परंतु प्राचीन भारताचा इतिहास लोकांपुढे ठेवून त्यांनी देशांतील स्वांतत्र्य चळवळीला चालना देण्याचा प्रयत्न केला. स्वतः क्रांतीकारक विचाराचा असणारा हा इतिहासकार खरोखरच अद्वितीय आहे. भारत देशांचा असणारा प्रखर राष्ट्रभिमान त्यांच्या लिखाणातून जागोजागी दिसून येतो. त्यांनी कला व धर्म या क्षेत्रात भरीव कामगिरी केली. असा हा जेष्ठ इतिहासकार संशोधक १९६७ मध्ये मृत्यू पावला.

२) **डॉ. रमेशचंद मुजूमदार** - (सविस्तर माहिती प्रकरण नं. ७ मध्ये पहावी)

३) **वि. दा. सावकर** - भारतीय स्वातंत्र्य चळवळीची गरज लक्षात घेऊन ज्यांनी इतिहास लेखन केले त्यात वि. दा. सावरकरांचा उल्लेख करावा लागतो. **भारतीय इतिहासाची सहा सोनेरी पाने व १८५७ चे स्वातंत्रसमर** हे त्यांचे गाजलेले ग्रंथ होय. त्यांच्या साहित्यात अनेक ठिकाणी इतिहास लेखनाचा भाग दिसतो. त्यांचे इतिहासविषयक लेखन हे निःपक्षपाती, तर्कशुद्ध व वस्तुनिष्ठ नाही. त्यांचे इतिहास लेखन हे प्रचारकी थाटाचे आहे. स्फूर्ती व प्रेरणा देणारे प्रसंग निवडून त्यांनी भारतीय इतिहासाची सहा सोनेरी पाने हा ग्रंथ लिहीला. १८५७ च्या स्वातंत्रयुद्धात लढलेल्या वीरांच्या बहादुरीची वर्णने, इंग्रजांची व फितुर स्वकीयांची चीड उत्पन्न करणारा हा ग्रंथ आहे. १८५७ च्या युद्धाला ते शिपायांचे बंड न म्हणता ''भारतीयांचे पहिले स्वातंत्र्ययुद्ध'' म्हणतात. इंग्रजांची १८५७ च्या उठावावर केलेली टीका सावरकरांना मान्य नाही. डॉ. य. दि. फडके म्हणतात. सावरकरांच्या इतिहास लेखनात विश्लेषणाचा भाग फार मोठा आहे. त्यांच्या इतिहास विषयक लेखनाचे स्वरूपही मूलतः आणि मुख्यतः रोमॅटिक प्रवृत्तीचे एक प्रमुख लक्षण! सावरकरांचा राष्ट्रवाद हा जाज्वल होता. म्हणूनच त्यांच्या इतिहास लेखनावरही त्याचा प्रभाव अपरिहार्य आहे.

४) **वासुदेव शास्त्री खरे** - यांनी सांगलीचे संस्थानिक पटवर्धन दप्तरातून कागद निवडले व ऐतिहासिक लेखसंग्रहाचे एकूण (१२ खंड) प्रकाशित केले खरे हे मूळचे मिरजेचे ते राष्ट्रीय वृत्तीचे इतिहासकार होते. शिक्षक होते. ऐतिहासिक लेखसंग्रहाचे एकूण १५ खंड तसेच १७६१ - १८१० या काळातील ऐतिहासिक कागदपत्रे प्रसिद्ध करून इतिहासाची पर्यायाने राष्ट्राची त्यांनी मोठी सेवा केली. त्यांच्या लिखाणात प्रामुख्याने उत्तर पेशवाईचा इतिहास आला आहे. मराठ्याच्या इतिहासाचे संशोधन करणाऱ्यांना त्याचा खूपच उपयोग आहे.



Scanned with ACE Scanner

**५) द.ब.पारसनीस** - साने, खरेशास्त्री, राजवाडे यांच्या राष्ट्रवादी परंपरेतील द. ब. पारसनीस होते. सातारा, पुणे येथील दप्तरखान्यातुन कागदपत्रे निवडून त्यांनी आपल्या **भारतवर्ष व इतिहाससंग्रह** या नियतकालिकातून प्रसिद्ध केली. अनेक ऐतिहासिक व्यक्तींची छोटी मोठी टिपणे लिहून त्यांनी सामान्यांमध्ये इतिहासाची आवड निर्माण केली.

**६) सुरेंद्रनाथ सेन** - हे बंगाली इतिहासकार असून त्यांनी राष्ट्रवादी भावनेतूनच मराठ्यांचा इतिहास व राजा शिवछत्रपती यांच्या बद्दल लिखाण केले आहे. त्यांचे महत्वाचे ग्रंथ

१) ॲडमिनिस्ट्रेटीव्ह सिस्टीम्स् ऑफ दि मराठाज् (१९२२) पीएच. डी. प्रबंध.

२) मिलीटरी सिस्टीम्स् ऑफ दि मराठाज् (१९२८)

३) फॉरेन बॉयोग्राफी ऑफ शिवाजी (१९२७)

४) शिवछत्रपती (१९२०)

सेन हे राष्ट्रीय वृत्तीचे संशोधक होते. आपल्या तरुणपणी त्यांनी स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला होता. मराठे हे लुटारू अथवा चोर नसून साम्राज्य चालविण्यासाठी त्यांनी उत्तम प्रशासन पद्धती निर्माण केली होती असे ते प्रतिपादन करतात. परकीय साधनातून शिवाजी महाराजांविषयी झालेले लिखाण एकत्र करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. फ्रेंच, डच, पोर्तुगीज इंग्रज या साधनातून त्यांनी सर्व माहिती गोळा करून फॉरेन बायोग्राफीज ऑफ शिवाजी हा ग्रंथ १९२७ ला त्यांनी प्रकाशित केला. शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाने व व्यक्तीमत्वाने त्यांना प्रभावित केल्यानेच त्यांनी **शिवछत्रपती** हा ग्रंथ लिहीला. **डॉ. अ. रा. कुलकर्णी** म्हणतात - सुरेंद्रनाथ सेन हे मराठ्यांचे अभिमानी, मराठी भाषा व मराठी माणसांवर नितांत प्रेम करणारे असे राष्ट्रीय प्रवृत्तीचे बंगाली इतिहासकार आहेत.

**७) राधाकुमुद मुखर्जी** - राष्ट्रवादी इतिहासकार म्हणूनच ओळखले जातात. **फंडामेंटल युनिटी ऑफ इंडिया** हा त्यांचा ग्रंथ प्रसिद्ध आहे. भारतात विविध धर्म, पंथ जात असे मतभेद असले तरी त्यांच्यात मूलभूत ऐक्य आहे. असे ते या ग्रंथात म्हणतात. तसेच **हिस्टरी ऑफ इंडियन शिपिंग ॲन्ड मीरिटाईम ॲक्टीव्हिटी'** हा त्यांचा ग्रंथ ही भारतीयांच्या प्राचीन काळापासून जहाजे व समुद्रविषयक हालचालींवर प्रकाश टाकतो. त्यांचे लिखाण हे प्रामुख्याने प्राचीन भारतावर आहे. चंद्रगुप्त मौर्य, अशोक, हर्षवर्धनावर त्यांनी



Scanned with ACE Scanner

लिखाण केले. याशिवाय १) हिंदू सिव्हीलायझेशन २) नॅशनॅलिझम इन हिंदू कल्चर ३) गुप्ताइम्पायर ४) ॲन्शन इंडिया ५) लोकल सेल्फ गव्हर्मेंट इन ॲन्शन्ट इंडिया ६) ॲशंन्ट इंडियन एज्युकेशन हे आणखी काही त्यांचे गाजलेले ग्रंथ होत.

या सर्व ग्रंथांमागे राष्ट्रवादाचीच प्रेरणा होती.

८) **ताराचंद** - हिंदू मुस्लीम ऐक्य ही स्वातंत्र्य चळवळीची गरज आहे असे ताराचंद यांना वाटत होते. म्हणूनच त्यांनी **इस्लामचा भारतीय संस्कृतीवरील प्रभाव व स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास** हे दोन्ही ग्रंथ राष्ट्रवादी भावनेतून लिहीले.

९) **आर. सी. दत्त** - राष्ट्रवादी इतिहासकार म्हणून रोमेशचंद्र दत्त यांच्याकडे पाहिले जाते. भारताच्या आर्थिक राष्ट्रवादाचा पुरस्कार त्यांनी केला. म्हणूनच ते राष्ट्रवादी इतिहासकार मानले जातात. I.C.S. ची परीक्षा इंग्लंडला जाऊन ते पास झाले. पुढे चोवीस परगणा प्रांताचे ते कलेक्टर बनले. इंग्रजी सनदी नोकरांचा अभ्यास संशोधन परंपरा त्यांनी चालविली. त्यांनी ऋग्वेदाचे बंगालीत भाषांतर केले तसेच महाभारताचे इंग्रजीत भाषांतर केले. **Eonomic History of India** व **India Today** हे त्यांचे गाजलेले ग्रंथ. शिवाय **History and civilization in Anciert India** हा ग्रंथही त्यांनी लिहीला. या ग्रंथातून त्यांनी पाश्चात्य विद्वानांची भारतीय इतिहासबाबतची मते खोडली. ब्रिटीशांच्या महसूल धोरणाचे दुष्परिणाम त्यांनी मांडले भारताच्या अविकसितपणाला व गतिशून्य अर्थव्यवस्थेला ब्रिटीशच जबाबदार आहेत हे त्यांच्या इतिहास लेखनाचे सूत्र होते. भारतीय शेतकरी शेतमजूर व त्यांचे दारिद्रय मांडून त्यासाठी त्यांनी ब्रिटीशांनाच जबाबदार धरले. डॉ. दत्त हे ब्रिटीशांच्या जमीन महसूल धोरणाचे कडवे टीकाकार म्हणून प्रसिद्ध होते. **फॅमिन्स इन इंडिया, पिझंट्री इन बंगाल** हे ही त्यांचे महत्त्वाचे ग्रंथ आहेत. कायमधारा व जमीन महसूल वास्तववादी बनवून तो कमी करावा असा आग्रही दृष्टीकोन ते मांडतात. काँग्रेसच्या व्यासपीठावर आपल्या ओघवत्या व निर्भिड भाषणाने ते आपला मुद्या प्रभावीपणे मांडत डॉ. बिपीनचंद्र यांनी भारतीय आर्थिक राष्ट्रवादाचे जे प्रमेय मांडले त्याचे मुख्य शिल्पकार दत्तच ठरतात. दादाभाईच्या शोषण सिद्धांताला दत्त यांच्या कार्याने बळकटी आली. ग्रामीण शेतकऱ्यांची संघटना बनण्यास मदत झाली. पाश्चात्य शिक्षण पद्धती विशेषतः इंग्रजी शिक्षणाचा प्रसार आपणास एकनिष्ठ अशा समर्थकांचा वर्ग निर्माण करण्यास उपयुक्त ठरेल ह्या इंग्रजांच्या आशावादाला फोल ठरविण्याचे कार्य



Scanned with ACE Scanner

दत्त यांनी केले. भारताच्या द्रारिद्याची आकडेवारी देऊन त्याची मीमांसा त्यांनी केली. लॉर्ड कर्झनला त्यांनी जाहीर पत्र लिहून आपली भूमिका प्रतिपादन केली. काँग्रेसचे लखनौ अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून त्यांचे कार्य महत्वपूर्ण आहे. एका अर्थाने भारतातील **आर्थिक राष्ट्रवादाचे ते जनकच मानले जातात.**

**१०) डॉ. ए. एस. आळतेकर** - प्राचीन भारतीय इतिहास व संस्कृतीचे अभ्यासक म्हणून डॉ. ए. एस. आळतेकर यांचे नाव प्रसिद्ध आहे. आळतेकर महाराष्ट्राचे असूनही महाराष्ट्रात ते फारसे प्रसिद्ध नव्हते. कारण महाराष्ट्रात शिक्षण घेतल्यानंतर ते उत्तर हिंदुस्थानात गेले व तिकडेच स्थायिक झाले. ते पुण्याच्या डेक्कन कॉलेजचे विद्यार्थी ते एम. ए. (संस्कृत) होते. एम. ए. झाल्यावर त्यांनी संशोधनात्मक लेख लिहीले. त्यामुळे त्यांना प्रसिद्धी मिळाली. हे लेख १) गुजरात व काठेवाड येथील नगर व पुरे २) पश्चिम भारतातील ग्रामीण राज्यव्यवस्थेचा इतिहास. त्यांच्या लिखाणावर राष्ट्रवादी विचारांचा प्रभाव दिसतो. १९३४ मध्ये **Education in Ancient India** हा ग्रंथ त्यांनी प्रसिद्ध केला. प्राचीन भारतीय शिक्षणाची उद्दिष्ट्ये व तत्त्वे यात प्रसिद्ध केली आहेत. **Rashtrakutas and their Times** हा आळतेकरांचा बनारस हिंदू विद्यापीठाला डी. लिट पदवीसाठी सादर केलेला प्रबंध होता. यात राष्ट्रकूटांचा संशोधनात्मक विस्तृत असा इतिहास आळतेकरांनी रेखाटला आहे. **The position of women in Hindu civilization** हा त्यांचा आणखी एक नावाजलेला ग्रंथ आहे. हिंदू संस्कृतीमध्ये स्त्रियांचा दर्जा कसा होता. त्यात कसे कसे बदल होत गेले हे आळतेकरांनी अत्यंत विस्ताराने मूळ ग्रंथाचे संदर्भ देऊन मांडले आहे. प्राचीन भारतातील प्रशासनाचा ऐतिहासीक आढावा घेणारा **State and Gorvernment in Ancient India** हा त्यांचा प्रसिद्ध ग्रंथ आहे.

आळतेकरांनी भारताला संपन्न, समृद्ध असा प्राचीन इतिहास नाही असे म्हणणारांना आपल्या संशोधनाने व ग्रंथांनी भारताची समृद्धता दाखवून दिली. पुराणे, वैदिक वाङमय व महाकाव्ये हा इतिहास नाही. तर इतिहासाचे साधन साहित्य आहे हा विचार त्यांनी मांडला. आपणच आपला इतिहास जगापुढे मांडला पाहिजे. ब्रिटीश किंवा इतर देश आपल्या इतिहासाला न्याय देऊ शकत नाही. आपणच आपल्या देशाच्या इतिहासाला न्याय देऊ शकतो असे त्यांचे म्हणणे होते. प्राचीन भारतीय इतिहास व संस्कृतीच्या संशोधन क्षेत्रात त्यांचा फार मोठा अधिकार होता. प्रभाव व दबदबा होता.

या खेरीज गौरीशंकर ओझा - (राजस्थानचा इतिहास) आचार्य जावडेकर



Scanned with ACE Scanner

(आधुनिक भारत) आर.जी.भांडारकर (दख्खनचा इतिहास) लोकहितवादी (राजस्थान, सौराष्ट्र, गुजरातचा इतिहास) दादाभाई नौरोजी (Economic drain therry) लोकमान्य टिळक (Arctic Home of the vedas) गीतारहस्य पं. शामशास्त्री (संपा. कौटील्य अर्थशास्त्र) पट्टाभिसितारामच्या (काँग्रेसचा इतिहास) के.एम. मुन्शी, (गुर्जर देशाचा इतिहास) ग. ह. खरे, डॉ. बी. आर. नंदा यांनीही राष्ट्रवादी भावनेतून लिखाण केले.

नव्या राष्ट्रवादी इतिहासकारांचा सर्वात मोठा दोष म्हणजे जेम्स मिलच्या कालविभागणीला त्यांनी कधीच आव्हान दिले नाही. याचे एक कारण म्हणजे त्यावेळी राजकीय घडामोडी राजघराणी, यांच्याच इतिहासाचा अभ्यास केला गेला. सामाजिक आणि आर्थिक इतिहासाकडे दुर्लक्ष केले. गोखले, रानडे, दादाभाई नौरोजी हे नेते साम्राज्यवादाच्या विरोधात ठामपणे उभे राहिले नाहीत. पण त्यांनी जे इतिहास लेखन केले त्यामुळे राष्ट्रवादाची भावना वाढीस लागण्यासच मदत झाली. १९ व्या शतकात भारतात राष्ट्रवादाचा उदय झाल्यावर राष्ट्रनायकांची चरित्रे हा आदर्श मानून ती समाजापुढे ठेवण्याचे प्रयत्न भारतातील विविध प्रांतातील इतिहासकारांनी केले. राष्ट्र पुरूषांचे इतिहास राष्ट्रवादाच्या निर्मितीची गरज म्हणून लिहीले गेले. १८५७ च्या उठावात ब्रिटीशांना कडवा विरोध करणारे नेते राष्ट्रपुरूष बनले. राष्ट्रवादी इतिहासकारांनी त्यांना आपल्या लिखाणातून राष्ट्रपुरूष बनवले.

थोडक्यात साम्राज्यवादी इतिहास लेखनाला प्रत्युतर म्हणून राष्ट्रवादी इतिहास लेखनाची प्रक्रिया सुरू झाली. इतिहासाचे पुर्नलेखन करणाऱ्या या प्रक्रियेत काही चांगल्या घटना घडल्या. १९३५ अखिल भारतीय इतिहास परिषदेची स्थापना झाली. दप्तरखाने उभारले जाऊन ते संशोधकांना खुले करण्यात आले. १९२० पासून इंडियन हिस्टॉरिकल रेकॉर्डस कमिशन कार्यान्वीत झाले. नव्या धर्तीचे इतिहास लेखन सुरू होऊन जनताभिमुख अश्या सबार्ल्टन विचारधारेचा उदय झाला.

## ५.३ मार्क्सवादी इतिहास लेखनशास्त्र

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात इतिहास व इतिहास लेखन शास्त्र यामध्ये मार्क्सच्या आगमनाने क्रांतीकारक परिवर्तन घडून आले. एका नव्या युगाचा प्रारंभ झाला. मार्क्सने इ. स. १८४७ मध्ये आपला **'पॉव्हर्टी ऑफ फिलॉसॉफी'** हा ग्रंथ प्रकाशित केला. या मध्येच मार्क्सने आपले इतिहासाचे



Scanned with ACE Scanner

तत्वज्ञान मांडले आहे. तसे तर मार्क्सच्या सर्वच लेखनातून त्याचा इतिहास विषयक दृष्टीकोन स्पष्ट होतो. मार्क्सच्या मते ज्या ज्या घटना घडतात त्यांच्या मागे भौतिक कारणेच असतात. माणसाच्या ऐहिक जीवनाची आर्थिक बाजू ही सर्वात अधिक महत्वाची आहे. माणसाच्या गरजा आणि त्यातून निर्माण होणारी परिस्थती त्यामुळे सर्व इतिहास घडत असतो. मानवी इतिहासाचे परिशीलन करून त्याने ठामपणे आपली भूमिका मांडलेली आहे. त्याने इतिहासाच्या अभ्यासातून काही नियम तयार केले. त्यानुसारच सर्व घडामोडी घडतात असे त्याने आग्रहाने म्हटले आहे. मार्क्सच्या इतिहास भाष्याने संबंध भूतंकाळाचा नियमबद्ध असा अर्थ लागतो. आणि भविष्यातील घडामोडींचे स्वरूपही स्वच्छ होते. इतिहास भाष्याची जी विशिष्ठ पद्धती मार्क्सने स्विकारली. व इतिहास लेखनात जो नवा प्रवाह सुरू केला तो ''मार्क्सवादी इतिहास लेखन'' या नावाने ओळखला जातो. आर्थिक घडामोडीचा इतिहास हा इतिहास लेखनातील एक नवा प्रवाह म्हणून पुढे आला. यानंतरच कामगार, शेतकरी, शोषित, पीडीत इत्यादींचे इतिहास रेखाटण्याचे काम प्रत्येक देशातील इतिहासकार करू लागले. माणसांच्या कृती त्यांच्या आर्थिक गरजांतून व हितसंबंधातून निर्माण होतात. हा विचार १९ व्या शतकात एकदम नव्याने सांगितला गेला असे नाही. यापूर्वी काही विचारवंतानी हा विचार मांडला होता. पण इतिहासाचे आर्थिक, भौतिक दृष्ट्या विश्लेषण खऱ्या अर्थाने मार्क्सनेच प्रथम केले.

कार्लमार्क्स आणि हेगेलच्या तत्वचितंनातून भूतकाळाकडे पाहण्याची एक वेगळीच दृष्टी आधुनिक इतिहासकारांना लाभली. इतिहास म्हणजे केवळ राजघराण्यांचा उदय आणि अस्त यांची कहाणी नसून ती सामान्य माणसाच्या जीवनाची कहाणी आहे. इतिहास म्हणजे मानवाची कथा आहे. हे सूत्र घेऊन मार्क्सवादींनी इतिहासाचे संशोधन करण्यास, अन्वयार्थ लावण्यास सुरूवात केली. इतिहासाची वाटचाल सरळ एका रेषेत न होता ती चक्राकार गतीने होते आणि हे चक्र प्रस्थापित व्यवस्थेविरूद्धची प्रतिक्रिया आणि त्यातील संघर्षातून निर्माण होणारी नवी व्यवस्था या गतीने वाटचाल करते हा विचार प्रभावी बनला. इतिहासाचे नवे कालखंडानुकरण सुचविले गेले. इतिहास हा अधिकाधिक वस्तुनिष्ठ कसा लिहावा हे सांगितले जाऊ लागले व हळूहळू हा मार्क्सवादी इतिहास लेखन शास्त्राचा प्रवाह पुढे आला. त्याचा स्पष्ट परिणाम इतिहास लेखनावर दिसू लागला. गतकालीन वाटचालीत सामान्य समाजाचा सहभाग शोधला जाऊ



Scanned with ACE Scanner

लागला. सामान्य माणसाचे शोषण, त्याची दुरावस्था, ह्याच्यावर होणारा अन्याय हा अभ्यासाचा विषय झाला. हाच मार्क्सवादी विचार प्रवाह होय. प्राचीन भारताचा अभ्यास करणारे डी.डी. कोसंबी, रोमिला थापर, बिपीनचंद्र, सुमीत सरकार, बग्गाराम तुळपुळे, कॉ. शरद पाटील, आर. एस. शर्मा, इरफान हबीब, गेल ओमव्हेट, हिरेन मुखर्जी ही भारतातील मार्क्सवादी इतिहासकारांची काही नावे उदाहरणादाखल सांगता येतील. ह्या प्रवाहाचा संस्थापक कार्लमार्क्स ह्याचे इतिहासा संबधीचे विचार त्यासाठी प्रथम समजावून घेतले पाहिजे. मार्क्सच्या मूळ विचारांचा गाभा लक्षात घेतल्याशिवाय आपण अन्य इतिहासकारांचा विचार करू शकत नाही.

१) **कार्ल मार्क्स** - मार्क्सचे पूर्वचरित्र - ५ मे १८१८ रोजी रशियातील ट्रेवलेस येथे मध्यमवर्गीय कुंटुंबात कार्ल मार्क्सचा जन्म झाला. लहानपणापासून मार्क्स अतिशय हुशार होता. त्याला तत्वज्ञान कायदा इतिहास असे विषय आवडत होते. प्राथमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्याने बॉन विद्यापीठात प्रवेश घेतला. १८४१ मध्ये त्याने Doctor of Philsophy ही पदवी प्राप्त केली. शिक्षण पूर्ण झाल्यावर बॉन विद्यापीठामध्ये प्राध्यापक म्हणून नोकरी करण्याची त्यांची इच्छा होती. मात्र त्यांच्या क्रांतीकारक विचारामुळे त्याला ही जागा मिळवता आली नाही. आणि तो पत्रकारितेकडे वळाला 'Venice times' या वृत्तपत्राचा संपादक म्हणून त्याने काम केले. त्यांच्या क्रांतीकारक विचारांचे पडसाद वृत्तपत्रातून उमटू लागले. परिणामी त्याला जर्मनीतून पळ काढावा लागला. पॅरिस येथे राहत असताना त्याचा काही क्रांतीकारक तत्त्ववेत्यांशी संबंध आला. प्रौंन्धा आणि लुई ब्लॅन्क या समाजवादी फ्रेंच विचारवंतामुळे त्याने फ्रेंच कम्युनिझम आणि राजकीय अर्थशास्त्र यांचे अध्ययन केले. या सुमारास त्याची Fedric Angales याच्यांशी भेट झाली आणि या भेटीचे पुढे गाढ मैत्रीत रूपांतर झाले. मार्क्सने आपल्या आयुष्यात अनेक ग्रंथ लिहले. परंतु त्याने आणि Angales ने लिहलेले **'साम्यवादी पक्षाचा जाहीरनामा व DAS CAPITAL'** हे दोन ग्रंथ सर्वात अधिक प्रसिद्ध पावले.

१८६४ मध्ये त्याने आंतरराष्ट्रीय समाजवादी संघटना ही मजुर संघटना स्थापन केली तो ३४ वर्ष इंग्लंडमध्ये होतो. पण पैशाच्या अभावी त्याला दारिद्र्यात जीवन कंठावे लागले. जगातील शोषित वर्गाचे प्रश्न सोडविणारे तत्त्वज्ञान मांडणाऱ्या कार्ल मार्क्सच्या जीवनातील आर्थिक प्रश्न मात्र कधीच सुटला नाही. असा हा जेष्ठ साम्यवादी विचारवंत १८ मार्च १८८३ ला



Scanned with ACE Scanner

मरण पावला.

**मार्क्सचे ग्रंथलेखन** - कार्ल मार्क्सने आपल्या प्रदीर्घ कारकीर्दीत विविध ग्रंथातून समाजवादी विचारसरणी प्रकट केली. त्याच्या लिखाणातून कामगारांची क्रांती, वर्गविरहित समाज, राज्य विरहित समाज भांडवलशाही समाजाचे दोष, आर्थिक शोषण, वर्ग संघर्ष अशा विषयांवर त्याने विपुल लेखन केले.

**मार्क्सचे तत्त्वज्ञान** - मार्क्सने Communist Manofesto मध्ये आर्थिक बाबीवर आधारलेल्या औद्योगिक क्रांतीच्या संघर्षाच्या काळातील भांडवलादार, मजुर यांच्यातील संघर्ष : भांडवलशाहीची नाशाकडे चाललेली वाटचाल, मजुरांची संघशक्ती इत्यादी संबंधी विचार मांडले आहेत. मार्क्सचा दुसरा ग्रंथ म्हणजे Das Capital तो त्याने १८६७ मध्ये लिहीला. या ग्रंथाचे २ खंड असून त्यापैकी पहिला खंड मार्क्सच्या हयातीमध्ये प्रसिद्ध करण्यात आला व उरलेले दोन खंड मार्क्सच्या मृत्यू नंतर त्यांचा परमप्रिय मित्र Angels ने १८८५ - १८९४ मध्ये प्रसिद्ध केले. याच ग्रंथात त्याने **अतिरिक्त मुल्यांचा सिद्धांत भांडवलशाहीचे दोष ऐतिहासिक भौतिक वाद, दारिद्र्य, बेकारी व शोषण विरहित राज्याची स्थापना** इत्यादी विचार मांडले आहेत. **द्वंद विकासी भौतिक वाद** हे साम्यवादाचे मुलभूत तत्वज्ञान समजले जाते. ते मार्क्सने मांडलेले दिसते.

**मार्क्सचे इतिहासासंबंधीचे विचार** - कार्ल मार्क्सने इतिहासाचा बारकाईने अभ्यास करून इतिहास प्रक्रियेविषयी जो सिद्धांत मांडला. त्याला **भौतिक वादी सिद्धांत किंवा विरोध विकासीवाद** म्हटले जाते. मार्क्सच्या मते, जगातील प्रत्येक वस्तुचा दुसऱ्या वस्तुशी संघर्ष होत असतो आणि अशा संघर्षातून परिवर्तन घडत घडत विकास होत असतो. भौतिक सृष्टीमध्ये प्रत्येक पदार्थात विशिष्ट असे परस्पर संबंध असतात. प्रत्येक वस्तुला गती असते व या गतीमुळे त्या वस्तुत बदल होत असतात. सृष्टीतील वस्तुमध्ये एक स्थिर आणि निश्चित स्वरूपाचा संबंध असते. निसर्ग आणि समाज या दोन्ही गोष्टी परिवर्तनशील आहेत. परिवर्तन होत असताना कार्यकारण संबंध जोडला जातो. जगाचा अभ्यास करत असताना मार्क्सने विकासाचे तीन टप्पे गृहित धरले आहेत. पहिला टप्पा हा वाद, दुसरा प्रतिवाद, तिसरा संवाद असे हे तीन टप्पे होत. याठिकाणी मार्क्सने हेगेलचे सही सही अनुकरण केले आहे. दोन वस्तुमध्ये वाद त्यातून संघर्ष आणि संघर्षातून संवाद अशा प्रक्रियेने प्रगती होत असते. समाजाप्रमाणेच इतिहासाचे स्वरूपसुद्धा गतीमान असुन सतत बदलणारे आहे. जगातील सर्व बदल हे मानवी विचारातून आणि वैचारिक संघर्षातून घडलेले आहेत.



Scanned with ACE Scanner

मार्क्सच्या मते, उत्पादनाच्या स्थित्यंतरानुसार सामाजिक आणि आर्थिक स्थित्यंतरे घडून येतात. त्यामुळे संरजामशाही भांडवलशाही व समाजवादी समाजरचना ही स्थित्यंतरे घडून येतात. समाजामध्ये दोन मोठे गट असतात. एका गटाच्या हातात उत्पादनाची साधने असतात तर दुसऱ्या गटाच्या हातात श्रम हे साधन असते. या दोन गटातील संघर्षामधूनच समाज दुसऱ्या स्थितीत पदार्पण करीत असतो. उदा. संरजामशाही मध्ये सरंजामदार आणि गुलाम भूदास यांच्यात संघर्ष सुरू झाला. याच काळात औद्योगिक क्रांती होऊन सरंजामदारांचे भांडवलदार वर्गात रूपांतर झाले. गुलामाचे मजुरामध्ये रूपांतर झाले. म्हणून भांडवलदार म्हणजे वाद आणि मजुर म्हणजे प्रतिवाद असा वर्ग किंवा वाद निर्माण झाला. त्यांच्या संघर्षातून संवाद निर्माण होऊन नवी साम्यवादी समाजरचना निर्माण झाली. मार्क्स म्हणतो, मानवी इतिहासामध्ये आर्थिक घटकांना महत्व असुन मानवी जीवनाचा पाया आर्थिक प्रश्न हाच आहे. मानवी इतिहासामध्ये आर्थिक उत्पादनाची साधने आणि विनिमयाची पद्धती यांच्यामध्ये जे संबंध असतात. त्यांच्या आधारेच समाजरचना निर्माण होत असते. परंतु अशी समाज रचना कायमस्वरूपाची नसते. प्रत्येक कालखंडामध्ये उत्पादनाची साधने आणि विनिमयाची पद्धती यांच्यामध्ये जे संबंध असतात. त्यांच्या आधारेच समाजरचना निर्माण होत असते. परंतु अशी समाजरचना कायमस्वरूपाची नसते. प्रत्येक कालखंडामध्ये उत्पादनाची साधने आणि विनिमयाची पद्धत यांच्यात संघर्ष होत असतो. अशा संघर्षातून बदल घडत असतो. उत्पादनाची साधने परिवर्तनशील असुन गतीमान असतात. या सगळ्याच्यां मुळाशी आर्थिक बाब ही महत्वाची असते आणि त्यातून सामाजिक व राजकीय तत्वज्ञान तयार होत असते. उत्पादन पद्धतीमुळे समाजात दोन वर्ग निर्माण होतात. त्यापैकी एका वर्गाकडे साधने व संपत्ती असते. म्हणून त्याला 'आहेरे' असे म्हणतात व दुसऱ्या वर्गाकडे श्रम आणि कष्ट असतात. परंतु संपत्ती व साधने नसतात. म्हणून अशा वर्गाला 'नाहीरे' वर्ग म्हणतात.

मार्क्स म्हणतो जगामध्ये आहेरे आणि नाहीरे यांच्यातील संघर्ष अनादिअनंत काळापासून चालत आलेला आहे. यामुळे मानवी इतिहासाचे विश्लेषण करीत असताना मार्क्स म्हणतो. ''आजपर्यंत जगाचा इतिहास हा वर्ग कलहाचा इतिहास आहे. म्हणजेच समाजाचा इतिहास हा प्रामुख्याने उत्पादन पद्धतीचा इतिहास आहे.'' मार्क्सने इतिहासाचा अन्वयार्थ लावत



Scanned with ACE Scanner

असताना. एक महत्त्वाचा नियम शोधून काढला तो म्हणजे उत्पादकशक्ती उत्पादन संबंध यामध्ये सुसंगतीचा नियम असतो. जोपर्यंत अशी सुसंगती असते तोपर्यंत समाजाचा विकास होत असतो. मानवी समाजाचा विकास अशा पाच अवस्थामधून झाला आहे. असे त्याने दाखवून दिले.

१) प्राचीन साम्यवाद
२) गुलामगिरीचा कालखंड
३) संरजामशाहीचा कालखंड
४) भांडवलशाहीचा कालखंड
५) समाजवादी समाजरचना

**१) प्राचीन साम्यवाद** - मानवाची प्राचीन अवस्था आदिम अवस्था होती. त्यालाच आदिम समूह असे म्हटले असे. आदिम अवस्थेत लोक एकत्र टोळ्या करून राहत होते. संरक्षण अन्नप्राप्ती व इतर प्राथमिक गरजा यासाठी ते एकत्र राहत होते. या अवस्थेतील मानवाकडे कला नव्हती. पशुपालन, शेती, किंवा इतर व्यवसाय त्यांना येत नव्हते. निसर्गात जे मिळेल तेच खाऊन ते निर्वाह करीत प्राण रक्षण करण्यासाठी दगडी हत्यारे वापरीत. उत्पादन सामूहिक पद्धतीने केली नाही म्हणूनच मार्क्सने या अवस्थेला **प्राचीन साम्यवाद** असे म्हटले आहे.

**२) गुलामगिरीचा कालखंड** - अनेक शतके मानवाने निसर्गावस्थेत काढली. पुढील काळात उत्पादन साधनात बदल होत गेले. नवनवीन शोध लागले. शेती पशुपालन हस्तव्यवसाय केले जाऊ लागले. भटकी अवस्था संपून कुटुंब व्यवस्था निर्माण झाली. एका जागी राहू लागल्यानंतर मालमत्तेची कल्पना उदयास आली. काही लोकांकडे मालमत्ता तयार झाली. तर काहींकडे ती नव्हती. ज्याच्यांकडे नव्हती, ते असणाराकडे गुलाम म्हणून काम करू लागले. असणाऱ्या लोकांना 'मालक' म्हटले जाऊ लागले. तर राबणाऱ्या किंवा श्रमिक गटांना 'गुलाम' किंवा 'दास' म्हटले जाऊ लागले. मालक वर्गाकडून गुलाम वर्गाला उदर निर्वाहापुरता मोबदला दिला जात होता. म्हणूनच याला 'गुलामगिरीचा कालखंड' म्हटले आहे. याच कालखंडात संरजामशाहीचा उदय झाला.

**३) सरंजामशाहीचा कालखंड** - मध्ययुगीन कालखंडात सरंजामशाही समाज रचना होती. सरंमजामशाहीमध्ये सरंजाम आणि त्यांच्या वर अवंलबून असणारा भूदासाचा वर्ग असे दोन वर्ग तयार झाले. या दोन्ही वर्गातील संबंध



Scanned with ACE Scanner

अपरिवर्तनीय बनले. उत्पादनाची साधने आणि संपत्ती यावर मालकी असे. मात्र भूदासाकडे श्रम हीच संपत्ती असे सरंजामदाराकडून भूदासाचे आर्थिक शोषण केले जात असे. त्यातूनच भांडवलशाही अर्थव्यवस्था उदयास आली.

४) **भांडवलशाही कालखंड** - युरोपमध्ये १८ व्या शतकात औद्योगिक क्रांती झाली सरंजामदार वर्गाने उत्पादन साधनावर पैशाच्या जोरावर मालकी निर्माण केली. या सरंमजामदारातूनच भांडवलदाराचा वर्ग उदयास आला आणि पूर्वी भूदास म्हणून काम करणारा वर्ग कारखान्यामध्ये मजूर म्हणून काम करू लागला. त्यामुळेच या कालखंडात भांडवलदार आणि मजूर अशा संघर्षाला सुरूवात झाली. गुलामगिरीच्या काळात प्रत्यक्ष माणसाला विकले जात होते. पण भांडवलशाहीच्या काळात माणसाचे श्रम विकले जाऊ लागले. कामगाराना त्याच्या श्रमाचा योग्य मोबदला मिळत नव्हता. त्यांचे आर्थिक शोषण केले जात होते. मजूरांना त्यांच्या आर्थिक गरजा भागविता येत नव्हत्या. त्यामुळे भांडवलदार आणि मजूर या दोन वर्गात संघर्षाला सुरूवात झाली. मार्क्सने **अतिरिक्त मूल्य सिद्धांत मांडून** मजुराना श्रमापेक्षा कमी पैसा मिळतो आणि अतिरिक्त नफा भांडवलदाराच्या खिशात जातो. हे दाखवून दिले. समाजाची जर प्रगती करायची असेल तर जगातील सर्व कामगारांनी एकत्र येऊन भांडवलदारा विरूद्ध लढा द्यायला हवा. त्यासाठी साम्यवादी विचारसरणीचा आधार घ्यावा लागेल. या अवस्थेतूनच समाजवादी समाजरचना निर्माण होईल असे मत व्यक्त केले गेले.

५) **समाजवादी समाजरचना** - मार्क्सच्या मते, समाजाची समाजवाद ही उन्नत अवस्था आहे. या अवस्थेत सर्व समाज एक संघ होतो. कामगाराचे भांडवलदाराकडून होणारे आर्थिक शोषण आणि त्यामधून होणाऱ्या वर्ग संघर्षात शेवटी क्रांती होते. भांडवलदार वर्ग नष्ट होतो. आणि कामगाराची हुकूमशाही निर्माण होते. उत्पादनाची सर्व साधने आणि संपत्ती समाजाच्या मालकीची होईल. समाजात कोणताही वर्ग राहत नाही व साम्यवादी समाजरचना निर्माण होईल. वर्गरहित समाजरचना निर्माण झाल्याने राज्याची गरज उरत नाही. साम्यवाद म्हणजे मार्क्सच्या मते, वर्गविरहित आणि राज्यविरहित समाजरचना होय. अशा समाज रचनेमध्येच मानवाची उन्नती किंवा प्रगती होऊ शकते.

**मार्क्सच्या मताचे मूल्यामापन** - मार्क्स धर्माला अफूची गोळी समजतो. तो म्हणतो, ''धर्मामुळे आर्थिक संघर्षाची धार बोथट होते. धर्माच्या शिक्षणामुळे अज्ञानी जनता आपली दुःख आणि अन्याय शांतपणे सहन करायला शिकते.



Scanned with ACE Scanner

प्रबळ लोक दुर्बळ लोकांना ईश्वराची भीती दाखवतात. त्याचा फायदा भांडवलदार वर्ग घेतो. मानवाच्या खऱ्या दुःखाचे कारण पैसा आहे. मात्र धर्मामुळे त्याकडे दुर्लक्ष करण्यास भाग पाडले जाते. मार्क्स म्हणतो, जर दुःखाचा त्याग करायचा असेल तर धर्मापासून फारकत घ्यायला पाहिजे. कार्ल मार्क्सने आपल्या क्रांतीकारक विचारांनी इतिहासाच्या मीमांसेत भर घातली इतिहासातील दैववादाला त्याने विरोध केलेला आहे. मानवी इतिहासाला तो वर्ग कलहाचा इतिहास म्हणतो. कारण समाजाच्या भौतिक प्रगतीसाठी मार्क्सला हा वर्ग कलह आवश्यक वाटतो. रशिया, चीन, आणि इतर साम्यवादी देशांत इतिहासकारांनी मार्क्सच्या विचाराचा उपयोग करून इतिहासाची नव्या दृष्टीकोनातून मांडणी केली. नवमार्क्सवादी मात्र मार्क्सची संघर्षवादी विचार सरणी संकुचित आहे असे समजतात. कारण, मार्क्सने फक्त नकारात्मक भूमिका घेतली आहे. त्याला सकारात्मक दृष्टीने पाहून त्याला नवरूप देण्याचे काम नवमार्क्सवाद्यांनी केलेले आहे.

मानवी जीवनातील स्पर्धेचा अभ्यास होकारात्मक दृष्टीकोनातून नवमार्क्सवादी करतो. नवमार्क्सवाद उद्याच्या जगाच्या परिस्थितीचा विचार करू लागला आहे. स्वार्थापेक्षा निःस्वार्थाला महत्व आले आहे. म्हणून नवमार्क्सवादी म्हणतात. निग्रोच्या हक्कासाठी गोऱ्यांनी संघर्ष करावा. जमीन सुधारण्यासाठी जमीनदारांनीच आग्रह धरावा. वरिष्ठांनी कनिष्ठाचा, विकसित लोकांना अविकसितांचा, श्रीमंतानी गरीबांचा विचार करणे अपेक्षित आहे. म्हणून नवमार्क्सवाद समाजातील द्रारिद्र्य उपभोग्यवादी दृष्टीकोन दुर्बलता औद्योगिक अस्थापना या विचारांचा नवमार्क्सवाद विचार करतो. सी. राईट मिल्स, डेव्हिड डीसमन ड. हेडॉल्व, ल्युईस लुईस कोझर राल्ट डरेडार्फ या लोकांनी नवमार्क्सवादाचा विचार मांडला.

**२) डी. डी कोसंबी अर्थात डॉ. धर्मानंद दामोदर कोसंबी (१९०७ ते १९६६) -**

**भारतीय मार्क्सवाद -**

**१) दामोदर धर्मानंद कोसंबी** - मार्क्सवादी प्रभावातून लिखाण करणारे भारतातील प्रभावी इतिहासकार म्हणजे दामोदर धर्मानंद कोसंबी होत इतिहास तत्वचिंतन संशोधन व लेखन यातून कोसंबी यांच्या कार्याची कल्पना येते. त्याचे शिक्षण अमेरिकेत केंब्रींज विद्यापीठात तसेच हॉवर्ड विद्यापीठात झाले. तेथील शैक्षणिक वातावरणाचे अनुभव त्यांना मिळाले. कुशाग्र बुद्धीमत्ता, अखंड



Scanned with ACE Scanner

परिश्रम करण्याची तयारी, संशोधकाला आवश्यक चिकीत्सक वृत्ती यातून त्यांच्या व्यक्तीमत्वाचा विकास होत गेला. नाणी संकलन व त्यांच्या अभ्यासातून त्यांनी त्या - त्या काळातील परिस्थिती विवेचन करण्यासाठी अनेक साधनांचा वापर केला. संस्कृत भाषेचा अभ्यास केला. पुराण वस्तु संशोधना बरोबर इतिहास पूर्वकाळा संदर्भात सखोल अभ्यास केला. त्यातून इतिहासाचे चित्र उभे केले. त्यामुळे मूळचे गणिताचे प्राध्यापक असलेले कोसंबी इतिहासकार बनले. त्यांनी विज्ञाननिष्ठ ग्रंथ निर्मिती केली. त्यांच्या कार्यामुळे त्याची जगभर प्रसिद्धी झाली. त्यांनी विविध स्वरूपाचे लेखन केले. त्यांनी स्वतः चार ग्रंथ लिहीले आणि पाच ग्रंथ संपादीत केले. त्यांनी एकूण १२७ लेख प्रसिद्ध केले. भारतीय इतिहासाचे पुर्नलेखन व्हावे असा आज वाढीला लागलेला विचार डॉ. डी. कोसंबीनी अनेक दशकापूर्वीच मांडलेला आहे भारताचा इतिहास परक्यांनी लिहीला तो परकीय दृष्टीकोनातून लिहिला, पण आता हा दृष्टीकोन बदलायला हवा हा विचार त्यांनी मांडला. भारतीय इतिहासाला आधुनिक जगाच्या तंत्राप्रमाणे परिपूर्ण पायावर उभे करायचे असेल तर कोसंबीच्या इतिहासाची तत्व लक्षात घ्यावी लागतील. कोसंबीना समाजात काही बदल दिसतात. त्यांच्या मध्ये खेड्यांची जनसंख्या वाढली त्याअर्थी उत्पादनाच्या संघटनेत बदल झाला असला पाहिजे. कोसंबीनी प्राचीन राजसत्तांच्या संघर्षाचा इतिहास लिहिताना या घटनाचा अन्वयार्थ मार्क्सवादी दृष्टीकोनातून लावण्याचा प्रयत्न केला. कोसंबीच्या मते, इतिहास म्हणजे साधन आणि उत्पादन यांच्या परस्पर संबधातील एक अनुक्रमावर आधारित अशी घटना होय. कोसंबीच्या **"An introduotion to the study of Indian History"** या ग्रंथाने वादळ निर्माण केले. त्यामुळे संशोधनाचा रोख उत्पादन तंत्राकडे वळला. प्राचीन भारतीय इतिहास आणि संस्कृतीचे त्यांनी वेगळ्या प्रकारे विश्लेषण केले आहे. त्यांनी ज्या-ज्या कल्पना मांडल्या त्या क्रांतीकारक स्वरूपाच्या आहेत. जातीय, जमातवाद त्यांना मान्य नाही. संस्कृती विज्ञान आणि मानववंश शास्त्राच्या अभ्यासादृवारे महाराष्ट्रात जाती कशा निर्माण झाल्या यांचा अन्वयार्थ त्यांनी लावला. भारतीय समाजाचे स्थित्यंतर हे आर्थिक बदलामुळे होत गेले असे ते म्हणतात. तर्कशुदध विचारसरणी आणि मार्क्सच्या आर्थिक दृष्टीकोनातून त्यांनी केलेले इतिहासाचे संशोधन लेखन यामुळे इतिहासात एक नवा प्रवाह त्यांनी निर्माण केला. त्याचा मोठा प्रभाव आज ही दिसून येतो.



Scanned with ACE Scanner

डी.डी.कोसंबी यांचे काही ग्रंथ

1) Culture and Civilization of Ancient India in Historica Outline (1983)
2) Myth and Reality in Indian History
3) Exercise in Dylectical Method

इतिहास म्हणजे साधन व उत्पादन यांच्या परस्पर संबधातील एक उपक्रमावर आधारित अशी घटना होय. ही व्याख्या ते An Introduction to the Study of Indian History या ग्रंथात देतात.

बौद्ध धर्माच्या ऱ्हासासंबधीची त्यांची चिकीत्साही आर्थिक निकषांवरच अवलंबून आहे असे ते म्हणतात. कोसंबी यांनी प्राचीन भारतीय इतिहासाचे व संस्कृतीचे नव्या पद्धतीने विश्लेषण करून मार्क्सवादाने त्याची मांडणी केली. नाणेशास्त्र, पुरातत्वशास्त्र, मानवशास्त्र, समाजशास्त्र, संख्याशास्त्र यांचा उपयोग विश्लेषण पद्धतीसाठी केला. प्राचीन भारतातील गुलामगिरीचे त्यांनी विश्लेषण केले आहे. व भारतातील गुलामगिरीचे नेमके स्वरूप स्पष्ट केले आहे. कोणत्याही सामाजिक संक्रमणाचा पाया आर्थिकच असतो असा मार्क्सवाद्यांचा सिद्धांत प्रमाण मानून प्राचीन भारतीय इतिहासाचा ते मागोवा घेतात. सिंधू संस्कृतीतील लोकांनी मेसोपोर्टेमियन लोकांप्रमाणे अतिरिक्त उत्पादन का केले नाही? गुप्तांनी संस्कृत वाङमयाचा जसा मोठा विकास केला तसा मौर्यानी का केला नाही? बौद्धधर्म, जैनधर्म, अजीवक व इतर धर्मपंथ एकाचवेळी उदयास आले व तेही मगध साम्राज्यातच का? या विविध प्रश्नांची उत्तरे मार्क्सवादी दृष्टीकोनातून शोधण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

कोसंबी यांनी बौद्ध धर्माच्या तत्वज्ञानाच्या प्रसारासाठी अनेक मराठी ग्रंथ लिहीले. आनंदविहार, बहुजनविहार या संस्था त्यांनी स्थापन केल्या.

कोसंबीनी अत्यंत सखोल व अर्थपूर्ण असे इतिहासलेखन केले. आर्थिक व सांस्कृतिक इतिहासावरच त्यांनी भर दिला. विज्ञानदृष्टी व चिकीत्सा हे दोन गुण प्रामुख्याने त्यांच्यात असल्याने त्यांनी एकाहूनएक महत्वपूर्ण विचार व संकल्पना मांडल्या. इतिहासाचे प्रश्न नव्याने विचारण्याची पद्धती उदयास आली व हेच कोसंबीचे मुख्य योगदान होय.

**३) रोमिला थापर** (सविस्तर माहिती प्रकरण नं. ७ मध्ये पहावी)

**४) डॉ. आर.एस. शर्मा** - आर. एस. शर्मा यांचा जन्म १९२० मध्ये बिहारमध्ये बरोनी येथे झाला. भागलपूर व पाटणा येथील महाविद्यालयात त्यांनी काही काळ अध्यापन केले. १९५८ ते ७३ या काळात ते पाटणा



Scanned with ACE Scanner

विश्व विद्यालयात इतिहासाचे प्राध्यापक व विभाग प्रमुख होते. १९७३ ते ७८ या काळात ते दिल्ली विश्व विद्यालयात इतिहासाचे प्राध्यापक व विभाग प्रमुख होते. इंडियन हिस्ट्री कॉंग्रेसचे ते सभापती होते. आर. एस. शर्मा यांचे ग्रंथ भारतीय भाषांशिवाय जपानी, फ्रेंच, जर्मनी, रशियन वैगेरे भाषेतूनही प्रसिद्ध झाले आहेत. त्यांचे ग्रंथ इंग्रजी व हिंदी भाषेत आहेत. मार्क्सवादी दृष्टीकोनातून इतिहास लेखन करणारे आर. एस. शर्मा हे प्रसिद्ध इतिहास संशोधक आहेत. त्यांचे ग्रंथ पुढील प्रमाणे

**१) भारतीय सामंतवाद**

**२) प्राचीन भारत में राजनितीक विचार एवं संस्थाएँ**

**३) शूद्रोंका प्राचीन भारत**

**४) प्राचीन भारत में भौतिक प्रगती और सामाजिक संरचानाएँ**

**५) प्राचीन भारत के नगरों का पतन**

**६) Ancient India (1980)**

त्यांच्या Ancient India हा ग्रंथ प्रामुख्याने पुरातत्वीय साधनांवर आधारित आहे. त्यांच्या ग्रंथातून त्यांनी भारतीय नगरांचे पतन, तत्कालीन शिल्प, व्यापार, शिक्के यांचा अभ्यास केलेला आहे. गुप्त व गुप्तोत्तर काळावरही त्यांनी प्रकाश टाकलेला आहे.

आर. एस. शर्मा यांच्या मते ''राजनैतिक विचारांच्या मागे जाती, वर्ण, धर्म व अर्थव्यवस्था यांची भूमिका समजून घेतल्याशिवाय राजनैतीक विचार समजून घेता येत नाहीत.''

**५) इरफान हबीब -** मार्क्सवादी इतिहास लेखकांच्या मते, मध्ययुगीन भारताचा इतिहास समजून घ्यायचा असेल तर तो मुघल - मराठा संघर्षातून समजणार नाही. तर तत्कालीन शेतकऱ्यांच्या, कामकऱ्यांच्या परिस्थितीतून तसेच त्यांच्या आर्थिक घडामोडींच्या वृत्तांतातून समजून घ्यावा लागले ही भूमिका घेऊनच इरफान हबीब यांनी इतिहास लेखनास प्रारंभ केला. त्यांचे इतिहास लेखन हे प्रामुख्याने मध्ययुगीन इतिहासासंबधी आहे. मोगलांच्या राजकीयच नव्हे तर आर्थिक इतिहासाचा त्यांनी मागोवा घेतला.

**इरफान हबीब यांचे ग्रंथ -**

**1) The Agrarian system of the Mughal.**

**2) The Atlas of the Mughal Empire**

**3) Karl Marks**

**4) Cambridge Economic History of India**



Scanned with ACE Scanner

6) Medieval India (Vol I, II, III (ed.)

त्यांनी **Agrarian systems of the Mughal** या ग्रंथात शेतीच्या क्षेत्रातील उत्पादनाची साधने जमीनदारांच्या ताब्यात कितपत होती? शेतीच्या मालकी संबधात नेमकी काय अवस्था होती हे दाखवून दिले आहे. १९५६ ते १६०७ या काळातील शेतीविषयक विस्तृत आढावा त्यांनी घेतला आहे. शेती ह्या इतिहास संशोधनातील दुर्लक्षित पैलूवर आपल्या संशोधनातून इरफान हबीब यांनी प्रथमच प्रकाश टाकल्याने हा ग्रंथ महत्वाचा आहे.

The Atlas of the Mughal empire हा ग्रंथ १७५ पानांचा असून त्यात विस्तृत टिपणीसह ३३ नकाशे आहेत. १९८२ ला ऑक्साफर्ड युनिर्व्हसिटी प्रेसने हा ग्रंथ प्रकाशित केला. तर कार्लमार्क्स ह्या ग्रंथातून सोप्या भाषेत त्यांनी मार्क्सच्या तत्वज्ञानाची ओळख करून दिली आहे. तर The cambridge Ecomic History of India हा ग्रंथ त्यांनी व तपन रायचौधरी यांनी मुख्यसंपादक म्हणून संपादीत केला असून तो तीन खंडात आहे. या ग्रंथाच्या अन्य संपादन मंडळात सतीशचंद्र, नरूलहसन, रामशरण शर्मा, डॉ. ए. आर. कुलकर्णी, सय्यद हसन वगैरे मंडळी आहेत. १२०० ते १७०७ पर्यंतच्या काळाचा आर्थिक इतिहास या ग्रंथात आहे. भौगोलिक परिस्थिती, शेती, व्यापार, उत्पादने व मुद्रा अशा विविध विषयांवरील लेखांचा त्यात समोवश आहे.

इराफन हबीब यांनी वरील ग्रंथाशिवाय स्फूट शोधनिबंध ही अनेक नियतकालीकातून केले आहे. त्यांचा **Banking in Mughal India** हा लेख एका वेगळ्याच पैलूवर प्रकाश टाकतो.

जवाहरलाल नेहरू विद्यापीठ (जे.एन.यू.) मधला साम्यवादी विचारांचा प्रभाव असलेल्या इतिहासाच्या प्राध्यापकांपैकी एक उमदा संशोधक म्हणून इरफान हबीब यांची ख्याती आहे. वस्तुनिष्ठ दृष्टीकोनातून इतिहासाचे पुर्नलेखन करीत त्यांनी मार्क्सवादी विचार सरणी स्विकारली. दुर्लक्षित अश्या आर्थिक जीवनाचे अनेक पैलू त्यांनी प्रकाशात आणले. अलिगड विद्यापीठातील डॉ. नरूल हसन ' डॉ निझानी प्रो. रशीद - महंमद हबीब या साऱ्यांनी साम्यवादी दृष्टीकोनतून मध्ययुगीन इतिहासाचे पुर्नलेखन करण्याचा प्रयत्न केला. इरफान हबीब ह्यांची अलिगड विद्यापीठ संप्रदायातीलच अलिगड संप्रदाय किंवा स्कूल मधील साम्यवादी विचारसणीचे प्रतिनिधीक म्हणून आपण त्यांची माहिती पाहिली.

**६) मोहमंद हबीब १९१६ - २० -** या काळात ऑक्सफर्ड विद्यापीठात



Scanned with ACE Scanner

शिक्षण. **Father of Modern Muslim Historiograpty** म्हणून ते ओळखले जातात. पाशात्य इतिहास विचारधारा व सर सय्यद स्कूलचा त्यांच्यावर प्रभाव होता. गझनीच्या मंहमदाचे भारतावरील आक्रमण हे इस्लामच्या प्रचारासाठी नव्हते तर संपत्ती लुटणे व हवी ती मिळवणे यासाठी होते. अशी स्पष्ट भूमिका त्यांनी मांडली होती. मुस्लीम इतिहासकारांनी ते सच्चे मुस्लीम नाहीत. अशी टीका केली होती.

**७) डॉ. सुमीत सरकार** - आधुनिक भारताच्या इतिहास लेखनात विशेषतः स्वातंत्र्योत्तर भारतात साम्यवादी विचारप्रवाह प्रभावी राहिला. दिल्लीतील पंडित जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या निर्मितीनंतर साम्यवादी विचारांचे एक प्रमुख केंद्र इथे विकसित झाले. इतिहास अध्ययन अध्यापक क्षेत्रातही साम्यवादी आणि पुरोगामी विचारांचा एक प्रभावी गट इथे उदयाला आला हीच जे एन यू परंपरा होय.

डॉ. सुमीत सरकार यांच्या लिखाणाचा महत्वाचा पैलू म्हणजे त्यांच्या मते आतापर्यंतचा सारा इतिहास केवळ भारतातच नव्हे तर सर्वत्रच राजेराजवाड्यांपासून सुरू होतो. हा इतिहास वरच्या प्रभावशाली गटापासून सुरू होतो. आणि तेथेच तो विराम पावतो. या इतिहासाच्या नोंदीत समाजातील इतर घटकांची नोंदच असते. सामान्यांचा सहभाग शोधलाच जात नाही. तो शोधण्याचे कार्य डॉ. सुमीत सरकारांनी केले आहे. समाजातील सामान्याच्या बहुजनांच्या तळागाळातल्या दुर्लक्षित घटकांच्या योगदानाचा ध्यास त्यांना लागलेला होता. त्यातून १९८२ साली त्यांचा **Modern India** हा ग्रंथ मॅकमिलन या ख्यातनाम प्रकाशनाने (१८८५-१९४७) प्रकाशित केला. त्याच्या अनेक आवृत्त्या आतापर्यंत निघाल्या आहेत आधुनिक भारतावरच्या अनेक पुस्तकांपेक्षा सुमीत सरकार यांचे पुस्तक सर्वदृष्टीने वेगळे आहे. डॉ. सुमीत सरकारांनी आधुनिक युगाचा कालखंड १८८५ पासून गृहीत धरला. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात ब्रिटीशांच्या वसाहती राज्याची पाळेमुळे भारतात पक्की रूजली त्याचबरोबर मध्यमवर्गीयांच्या किंवा बुद्धीवाद्यांच्या आधारावर सुरूवातीला निर्माण झालेला राष्ट्रवाद ज्याला सुमीत सरकार Middle Class or Irtelligentia based all India Natioralizam म्हणतात तोही निर्माण झाला. आधुनिक युगाचा प्रारंभ इथे झाला अशी भूमिका सुमीत सरकार घेतात. भारतातील सामाजिक आणि राजकीय चळवळीचा आलेख रेखाटताना **हिस्टरी फॉर्म बिलो** नोंदवतात. त्यात ट्रायबल मुव्हमेंट, वासुदेव बळवंत फडकेचे बंड, मोपला उठाव, दरख्वनी



Scanned with ACE Scanner

बंडाचा समावेश ते करतात. भारतातील मध्यमवर्गीय जाणीव जागृतीचा संदर्भ देऊन ते राष्ट्रभक्तीची चर्चा करतात. आधुनिक भारतात परिवर्तनाची ही प्रकिया अजूनही चालू आहे. घडणार आहे अशी मांडणी त्यांनी केली आहे. रणजित गुहांच्या सर्बाल्टर्न हिस्टरीच्या खंडातूनही त्यांनी लेख लिहीले आहेत. पुरोगामी विचाराचा साम्यवादी अभ्यासक म्हणून मार्क्सवादी इतिहास लेखन शास्त्रात त्यांची कामगिरी उल्लेखनीय आहे. **रायटिंग ऑफ सोशल हिस्टरी तसेच बिब्लीयॉग्राफिकल सर्व्हे ऑफ सोशल रिफॉर्म मुव्हमेंट''** हे त्यांचे ग्रंथ सामाजिक सुधारणा चळवळीचा अभ्यास करणाऱ्या संशोधकांना उपयोगी आहेत.

८) **बिपीनचंद्र** - जे. एन. यू. परंपरेतील एक ख्यातनाम इतिहासकार म्हणून ओळखले जाणारे डॉ. बिपीनचंद्र हे मुख्यतः राष्ट्रीय चळवळ आणि भारतीय राष्ट्रवादाचा विचार करणारे साम्यवादी विचारवंत आहेत. साम्यवादी दृष्टीकोनातूनच त्यांनी भारतीय स्वातंत्र चळवळींचा मागोवा घेतला. आधुनिक भारताच्या संदर्भात त्यांचे नाव आवर्जून घेतले जाते. साम्राज्यवादी लेखकांनी भारताचे एक राष्ट्र म्हणून अस्तित्वच नाकारले होते. वास्तवात भारतीय समाजातून एक राष्ट्र अस्तित्वात होतेच सुप्त स्वरूपात ते साकारत होते. पण ही गोष्ट साम्राज्यवाद्यांनी नाकारली होती. बिपीनचंद्र यांना साम्राज्यवाद्यांची ही भूमिका कधीच पटली नाही. साम्राज्यवादी असे मानीत होते की, भारतीय स्वातंत्र्य चळवळ ही कधीच लोकचळवळ नव्हती. तर ती विशिष्ठ उच्चभ्रू गटाचे हितसंबध राखणारी चळवळ होती. भारतातल्या बहुजनांना त्याच्याशी काही देणे घेणे नव्हते. असा विचार केंब्रीज परंपरेतील विचारवंतानी मांडला मध्यमवर्गीय सुशिक्षितांनी आपले हित संबध राखण्यासाठी हत्यार म्हणून राष्ट्रवाद वापरला. अशीही त्यांची भूमिका होती. बिपीनचंद्रानी या सर्व विचारांचा परामर्ष घेत स्वतःचा स्वतंत्र विचार मांडलेला आहे.

साम्राज्यवादाला विरोध म्हणून राष्ट्रवादाने भारून लेखन करणाऱ्या विचारवंताबद्दल त्यांना असे वाटते की राष्ट्रवादी विचार करणारी ती मंडळी भारतीय समाजातील जात आणि जमातीच्या अंर्तविरोधाला कमी लेखीत आहे. त्यामुळे इतिहासातले वास्तव त्यांच्या हाती येत नाही आणि राष्ट्रवादाच्या आभासालाच ते सत्य मानतात. भारतीय समाजातील विसंवादी सूर टिपण्याचा हा त्यांचा प्रयत्न आहे. प्राथमिक आणि दुय्यम विसंवाद, त्यांच्यातील आंतरसंबध, स्वातंत्र्य चळवळींचे असले तरी वर्गीय स्वरूप, आहेरे गटांचा



Scanned with ACE Scanner

प्रभाव, त्यांचा समाजातील इतर घटकांशी संबंध अशा अनेक व्यापक सूत्रांचा विचार करीत डॉ. बिपीनचंद्र यांनी स्वातंत्र्य चळवळीचा आढावा घेतला आहे. बिपीनचंद्र यांचे ग्रंथ.

1) **Modern India (1885 -1947)**
2) **Rise and Growth of Economic Nationalism in India**
3) **Nationalism and colonialism in Modern India**
4) **Communalism in Modern India**
5) **India's struggle for freedom**
6) **Indian National Movement longterm Dynamix**

राष्ट्रवाद हा त्यांच्या चिंतनाचा प्रमुख विषय आहे. जमातवाद ह्या भारतीय राजकारणातील प्रमुख प्रवाहावरही त्यांनी प्रकाश टाकला आहे. वसाहतवादावरही त्यांनी लिखाण केले आहे. एक अत्यंत अभ्यासू लेखक म्हणून त्यांची प्रसिद्धी आहे. मूलगामी चिंतनशील असे त्यांच लिखाण आहे. काही काळ सबार्ल्टनच्या प्रवाह लेखनाकडेही ते आकर्षित झाले होते. पण शेवटी एक साम्यवादी प्रवाह वगळता साऱ्या प्रेरणा बाजूला ठेवून अत्यंत निखळ अशी वस्तुनिष्ठ भूमिका ठेवून लिखाण करण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

९) **गेल ओमव्हेट** - मूळच्या अमेरिकेच्या पश्चिम भारतातील ब्राह्मणेत्तर चळवळीवर पीएच. डी. संशोधन केले **Cultural revolt in a colonial society The Non - Branmin Movement in western India** हा ग्रंथ लिहीला. महात्मा फुले व स्त्री मुक्तीचा विचार तसेच Cultural revolt ह्या ग्रंथाचेही मराठीत भाषांतर झाले आहे. दिघे यांनी ते केले आहे. गेल ओमव्हेट यांच्या लिखाणावर मार्क्सवादाचा प्रभाव आहे.

१०) **कॉ. शरद पाटील** - हे थोर विचारवंत असून हिंदू, बौद्ध, जैन तसेच पाश्चात्य तत्वज्ञानाचे सखोल अभ्यासक आहेत. १) दासशूद्रांची गुलामगिरी (दोनभाग) २) मार्क्सवाद फुले - आंबेडकरवाद हे ग्रंथ प्रसिद्ध

याशिवाय मार्क्सवादी इतिहास लेखन शास्त्रात ए. आर. देसाई, के. एम. पण्णीकर यांच्या विचारांवर ग्रंथावर - मार्क्सवादाचा प्रभाव जाणवतो.

मार्क्सवादाची पुढची पायरी म्हणजे **सबाल्टर्न इतिहास लेखन** होय. त्याचा परामर्ष पुढे पाहू या.

## ५.४ सबार्ल्टन इतिहास लेखन/ वंचिताचा अभ्यास प्रवाह

इतिहास म्हणजे काय या मुलभूत प्रश्नाला तात्वीक बैठक प्राप्त झाली. इतिहास ही मानवी जीवनाची सर्वांगीण कथा आहे. सर्व इतिहास हा विचारांचा



Scanned with ACE Scanner

इतिहास आहे. इतिहास म्हणजे घटना वर्णने नसून त्यात अन्वयार्थ परिशीलन महत्त्वाचे असते. मानव जातीचा समग्र इतिहास हा वर्ग लढ्याचा इतिहास होय असे कार्ल मार्क्सने म्हटले आहे. **डी. डी. कोसंबीच्या** मते, राजे राजवाडे, राजपुत्र ऋषी, अशा महान व्यक्ती इतिहास घडवित नसून उत्पादन करणारा, कोरीव कामे करणारा, अवजारे बनविणारा, राबणारा समाज इतिहास घडवितो. **उत्पादन साधने आणि उत्पादन संबंध यातील बदल या क्रमाने घेतलेला वेध म्हणजे इतिहास** अशी त्यांनी व्याख्या केली. भारतातील इतिहास लेखनशास्त्र, केंब्रिज स्कुल, वसाहतवादी, राष्ट्रवादी, स्त्रीवादी साम्राज्यवादी, मार्क्सवादी अशा विविध प्रवाहांमध्ये विभागता येते. या पार्श्वभूमीवर भारतामध्ये १९८२ पासुन उदयाला आलेल्या सबाल्र्टन स्टडीज चा विचार करता येतो. इटालियन तत्वज्ञ मार्क्सवादी विचारवंत अंतनिओ ग्रामची (१८९१-१९३७) याने सबाल्टर्न ही संज्ञा पुढे आणली सबाल्र्टन याचा Oxford Dictionary मधील अर्थ ऑफ इनफिरीयर रँक असा दिला आहे. कनिष्ठ दर्जाचे कमी दर्जाचे असा शब्दशः अर्थ आहे. **डॉ. अरविंद देशपांडे यांनी सबाल्टर्नला वंचीत असा शब्दप्रयोग रूढ केला आहे.** आपल्या नैसर्गिक अधिकारापासून वंचति असलेले लोक किंवा गट यांचा यात समावेश करता येतो. ग्रामचीने आपल्या **प्रिझन नोटस** या ग्रंथात The notes on Indian History यामध्ये वंचितांच्या इतिहासा बद्दलची आपली कल्पना मांडली आहे. ग्रामचीच्या म्हणण्यानुसार सत्ताधारी वर्ग आणि वंचित वर्ग यांचा इतिहासाकडे पाहण्याचा दृष्टीकोन भिन्न - भिन्न असतो. सत्ताधारी वर्गाची एकी ही राजसत्तेशी निगडीत असते. म्हणून सत्ताधाऱ्यांचा इतिहास हा राजसत्तेशी निगडीत असतो. वंचितांचा इतिहास लिहिताना सत्ताधाऱ्यांनी आपले हितसंबंध सांभाळण्यासाठी केलेल्या अधिक्षेपाचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. त्यामुळे वंचितांचा इतिहास क्रमाक्रमाने येतो. इतिहासात ऐतिहासिक कृतीच्या एकीकरणाची शक्यता असते. आणि एकात्मतेला तडा जातो. म्हणून तो अल्पसा क्रमाक्रमाने येतो. ग्रामची वैचारिक प्रभुत्वाची किंवा अधिसत्तेची (Hegemony) संकल्पना मांडतो. अधिसत्तेची संकल्पना मांडताना त्याने नवमार्क्सवाद मांडला. उच्च वर्गाचे वैचारिक प्रतिनिधी सामाजिक संबंधाचे व संकल्पनांचे जाळे तयार करतो. त्यातुन अधिसत्तेचे धुरीकरण होते व वैचारिक वर्चस्व निर्माण होते. असे ग्रामची म्हणतो. सांस्कृतिक घटनातून हा वर्ग नैतिक संस्थांच्या माध्यमातुन आपले सांस्कृतिक प्रभुत्व निर्माण करतो. राजकीय घटकांमधून आर्थिक व दंड



Scanned with ACE Scanner

शक्तीमाध्यमातून दमन केले जाते व यामुळे या उच्चवर्णीयाचे समाजात प्रभुत्व निर्माण होते. वंचिताचा इतिहास अभ्यासताना सत्ताधाऱ्यांनी स्वतःचे हितसंबंध जपण्यासाठी वंचितामध्ये केलेला अधिक्षेप लक्षात घ्यावा लागतो. वंचितांचा इतिहास हा राज्यसंस्थेशी निगडीत असल्याने ग्रामचीने सहा मुद्द्यांतून वंचितांचा विचार करण्याचे सुचविले.

**१) आर्थिक उत्पादन प्रक्रियेत वंचित सामाजिक गटाची होणारी निर्मिती विकास आणि संक्रमण.**

**२) वर्चस्ववादी राजकीय प्रक्रियेशी त्यांचा सक्रीय आणि निष्क्रीय संबंध त्यांचा स्वतःचा त्या कार्यक्रमाशी असलेला संबंध त्यावर त्यांनी टाकलेला प्रभाव आणि स्वतःचा तांबा सांगण्याचा प्रयत्न.**

**३) वंचित गटांना नियंत्रण करण्यासाठी वर्चस्ववाद गटांच्या नवीन पक्षाचा जन्म.**

**४) स्वःचे अस्तित्व टिकविण्यासाठी वंचित गटाने केलेली निर्मिती.**

**५) जुन्या चौकटीत वंचित गटाचा स्वायत्तता मिळविण्याचा प्रयत्न.**

**६) एकूण एकात्म, अंतर्गत स्वायत्तता निर्माण करण्याचा वंचितांचा प्रयत्न.**

वंचित हे सत्ताधारी गटाचा, त्यांच्या कृतीचा भाग असतात. जेव्हा ते उठाव करतात व बंड करतात. तेव्हाही ते त्याचाच भाग राहतात. कायमस्वरूपी विषयामुळेचत्याचे दुय्यमत्त्व त्यांना नष्ट करता येते.

**१) रणजीत गुहा -** Oxford Univercity Press **१९८२ मध्ये**

प्रकाशित केलेल्या सबाल्टर्न स्टडीज भाग - १ **'writing on south asian History on soaiety'** हा ग्रंथ रणजीत गुहा यांनी संपादन केल्यामुळे भारतातील आणि आशिया खंडातील सबाल्टर्न इतिहास लेखनाला चालना मिळाली. भारत ब्रिटन आणि ऑस्ट्रेलीया येथे विखुरलेले भारतीय ब्रिटिश मार्क्सवादी इतिहासकार या लेखनामध्ये अग्रेसर होते. या सगळ्या इतिहासकारांना पहिल्या जगातील ज्ञानाचे प्रशिक्षण आणि अनुभव मिळाला होता. रणजीत गुहांनी पहिल्या खंडाच्या प्रस्तावनेत लिहील्याप्रमाणे दक्षिण आशियातील संशोधन आणि ज्ञान क्षेत्रातील अभिजन पक्षपातीपणा दुरूस्त करणे. हा याचा प्रमुख उद्देश होता. अभिजनांनी वंचितांना जाणीवपूर्वक आणलेले दुय्यमत्व, अंकीतता हे वर्ग, जात, वय, लिंग भाव पर आणि अन्य गोष्टी यांच्यासंदर्भात तपासले जाते. वंचितांच्या इतिहासाचा आणि समाजाचा अभ्यास करणे. यात



Scanned with ACE Scanner

अभिप्रेत आहे. इतिहास, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र त्याचबरोबर प्रवृत्ती, तत्वज्ञान, समजुती थोडक्यात संस्कृती आकाराला येत असताना सर्व बाबींचा विचार या वंचिततेत केला जाईल असे गुहा यांनी नमुद केले. अर्थात अभिजनांच्या भूमिकेची छाननी करणे आणि त्याच्या अन्वयार्थाचा वेध घेणे या अभ्यासात अपेक्षित आहे. वसाहतकालीन भारतामध्ये ब्रिटिशपूर्व सांमती समाजाची उत्पादन बंधने व वासाहातिक भांडवली व्यवस्थचे उत्पादन संबंध यांचा एकत्रित वापर होता. ग्रामची सबाल्टर्न ही संज्ञा हे भारतातील वंचितांना लावू पाहतात. ही संकल्पना काहीशी लवचिक स्वरूपाची आहे. या संकल्पनेद्वारे वर्ग, जाती, लिंग, व इतर घटकांच्या आधारे अंकित असलेले लोक निर्देशित केले जातात. रणजीत गुहांनी पहिल्या खंडात **'अभिजन'** या संकल्पनेच्या संदर्भात सबाल्टर्नची व्याख्या केली. त्यांच्या मते, भारतीय समाज स्थितीच्या संदर्भात 'अभिजन' ही संज्ञा वर्चस्वी गट निर्देशीत करणे या वचर्स्व गाजविणाऱ्या गटामध्ये भारतीय आणि परकीय या दोन्ही गटांचा समावेश होतो. वर्चस्वी परकीय गटामध्ये ब्रिटिश अधिकारी परकीय भांडवलदार, व्यापारी, मळेवाले, जमीनदार आणि मिशनरी यांचा समावेश होतो. तर भारतीय वर्चस्वी गटामध्ये शक्तीमान सामंत वर्ग, औद्योगिक व्यापारी वर्ग आणि प्रशासकीय चौकटीच्या वरच्या श्रेणीतील अधिकारी यांचा समावेश होतो. स्थानिक पातळीवरील वर्चस्वी गटामध्ये ग्रामीण श्रेष्ठी, दरिद्री जमिनदार, श्रीमंत व मध्यम शेतकरी यांचा समावेश होतो. या पदधतीने वर्चस्व आणि अंकितता किंवा दुय्यमत्व यांच्या संदर्भात सत्ता संबंधाची मुलभूत चौकट तयार होते व त्यावर आधारित अभिजन सबाल्टर्न असा द्वंदात्मक विरोध तयार होतो. या द्वंदाचा विचार वर्ग संघर्षाच्या पद्धतीने करता येणार नाही. रणजीत गुहांच्या लिखाणाचे डाव्या मार्क्सवादयांनी जोरदार स्वागत केले. केवळ अन्वयार्थ लावून थांबता कामा नये तर जग बदलण्याचाही प्रयत्न सबाल्टर्न स्टडीजने केला पाहिजे असे ते म्हणतात.

**२) पार्थ चॅटर्जी :** सबाल्टर्न स्टडीजच्या अभ्यास खंडातशेतकरी समूह जाणीव पहिल्या दोन लेखात ते व्यक्त करतात. अभिजनवादी इतिहास लेखनाला नकार दिल्यानंतर त्या रिकाम्या जागेवर सबाल्टर्न जाणीवेच्या इतिहासाची मांडणी करण्याची जबाबदारी सबाल्टर्न इतिहासकारांची असल्याचे पार्थ चॅटर्जी सांगतात. त्यांनी सामंती सत्ता पद्धती, भांडवली सत्ता पद्धती व समुदाय सत्ता पद्धती याचे विवेचन करून समुदाय सत्ता पद्धतीचा वापर



Scanned with ACE Scanner

सबाल्र्टन प्रतिकारासाठी केला. बंगालच्या शेतकऱ्यांवरील (१९२० ते ३०) चॅटर्जींच्या लेखावर फूकोचा प्रभाव आढळतो. त्यांनी स्त्रियांचा राष्ट्रीय चळवळीतील सहभाग मांडला, पण त्यांचे आकलन वरवरचेच राहिले.

सबाल्र्टन स्टडीज, रणजित गुहा, पार्थ चॅटर्जी, शिवाय शहीद अमीन, डेव्हीड अर्नाल्ड, डेव्हीड हार्डियन, दिपेश चक्रवर्ती, स्टीफन हॅनिंगहॅम, रामचंद्र गुहा, गौतम भद्रा, ग्यानप्रकाश, स्वपनदास गुप्ता, तनिका सरकार, एन. के. चंद्रा, ज्युली स्टिफन्सन, सुझी थारू, वीणादास, गायत्री स्पिवाक, सुमीत सरकार, बर्नाड कोहेन, सुदेश मिश्रा, कौशिक घोष, इंद्राणी चॅटर्जी, इरिता बॅनर्जी, विजयप्रसाद आदिंनी लिखाण केले. मोगलकालापासून १९७० पर्यंतच्या कालखंडावर सुटे सुटे भाष्य या लिखाणातून पुढे येते. आजवर या लिखाणाचे दहा खंड प्रसिद्ध झाले आहेत.

**शहीद अमीन व ग्यान पांडे** यांनी स्थानिक लोकांचे राजकारण हे काँग्रेसच्या राजकारणापेक्षा वेगळे होते हे दाखवून दिले. सबाल्र्टनवाल्यांनी मार्क्सवादी इतिहासकारांच्या भूमिकेचे खंडन केले. वर्ग संघर्ष व वर्ग जाणीवेला प्राधान्य न देता सबाल्र्टन जाणीवेचा वेध घेतला. Four Rebells of Eighteen Fifty Seven या **गौतमभद्राच्या** लेखात शहामलच्या नेतृत्वाखालील उठावाचे स्वरूप वर्णन केले आहे. फुकोच्या संकल्पनेचा आधार घेऊन **डेव्हीड अॅर्नाल्ड** यांनी प्लेग काळातील वैद्यकीय तपासणीच्या वेळी कशा प्रकारे संघर्ष सुरू झाला हे दाखवून दिले. **हेनिंगहॅमचे** चलेजाव चळवळी वरील लिखाण, **चक्रवर्ती** यांच्या ज्यूट वर्कर्सच्या लेखावरही फूकोचा प्रभाव दिसतो.

सबाल्र्टन जाणीव केंद्री इतिहास लिहीण्यासाठी नव्या अभ्यास पद्धतींचा उपयोग केला गेला. **हॉब्जबमची सामाजिक पुंडगिरी (Social banditry) ई. पी. थॉम्प्सन यांची इतिहासात मूक राहिलेले सूर** (**Unsung voices of History**). **सैद यांची पौर्वात्यवाद** (**Orientalism**). **देरिदाची विरचना** (**Deconstruction**), **लकानची स्वेतर** (**Other**) या सारख्या संकल्पना सबाल्टर्न इतिहासकारांनी वापरल्या. तरीसुद्धा ग्रामशी, फुको यांचा जास्त भाव जाणवतो. फुकोच्या ज्ञानाचे पुरातत्त्व उत्खनन Archaeology of knowledge चा वापर करून ज्ञानातून येणाऱ्या इतरांवरील नियंत्रणाचे चित्रण या इतिहासकारांनी केले. मानव शास्त्राच्या युरोप केंद्री चौकटीतून मुक्त करणाऱ्या भूमिका सबाल्र्टनने घेतल्या. त्यांच्यामुळे गण व जात संबंधाच्या मानव शास्त्रीय सिद्धांताना गंभीर आव्हान निर्माण झाले. गौतमभद्रा यांनी मानव शास्त्राच्या



Scanned with ACE Scanner

आधारे 'चौरासी देश' या क्षेत्रीय कल्पनेची छाननी केली, तर ज्युली स्टिफन्सनच्या लिखाणात ही विरचना वादाचा प्रभाव दिसतो. दिपेश चक्रवर्ती यांनी **पुरुषशाहीतील** क्रूरता मान्य करूनही कुल आणि गृहलक्ष्मी यांचे गौरवीकरण केले.

**सबाल्टर्नच्या मर्यादा :** त्यांनी समूहाचा कोटीक्रम म्हणून वापर केला. आधुनिकतेपासून भारतीय संस्कृती वाचविण्याचा प्रयत्न आणि समूहामध्ये संस्कृतीचे सार दाखविण्याचा प्रयत्न केला. वर्ग संकल्पनेला त्यात स्थान दिले नाही. Community ही संकल्पना वापरताना उत्तर आधुनिक संरचनोत्तर पद्धतीचा वापर केला. (Post modern, Post structuralist) त्यातूनच rationalism विवेका ऐवजी भिन्नता difference पुढे आले. देरिदाने भिन्नता ही संज्ञा अत्यंत व्यक्तीनिष्ठ समाजासाठी वापरली हे सबाल्टर्नवाल्यांनी लक्षात घेतले नाही. सबाल्टर्न स्टडीजमधून समूह जीवन केंद्रस्थानी ठेवून धार्मिक अस्मितेच्या परिभाषेत सामूहिक जाणीव व्यक्त केली गेली. सबाल्टर्नवाल्यांनी वेगवेगळ्या सैद्धांतिक भूमिका घेऊन इतिहास लेखन केले. एकच एक तात्त्वीक चौकट स्विकारली नाही. त्यामुळे त्यांना ना मार्क्सवादी म्हणता येत ना उत्तर संरचनावादी, ना उत्तर आधुनिकतावादी. सबाल्टर्न लिखाणात लिंगभाव संवेदनशीलता सहाव्या खंडानंतर वाढली. सबाल्टर्न व स्वायत्तता ह्या संकल्पना जास्तीत जास्त अमूर्त झाल्या. साचेबंद, संदर्भहीन लिखाण होऊ लागले. सामाजिक, आर्थिक संदर्भापासून तुटकेपण येऊ लागले. जात, लिंगभाव, स्वायत्तता यांच्या परस्पर संबंधाचा विचार झाला नाही. सर्व सबाल्टर्न लिखाण म्हणजे पाश्चात्त्य सांस्कृतिक वर्चस्वाचा प्रश्न होऊ लागले. फुले, आंबेडकर, पेरियार यांच्या चळवळीकडे दुर्लक्ष झाले. सबाल्टर्नने डाव्यांच्या इतिहासाकडे दुर्लक्ष केले. जाती चळवळीवर प्रकाश टाकला नाही. पश्चिमेकडील वाचक वर्गावरून या लिखाणाचे मूल्यमापन होऊ लागले. हे सर्व लिखाण इंग्रजीतच राहिल्याने राष्ट्रीय, प्रादेशिक संवाद होऊ शकला नाही. सबाल्टर्न स्वायत्तता म्हणजे पाश्चिमात्य, वसाहतिक, सांस्कृतिक वर्चस्व झुगारून देणे एवढा सोपा व मर्यादित अर्थ लावला गेला. वसाहतीतील अंतर्विरोध त्यांनी लक्षात घेतला नाही.

एकूणच आजच्या समाजाशी, लोकांच्या राजकारणाशी सबाल्टर्न स्टडी कशाप्रकारे जोडता येईल याचा यात अभ्यास, विचार झाला तरच खऱ्या अर्थाने ते वंचिताचे लिखाण लोकाभिमुख होईल.

❒



Scanned with ACE Scanner

प्रकरण ९

# आधुनिक भारताचे आकलन संकल्पना व परिभाषा

**(Understanding Modern India : Concepts and Terminology)**

- प्रास्ताविक
- आधुनिक भारतीय इतिहासामधील संकल्पना
- इतिहासाची परिभाषा

++++++++++++++++++++++++++++++++++++++++++++++++++++++++++++++++++++

## प्रास्ताविक

आधुनिक भारताच्या इतिहासाचा अभ्यास करीत असताना आपल्याला आधुनिक भारताच्या संदर्भात येणाऱ्या विविध संकल्पनांचा विचार करावयाचा आहे. प्रत्येक विषयाची स्वतंत्र अशी बोलीभाषा असते. त्याचा आपण दैनंदिन व्यवहारात उपयोग करीत असतो, या ठिकाणी आपल्याला अशा व्यावहारिक शब्दांचा विचार करावयाचा आहे. आधुनिक भारताच्या इतिहासाकडे पाहण्याचे वेगवेगळे दृष्टिकोण आहेत. उदा. साम्राज्यवादी, वसाहतवादी, राष्ट्रवादी, मार्क्सवादी यांचाही विचार आपणास येथे करावयाचा आहे. हा ग्रंथ दिल्लीच्या विद्यापीठ अनुदान आयोगांच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार लिहिलेला असल्याने व नजीकच्या भविष्यकाळात महाविद्यालयीन इतिहास विषयामध्ये येणारी आव्हाने लक्षात घेऊन लिहिलेला आहे. या नव्या बदलातून निर्माण होणारा विद्यार्थी वर्ग भावी इतिहास अभ्यासविषयक आव्हाने स्वीकारण्यास तयार व्हावा अशी लेखकाची भूमिका आहे. ग्रंथाच्या सुरुवातीलाच विद्यार्थी वर्गाच्या निदर्शनास असे आणून देण्याचा प्रयत्न आहे की, इतिहास म्हणजे नुसती घटनांची किंवा सनांची यादी नव्हे प्रत्येक घटना एका विशिष्ट परिस्थितीमध्ये घडत असते. त्या घटनांचा अर्थ लावीत असताना शास्त्रीय पद्धतिशास्त्राचा आधार घेण्याचा प्रयत्न येथे लेखकाने केला आहे. इतिहास हे शास्त्र आहे असा दृष्टिकोण डोळ्यासमोर ठेवून हा ग्रंथ लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. इंग्रज इतिहास संशोधक जोसेफ अर्नाल्ड टॉयन्बी (१८८९ ते १९७५) यांचा आव्हान (Challange) व प्रतिसाद (Response) सिद्धांत डोळ्यासमोर ठेवून 'आधुनिक भारताच्या इतिहासा'मधील घटनांचे विवेचन करण्याचा प्रयत्न येथे केला आहे. सदरचा ग्रंथ लिहीत असताना ऐतिहासिक पद्धतिशास्त्राचा (Historical Methodology) अवलंब करून ग्रंथ जास्तीतजास्त शास्त्रीय पायावर उभा करण्याचा प्रयत्न मी केला आहे.

२० व्या शतकामधील परकीय व भारतीय इतिहास संशोधकांचे १९३० पर्यंत आधुनिक



Scanned with ACE Scanner

भारत या विषयाकडे लक्ष गेले नव्हते. याची काही कारणे संभवतात. अस्सल कागदपत्रांची उपलब्धता न होणे, हिंदी लोकांच्या विचार स्वातंत्र्यावर ब्रिटिशांची असणारी बंधने, ऐतिहासिक घटनांचे वस्तुनिष्ठ विवेचन करण्यामधील संशोधकांच्या ठिकाणी असणारी असमर्थता व एकंदरीतच भारताच्या इतिहासाकडे पाहण्याचा सदोष दृष्टिकोण. तथापि, इ.स. १९३० नंतर या स्थितीमध्ये हळूहळू फरक पडू लागला. संशोधकांनी राजकीय परिस्थिती व प्रशासकीय बाबी याविषयी लिखाणास सुरुवात केली. मुघल सत्तेचा ऱ्हास, मराठ्यांच्या संयुक्त राज्यघटनेचा अभ्यास, वेगवेगळ्या गव्हर्नर जनरलांची कारकीर्द या विषयांवर संशोधन सुरू झाले व भारतीय राजकीय, प्रशासकीय जीवनाचे पैलू स्पष्ट होऊ लागले. काही संशोधकांनी भारतीय सामाजिक-आर्थिक जीवनाचा अभ्यास सुरू केला. त्यानंतर स्वातंत्र्य चळवळीचा विषय घेऊन आधुनिक भारताच्या या पैलूवर प्रकाश टाकण्याचे प्रयत्न सुरू झाले. बऱ्याच वेळा भारतीय संशोधकांचे लिखाण हे प्रतिक्रियेच्या स्वरूपाचे होते. ब्रिटिशांनी विशेषत: प्रशासकीय अधिकारी व केंब्रिज व ऑक्सफर्ड विद्यापीठांनी भारतासंबंधी लिखाण केले, त्यामधील त्रुटी भरून काढण्यासाठी भारतीय संशोधकांनी लिखाण सुरू केले. युरोपीय सत्तांचा भारतामधील प्रवेश हा दोन संस्कृतींमधील संघर्ष आहे, या दृष्टीने भारताचा इतिहास नव्याने लिहिण्याची आवश्यकता निर्माण झाली. ब्रिटिश इतिहासकारांमध्ये जे. बी. कॅनिंगहॅम, एच. एच. डॉडवेल, सी. सी. डेव्हिस, सर जॉर्ज फॉरेस्ट, टी. आर. होम्स, सर ली वॉर्नर, डॉ. व्हिन्सेंट स्मिथ, पर्सिव्हिअेल स्पिअर, जेम्स मिल इत्यादी विद्वानांचा समावेश करणे आवश्यक आहे. या लिखाणाला प्रतिउत्तर म्हणून भारतीयांनी इतिहास लेखन केले त्यामध्ये के. पी. जयस्वाल, आर. सी. मुजुमदार, ए. सी. बॅनर्जी, एस. एन. सेन, राम गोपाल, ताराचंद, स्वामी दयानंद, स्वा. वि. दा. सावरकर, ईश्वरीप्रसाद इत्यादींनी भारतीय दृष्टिकोण मांडून ब्रिटिश लिखाणाला उत्तर देण्याचा यशस्वी प्रयत्न केला. गेल्या काही वर्षांत भारतीय इतिहासकारांची एक परंपरा निर्माण झाली आहे. या परंपरेमध्ये प्रो. के. एन. चौधरी, सुमित सरकार, संजय सुब्रह्मणियम, प्रो. मुशुरल हसन, प्रो. अनिता इंदरसिंग, प्रो. सुशील चौधरी, प्रो.सव्यसाची भट्टाचार्य, प्रो. सतीशचंद्र, प्रो. इरफान हबीब, प्रो. आशिनदास गुप्ता, प्रो. बाकेबिहारी मिश्रा, प्रो. ओमप्रकाश, रजनी पामदत्त इत्यादींचे संशोधन भारतासंबंधी युरोपमध्ये असणारे गैरसमज दूर करण्यास यशस्वी ठरले आहेत. भारतीयांच्या या प्रतिक्रियेमुळे केंब्रिज युनिव्हर्सिटीने गेल्या १५ वर्षांमध्ये 'न्यू केंब्रिज हिस्ट्री ऑफ इंडिया' ही संशोधन प्रक्रिया नव्याने सुरू केली आहे. या मालिकेने आधुनिक भारतासंबंधीचा नवा विचार मांडला आहे. या प्रक्रियेमध्ये प्रो. पिटर जे. मार्शल, प्रो.ख्रिस्तोफर बेली, त्यांची पत्नी प्रो. सुझन बेली, प्रो. केनिथ जोन्स, प्रो. जॉन एफ. रिचर्डस, प्रो. पिअर्सन, प्रो. बर्टनस्टेन, प्रो. फ्रॅंक पर्लिन, प्रो. स्टेवार्ट गॉर्डन, प्रो. बी. आर. टॉमलिनसन, प्रो. डेव्हिड ल्यूडेने, प्रो. पॉल ब्रास, प्रो. रिचर्ड इटने, प्रो. डेव्हिड लो इत्यादी संशोधकांनी केलेल्या कार्यांचा विचार करणे गरजेचे आहे. वरील विवेचनावरून आधुनिक भारताच्या इतिहास संशोधनाची सुरू झालेली प्रक्रिया आपल्या लक्षात येण्यास हरकत नाही. ब्रिटिश व भारतीय संशोधकांनी गेल्या दोनशे वर्षांच्या भारतीय इतिहाससंबंधी लिखाण केले

Scanned with ACE Scanner

आहे. त्यामधून काही संकल्पना अस्तित्वात आल्या आहेत. त्याचा विचार आता आपणास करावयाचा आहे.

## आधुनिक भारतीय इतिहासामधील संकल्पना

आधुनिक भारताच्या इतिहासाच्या संदर्भात काही संकल्पना वारंवार उपयोगात आणल्या जातात. या संकल्पना भारतीय समाज, राजकीय जीवन अर्थव्यवस्था, समाजजीवनाशी निगडित आहेत. एखाद्या देशाच्या वाटचालीमधील संकल्पनांचा अभ्यास केल्याने त्या देशाची मानसिकता समजते. सर्वच संकल्पना देशातच निर्माण होतात असे नव्हेतर त्या समकालीन आंतरराष्ट्रीय वातावरणातून निर्माण होत असतात. अशा संकल्पनांमुळे एखाद्या देशाची भावी काळासाठी जडणघडण होत असते. आधुनिक भारताच्या संदर्भात अशाच काही संकल्पनांचा विचार येथे आपणास करावयाचा आहे.

### १. सरंजामशाही (Feudalism)

मध्ययुगातून आधुनिक युगात प्रवेश करीत असताना आपल्याला विचार करावयास लावणारी पहिली संकल्पना म्हणजे सरंजामशाही किंवा Feudalism ही होय. भारतामध्ये सरंजामशाही होती काय ? असल्यास त्याची तुलना कोणत्या देशातील सरंजामशाहीशी करता येईल? तिचे भारतामधील स्वरूप कशा प्रकारचे होते? इत्यादी प्रश्नांची उत्तरे शोधावी लागतात. वस्तुत: सरंजामशाहीची संकल्पना मूळची युरोपीय. युरोपीय लोक भारतामध्ये आल्यामुळे या पद्धतीची भारताच्या संदर्भात चर्चा सुरू झाली. ज्या पद्धतीने युरोपचे मध्ययुगातून आधुनिक युगात स्थित्यंतर झाले त्याप्रमाणे भारताचे स्थित्यंतर झालेले नाही. तथापि, एकदा विषय निघाल्यावर याची चर्चा सुरू झाली. जगभरातील विद्वानांनी आपली मते मांडली व मग आपण त्यामध्ये आपली सरंजामशाहीची संकल्पना बसविण्याचे प्रयत्न सुरू केले. याविषयी अनेक विद्वानांनी आपली मते मांडली त्यापैकी फक्त काही विद्वानांची माहिती येथे आपण घेण्याचा प्रयत्न करू या. अशा विद्वानांमध्ये एम. एम. पॉस्टॅन, मार्क ब्लॉच, कार्ल मार्क्स, मॉरिस डॉब, रॉडनी हिल्टन, पेरी ॲन्डरसन, हेन्री प्रिएन, टी. जे. बायर्स, आरिफ डर्लिक, बर्टन स्टेन, ख्रिस व्हिकहॅम, हालिल बर्कले, आर. एस. शर्मा, इरफान हबीब, हरबन्स मुखिया, अशोक रुद्र, सतीशचंद्र इत्यादींचा समावेश होतो.

सरंजामशाही संकल्पनेचा संबंध युरोपीय समाजाशी आहे म्हणून पहिल्यांदा आपण युरोपीय सरंजामशाहीची संकल्पना थोडक्यात समजून घेऊ म्हणजे आपल्याला भारतामधील सरंजामशाहीचे स्वरूप लक्षात येईल. या पद्धतीचा संबंध समाजव्यवस्था व अर्थव्यवस्थेशी आहे. युरोपीय सरंजामशाही व भारतीय सरंजामशाही यांची तंतोतंत तुलना होऊ शकत नाही.

#### युरोपीय सरंजामशाही

५ व्या शतकाच्या अखेरीस युरोपवर, उत्तरेकडून रोमन साम्राज्यावर हल्ले सुरू झाले. आधीच दुबळे झालेले रोमन साम्राज्य अशा हल्ल्यामुळे पूर्णपणे खिळखिळे झाले. या वेळी

Scanned with ACE Scanner

युरोपमध्ये खाजगी जमिनी होत्याच, आक्रमक टोळी प्रमुखांनी असे जमेल तशा जमिनी ताब्यात घेतल्या. कालांतराने बळाच्या जोरावर टोळीवाल्यांनी शेजाऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेण्यास सुरुवात केली. अशा प्रकारच्या जमीनदारी पद्धतीमधून विविध टोळ्या निर्माण झाल्या. त्यांच्यामध्ये समझोता होऊन राजेशाही पद्धत सुरू झाली. तथापि, जमीनदारीची नवी पद्धत अस्तित्वात आली. या जमीनदारीलाच Manorial System असे म्हणतात. याच सुमारास चर्च ही धर्मसंस्था अस्तित्वात आली. धर्मसंस्थेने राजेशाहीला पाठिंबा देण्यास सुरुवात केली. राजे लोकांनी आपल्या जमिनी, आपल्या हाताखालील सरदार, जमीनदार यांना कसण्यास देण्यास सुरुवात केली. या पद्धतीमधून जी समाजव्यवस्था अस्तित्वात आली त्यालाच सरंजामशाही किंवा Feudalism म्हणतात. या पद्धतीची वैशिष्ट्ये अशी होती -

१. राजा आपल्या जमिनी कसण्यासाठी आपल्या हाताखालील सरदार, दरकदारांना देत असे.

२. सुरुवातीस ह्या जमिनी त्या सरदाराला त्याच्या जीवनमानापर्यंत दिल्या जात असत. पुढे त्या वंशपरंपरा देण्याची पद्धत सुरू झाली.

३. जमिनीच्या मोबदल्यात सरदारांनी राजाची लष्करी सेवा करावी.

४. काही वेळा राजाच्या जमिनी वैयक्तिक शेतकऱ्याला कसण्यासाठी देत, अशा शेतकऱ्यांना गुलाम (Serf) म्हणत.

५. अशा जमिनीच्या तुकड्याच्या मोबदल्यात शेतकऱ्यांना आपल्या मालकांची काही कामे करावी लागत. शेतकऱ्याकडे जमिनीचे जे तुकडे (Plots) असत, त्यांना 'फ्यूड' (Feud) असे म्हणत. त्यावरून 'फ्यूडॅलिझम' हा शब्द अस्तित्वात आला.

६. अशा प्रकारच्या समाजरचनेमध्ये रोमन साम्राज्यामधून परंपरेने आलेली काही वैशिष्ट्ये होती.

७. या समाजव्यवस्थेमध्ये परंपरेने आलेल्या काही व्यक्तिरूप संस्था, काही राजकीय, सामाजिक संस्था व शासकीय संस्था असत.

८. या समाजाला 'फ्यूडल सोसायटी' (सरंजामी समाजव्यवस्था) असे म्हणत याचे मुख्य तीन आधार म्हणजे सरदार वर्ग, धर्मगुरू व शेतकरी होत.

९. अशा जमीनदारीमध्ये कोणता कायदा चालत असे, याचे उत्तर असे की स्थानिक परिस्थिती, रीतिरिवाज व प्रचलित कायदे यानुसार निर्णय दिला जात असे.

१०. जमिनीची मालकी राजाची असे.

११. सरदार व जमीनदार यांना Tenant-in-Chief असे समजले जात असे.

१२. राजाकडून जी जमीन, जमीनदार किंवा शेतकऱ्याला मिळत असे त्याला 'फाईफ' (Fief) म्हणत.

युरोपमधील सरंजामशाही ही एक अर्थव्यवस्थाही होती, पण ही उदरनिर्वाहाची अर्थव्यवस्था (Subsistance economy) होती, अतिरिक्त अर्थव्यवस्था (Surplus economy) नव्हती.

Scanned with ACE Scanner

**पॉस्टॅन** या अमेरिकन विद्वानाने सरंजामशाहीचा अन्वयार्थ राजकीय दृष्टीने लावला आहे. त्याच्या मते, ''या व्यवस्थेमध्ये प्रशासन व न्यायव्यवस्थेला अत्यंत महत्व आहे. हे दोन्ही हक्क सरदारांच्या हातात असत.''[१]

**मार्क ब्लॉच** या फ्रेंच विद्वानाने सरंजामशाहीबद्दल म्हटले आहे, ''ही पद्धत मुख्यत: शेतकरी वर्गाशी निगडित आहे. येथे नोकरांना पगाराऐवजी शेतीच्या उत्पन्नापैकी वाटा मिळत असे. या व्यवस्थेमध्ये उच्च वर्ग व कनिष्ठ वर्ग यामध्ये संरक्षणासंबंधी नाते असे.''

**कार्ल मार्क्स** सरंजामशाही व्यवस्थेकडे आपल्या विचारसरणीप्रमाणे पाहतो. तो म्हणतो, ''सरंजामशाही समाजव्यवस्थेमध्ये लष्करी अधिष्ठान असलेल्या उच्चभ्रू लष्करशहांचे शेतकरी वर्गावर वर्चस्व असते. या व्यवस्थेमध्ये उत्पादन प्रक्रिया (Mode of Productions) ही जमीनदारांच्या हातात असते व ते शेतकरी वर्गाचे शोषण करीत.''[२]

अशी ही युरोपीय सरंजामशाहीची संकल्पना आहे. आता हीच व्यवस्था भारतामध्ये होती काय ? यासंबंधी आपणास चर्चा करावयाची आहे. विद्वानांमध्ये अशी स्पर्धा असते की कोणतीही युरोपीय संकल्पना भारतीय इतिहासाला जोडण्याचा प्रयत्न करणे. यासाठी विविध अवतरणे देणे. अशा विद्वानांची संभावना **प्रो. इरफान हबीब** "Scholarship by quotation" अशा शब्दांत करतात. भारतामध्ये खरोखर सरंजामशाही होती काय ? तिचे स्वरूप काय ? इत्यादी प्रश्नांची उत्तरे भारतीय विद्वानांच्या संदर्भात करू या.

**प्रो. रामशरण शर्मा** यांनी 'इंडियन फ्यूडॅलिझम' या ग्रंथात सरंजामशाहीचा विविध स्तरांवर विचार केला आहे. राजकीय स्तरावर सरंजामशाहीचा संबंध जमिनीसंबंधीच्या नात्यावर अवलंबून असतो. आर्थिक स्तरावर याचा संबंध गुलामगिरी किंवा शेतकऱ्यांच्या परिस्थितीशी असतो. राजा व सामान्य शेतकरी यांच्यामध्ये एक मध्यस्थी करणारी संस्था (Intermediatay agency) असते. भारतामध्ये उत्तर मौर्यकालापासून ही पद्धत सुरू झाली व गुप्तकालामध्ये हिला एक विशिष्ट स्वरूप प्राप्त झाले. तथापि, भारतीय सरंजामशाही व युरोपीय सरंजामशाही यामध्ये मूलभूत फरक आहे.[३]

मध्ययुगीन काळातील सरंजामशाहीचा संबंध मुघल काळाशी आहे. मुघल काळात सरंजामशाहीचा संबंध सरंजामाशी राजकीय व लष्करीदृष्ट्या आहे. मुघल काळातील सरदाराला दिलेले सरंजाम फक्त त्याच्या आयुष्याशी संबंधित असत. तो सरदार मेल्यानंतर सरंजाम सरकार जमा होत असे. म्हणून मुघल काळात आपण आहे तोपर्यंत जिवाची चैन करण्याची प्रवृत्ती निर्माण झाली. प्रो. ईश्तिकाम हुसैन कुरेशी यांनी 'दि अॅडमिनिस्ट्रेशन ऑफ दि मुघल एम्पायर' या ग्रंथात 'दि मनसबदारी सिस्टीम' या सदराखाली सरंजामशाहीची चर्चा केली आहे. कुरेशीच्या मते, मनसब म्हणजे त्या सरदाराचे समाजामधील विशिष्ट स्थान होय. पुढे या स्थानाला काही जबाबदाऱ्या, कर्तव्ये, विशिष्ट हक्क यांची जोड देण्यात आली. मनसब हा शब्द फक्त उच्च वर्गातील अधिकाऱ्यांसाठीच वापरत असत. कुरेशीच्या मते, मुघल काळात अशी तीन प्रकारची वर्गवारी अस्तित्वात होती. ती वर्गवारी अशी - (१) तलवारीने लढणाऱ्या लोकांचा वर्ग त्याला 'अशब-उस-सैफ' असे म्हणत. (२) लेखनिक, हिशेबनीस

Scanned with ACE Scanner

व लिखाणाची कामे करणारा वर्ग त्याला 'अशब-उल्-कलाम' असे म्हणत. (३) धर्मशास्त्रीय न्याय विशारद, वैद्य हकीम यांना 'अशब-उल्-अमाम' असे म्हणत.[४] मुघल काळात सरदारांना जहागिरी देण्याची पद्धत असे. त्यासाठी जमिनी तोडून देत असत, अशा जहागिरींना तुयुलतस (tuluyats) असे म्हणत. या जहागिरी रोख म्हणजे नक्त स्वरूपाच्याही असत किंवा जमिनी तोडून दिलेल्या असत. जहागिरी जात आणि स्वार अशा स्वरूपाच्या असत.जहागिरी नोकरीच्या स्वरूपाच्या असत म्हणून त्यांना 'जागीर-ए-तनख्वा' किंवा 'तनख्वा ए जागीर' म्हणत. यामध्ये त्या जहागीरदाराला, मनसबदाराला आपल्या प्रदेशामधून कर गोळा करण्याचा अधिकार असे. सैन्य बाळगून त्याचा पगार देणे व जरूरीच्या वेळी बादशहाला सैन्य देणे अशी जबाबदारी असे. औरंगजेबाच्या काळापर्यंत राज्याच्या एकंदर उत्पन्न ९२४ कोटी (दाम) पैकी ७२५ कोटी (दाम) एवढ्या जमिनी जहागीरदारांना वाटलेल्या होत्या.[५] (४० दाम = १ रुपया).

मराठेकालीन सरंजामशाहीमध्ये राजाकडून वतनदारांना जमिनी दिल्या जात असत. प्रा. अ. रा. कुलकर्णींनी, 'महाराष्ट्र इन दि एज ऑफ शिवाजी' या प्रबंधामध्ये वतनदारीचे समग्र वर्णन केले आहे.देशमुख, देशपांडे, पाटील, कुलकर्णी, चौगुले यांच्या वतनी हक्कासंबंधी विस्तृतपणे लिहिले आहे.[६] त्यावरून मराठेकालीन सरंजामशाहीचे स्वरूप आपल्या लक्षात येते. शिवाजी महाराजांनी सरंजामशाही नष्ट केली, असा विचार न्या. रानडे, प्रो. सेन, सरदेसाई, सरकार, गुणे यांनी मांडला आहे. कुलकर्णी म्हणतात, महसूल ठरवित असताना वतनदारांना खूप स्वातंत्र्य असे कारण राजाचे दडपण नसे.[७] परंतु सतीशचंद्रांना हा मुद्दा मान्य नाही. त्यांच्या मते, मोकासी मोकासामहाल यामध्ये त्या शेतकऱ्याची जमिनीवरील मालकी दिसून येत नाही. जमिनी राजाच्या मालकीच्या असत. शिवाजी महाराजांनी सरंजामशाही बरखास्त केली असा एकंदर अर्थ लावण्याचा प्रयत्न होत असताना दिसतो. पुढे पेशवेकालीन संयुक्त राज्य पद्धत आल्यावर प्रत्येक सरदाराकडे ठरावीक जमीन व ठरावीक सैन्य पेशव्याला पुरविण्याची जबाबदारी दिल्याचे दिसून येते. उदा. हिरोशी फुकांजावा या जपानी आर्थिक इतिहासतज्ज्ञाने पटवर्धन सरदाराचे उदाहरण घेऊन सरंजामशाहीचे वर्णन केले आहे. पटवर्धनांनी पेशव्यांना ८००० सैन्य द्यावे व त्यासाठी पेशव्यांनी पटवर्धनांना रु. २४,००,०००/- ची जहागिरी द्यावी.[८] वरील चर्चेवरून आपल्याला सरंजामशाहीसंबंधी युरोपीय व भारतीय स्वरूप लक्षात येईल. या संदर्भात प्रो. इरफान हबीब यांनी क्लासी-फाईंग प्रि. कलोनियल 'इंडिया' या लेखात भारतीय सरंजामशाहीचे विश्लेषण प्रो. आर. एस. शर्मा व प्रो. डी. डी. कोसंबी यांच्या लिखाणाच्या आधारे केले आहे. त्यांच्या मते, सरंजामशाही ब्रिटिश राजवटीच्या अखेरपर्यंत भारतात होती. प्रो. बर्टन स्टेन यांच्या मते, दक्षिण भारतात उत्पादनाची पद्धत व साधने सामान्य शेतकऱ्यांच्या ताब्यात असल्याने सरंजामशाही दक्षिणेकडे नव्हती. हरबन्स मुखिया यांच्या मते, सरंजामशाही ही सामाजिक व्यवस्था आहे. ही व्यवस्था औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेकडे जाण्याच्या मार्गातील स्थित्यंतर आहे. शेतीमालाचे अतिरिक्त उत्पादन कशा पद्धतीने संपविले जाते यावर सरंजामशाहीचे भवितव्य अवलंबून असते.

Scanned with ACE Scanner

## २. वाणिज्यवाद (Mercantalism)

युरोपमधील सरंजामशाहीचे युग संपुष्टात येत असतानाच साधारणत: १५ व्या शतकामध्ये युरोपीय अर्थव्यवस्थेमध्ये काही नवी अर्थविषयक संकल्पना अस्तित्वात येऊ लागल्या. मध्ययुगामध्ये राजेशाहीला काही खास अधिकार असत. उदा. आपल्या प्रदेशात कोणती वजनमापे, नाणी वापरावीत, कोणत्या प्रकारची अर्थव्यवस्था असावी इत्यादी किंबहुना राजेलोक हा आपला विशेष हक्क मानीत असत. १५ व्या शतकामधील अर्थव्यवस्था ही ग्रामीण अर्थव्यवस्था (Rural Economy) होती. त्या वेळी राज्य-राष्ट्राची (Nation-State) ची संकल्पना, लोकप्रतिनिधित्वाचा राजकीय विचार, घटनात्मक राजेशाही किंवा वाणिज्यवाद (Mercantalism) इ. संकल्पना अस्तित्वात नव्हत्या. औद्योगिकीकरणाची प्रक्रिया सुरू नसल्याने बाह्य देशांशी व्यापारही फारसा संभवत नव्हता. त्या वेळची युरोपीय अर्थव्यवस्था मुख्यत: उदरनिर्वाहाची (Subsistance Economy) होती. तेव्हा या उदरनिर्वाहाच्या अर्थव्यवस्थेमधून वाणिज्यवादाकडे युरोप कसा वळला, त्याचे स्वरूप कोणते, त्याचे फायदे तोटे कोणते ? इत्यादींचा विचार या ठिकाणी आपणास करावयाचा आहे.

वाणिज्यवादाचा उल्लेख 'मर्कटाईल सिस्टीम' अशा शब्दांत पहिल्यांदा करण्यात आला. ईस्ट इंडिया कंपनीच्या डायरेक्टर थॉमस मन (Thomas Mun) (१५७१-१६४१) याने पहिल्यांदा वाणिज्यवाद हा शब्द उच्चारला.[१] हा वाद इंग्लंडच्या अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा भाग बनला. त्याला अर्थशास्त्रीय स्वरूप दिले अॅडम स्मिथ याने 'दि वेल्थ ऑफ नेशन्स' या ग्रंथात. अॅडम स्मिथने याला "System of commerce" असाही शब्द वापरला. हळूहळू हा शब्द संसदीय चर्चेमध्ये,कायदेसंहितेमध्ये, व्यापारी वर्गाच्या परिभाषेमध्ये व साहित्यामध्येसुद्धा येऊ लागला व तो हळूहळू जगभर पसरला. मध्य युगात युरोपीय राष्ट्रांनी जगामध्ये काही ठिकाणी वसाहती स्थापन केल्या. अमेरिका हीसुद्धा इंग्लंडची वसाहतच होती तेथेही हा शब्द जाऊन पोहोचला. आधुनिक जगाच्या सुरुवातीलाच राजकीय-आर्थिक विचारामध्ये वाणिज्यवाद ही संकल्पना सिद्धांत रूपाने बसविण्याचे प्रयत्न अर्थतज्ज्ञांनी सुरू केले. वाणिज्यवादाचा सुरुवातीचा विचार देशांतर्गत अर्थव्यवस्था एका सूत्रात बांधावी असाच होता. बाहेरच्या जगामधून सोने, चांदी यांची आयात कशी करता येईल एवढीच वाणिज्यवादाची कक्षा होती. कालांतराने ती कक्षा वाढली. पुढे त्यामध्ये निर्यात व्यापाराला स्थान मिळू लागले. कोणत्या वस्तू कोणत्या वसाहतीमध्ये निर्यात करावयाच्या या विषयासंबंधीची चर्चा होऊ लागली. वाणिज्यवादाला खरी चालना दिली ती इटलीमध्ये मॅकअॅव्हली व अॅन्टॉनियो सेरा यांनी. फ्रान्समध्ये जिन बॉर्डीन, कॉलबर्ट इत्यादींनी इंग्लंडमध्ये थॉमस मन व विलियम पेरी यांनी. या सर्वांनी युरोपला मध्ययुगीन सरंजामशाही जगातून बाहेर काढून नव्या जगामध्ये वाणिज्यवाद किंवा व्यापारी प्रवृत्ती ही कशी आवश्यक आहे हे पटवून देण्याचा प्रयत्न केला. व्यापारवाद ही संकल्पना 'मर्कटाईल सिस्टीम', 'कॉलबेरटिझम', 'कमर्शिअल सिस्टीम', 'रिस्ट्रिक्टिव्ह सिस्टीम' या नावानेही ओळखतात. वाणिज्यवादाच्या काही व्याख्यांचा आपण विचार करू.

सी. डब्ल्यू. कोल यांच्या मते, 'वाणिज्यवाद ही संकल्पना आपल्याला अर्थशास्त्राच्या

Scanned with ACE Scanner

सिद्धांताना, तत्कालीन राजकीय धोरणांना व तत्कालीन समाजामध्ये प्रचलित असणाऱ्या वस्तुस्थितीला लागू करता येईल. या सिद्धांतामुळे देशाची ताकद, संपत्ती व भरभराट यामध्ये भर पडते.

**प्रो. हेनमन** (Heinmann) यांच्या मते, 'वाणिज्यवाद म्हणजे भांडवलशाहीचे सैद्धांतिक समर्थन होय.'

**प्रो. लॅकेचमन** (Leckachman) यांच्या मते, 'वाणिज्यवाद हा मध्ययुगीन आर्थिक विचार व व्यवहार यामधील सुंदर मिलाफ होय.'

**प्रो. एडमंड विलटेकर** (Edmund Wiltaker) यांच्या मते, 'राजकीय राष्ट्रवादाची दुसरी बाजू म्हणजे आर्थिक विचार म्हणजेच वाणिज्यवाद होय.' जर्मन विद्वान गस्टाव्ह श्यॉलर यांना 'राज्य निर्माण करण्याची प्रक्रिया (State formation) वाणिज्यवादामध्ये सामावली आहे असे वाटते. अशा प्रकारच्या राज्यनिर्मितीच्या प्रक्रियेमुळे आर्थिकदृष्ट्या बळकट असा समाज निर्माण होतो. वाणिज्यवाद १४ व्या शतकाच्या अखेरीस किंवा १५ व्या शतकाच्या सुरुवातीस सुरू होऊन साधारणत: १८ व्या शतकाच्या अखेरपर्यंत टिकला. युरोपीय राष्ट्रांनी जेथे वसाहती मिळविल्या तेथे वाणिज्यवाद निर्माण केला. ब्रिटिश काळात भारतही याला अपवाद नव्हता. वाणिज्यवादाच्या भरभराटीसाठी केंद्र सरकार भक्कम असले पाहिजे. वाणिज्यवादाच्या विकासाची काही कारणे आपणास खालीलप्रमाणे देता येतील.

## वाणिज्यवादाच्या विकासाची कारणे

१. वैचारिक चळवळी (Intellectual Movements)
२. धार्मिक चळवळी (Religious Movements)
३. पुनरुज्जीवन (Renaissance Movements)
४. सरंजामशाहीचा ऱ्हास (Decline of Feudalism)
५. कामगार वर्गाची वाढ (Growth of Labour Class)
६. नाविक शोध (Maritinu Discoveries)

## वाणिज्यवादाची वैशिष्ट्ये

वाणिज्यवादाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे मानली जातात.

१. राष्ट्राला एका धाग्यात बांधण्याचे सामर्थ्य असते.
२. राष्ट्रीय सरकारच्या आर्थिक नीतीचा एक भाग म्हणून वाणिज्यवाद ओळखला जातो.
३. सत्ता केंद्राचा एक भाग किंवा साधन म्हणून वाणिज्यवाद ओळखला जातो.
४. राष्ट्रीय एकीकरणाचे एक साधन म्हणून वाणिज्यवादाकडे पाहिले जाते.
५. राष्ट्रीय समाजहिताच्या संरक्षणासाठी वाणिज्यवादाचा उपयोग होतो.

वाणिज्यवाद भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये ब्रिटिशांनी आणला व आपल्या देशाची आर्थिक

Scanned with ACE Scanner

परिस्थिती भक्कम केली. आधुनिक भारतामधील वाणिज्यवादाचा स्वतंत्र विचार करणे आवश्यक आहे. मध्ययुगातून आधुनिक युगात वाटचाल करीत असताना आपल्याला वाणिज्यवादाचा अभ्यास करावाच लागतो.

## ३. वसाहतवाद (Colonialism)

वसाहतवादाची सोपी व्याख्या आपणास अशी करता येईल, ''दुसऱ्या देशांत जाऊन तेथील काही प्रदेश मिळवून, तेथे व्यापार करणे, त्या प्रदेशावर राजकीय प्रभुत्व स्थापन करणे आणि अशा सत्तेच्या जोरावर राज्य करणे याला वसाहतवाद असे म्हणतात.''

वसाहतवादामध्ये स्थानिक लोकांची पिळवणूक करणे असाही अर्थ अभिप्रेत आहे. याला वसाहतवाद (Colonialism) म्हणतात. वसाहतीचा प्रदेश मायभूमीपेक्षा वेगळा असतो व अनेक वेळा भौगोलिकदृष्ट्या दूर असतो. अशा वसाहतीमध्ये माणसे, धर्म, वंश, वर्ण यामध्ये मायभूमीपेक्षा वेगळी असतात. 'जेते' लोक स्थानिक लोकांना आपल्यापेक्षा कमी दर्जाचे समजतात. या लोकांमध्ये सुधारणा करण्यासाठी आपण येथे आलो आहोत अशी भूमिका 'जेते' लोक घेतात. भारताच्या बाबतीत ब्रिटिशांची धारणा हीच होती. म्हणून ब्रिटिशांनी 'काळा' 'गोरा' असा भेद निर्माण केला. ब्रिटिशांचे राज्य हे भारताला मिळालेले वरदान आहे. रूडयार्ड किपलिंगसारख्या लेखकाने "White man's burden" ही संकल्पना आपल्या साहित्यामधून मांडली. भारतीय लोक ब्रिटिशांपेक्षा दर्जाने कमी आहेत. हे दाखविण्यासाठी ब्रिटिश साम्राज्यामध्ये हॉटेलवर "Indians and dogs not allowed" अशा पाट्या लावीत असत. जेम्स मिलसारख्या लेखकाने आपल्या इतिहासलेखनातून हिंदू देव देवता, हिंदू परंपरा यांची यथेच्छ निंदा केली. या मागे हीच भावना दिसून येते. त्याच वेळी मुसलमानांचे कौतुक करून हिंदू-मुस्लिमांमध्ये दुही निर्माण करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. वसाहती संपल्या तरी आजसुद्धा इंग्लंडमध्ये हिंदू देवतांची निंदा-नालस्ती करण्यात येते. स्त्रियांच्या उठावदार अंतर्वस्त्रावर श्रीरामाचे चित्र काढण्यात येते. इतकेच नव्हेतर एखाद्या राष्ट्रपुरुषांची निंदा करणारा मजकूर छापून समाजामध्ये दुही पाडण्याचे प्रयोग केले जातात. हा सर्व वसाहतवादाचाच प्रकार होय. वसाहतवाद हा आर्थिक, राजकीय, धार्मिक व सांस्कृतिक स्वरूपाचा असतो. आजही भारतीय समाजावर राहणी, आवडीनिवडी, पोशाख, खाणे-पिणे इत्यादींवर ब्रिटिशांचा प्रभाव दिसतो हा वसाहतवादाचा वारसाच होय.

### वसाहतवादाची लक्षणे

आपल्याला वसाहतवादाची लक्षणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. परकीय असणाऱ्या थोड्या लोकांचे एतद्देशीय बहुसंख्याकांवर आर्थिक व राजकीय नियंत्रण असते.

२. आपली वांशिक व सांस्कृतिक श्रेष्ठता दाखविण्याचे वसाहतवाल्या राष्ट्राचे प्रयत्न असतात.

३. वसाहती स्थापन करणाऱ्यांमध्ये यंत्र व तंत्रज्ञान यामध्ये खूप प्रगती झालेली असते.

Scanned with ACE Scanner

४. वसाहतीतील लोक केवळ वेगळेच नव्हेतर कमी प्रतीचे आहेत असे दाखविण्याकडे 'जेते' राष्ट्रांचा प्रयत्न असतो.

५. 'जेते' राष्ट्रे आपले श्रेष्ठत्व दाखविण्यासाठी विविध साहित्य निर्माण करतात. उदा. अमेरिकन नाविक अधिकारी आल्फ्रेड महान याने 'सागरी सत्तेचा इतिहासावरील प्रभाव' (Influence of Sea Power on History) हा ग्रंथ लिहिला. इ. स.च्या १८ व १९ व्या शतकामध्ये इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, हॉलंड, बेल्जियम, रशिया व आशिया खंडांमधील जपानने जगाच्या वेगवेगळ्या भागात वसाहती निर्माण केल्या. इंग्लंडने पाचही खंडांमध्ये वसाहती निर्माण केल्या, त्यामधील सर्वांत मोठी व महत्त्वाची वसाहत म्हणजे भारत होय. म्हणून भारताचा उल्लेख "Jewell in the Crown" असा करीत असत. वसाहतीच्या व्याप्तीमध्ये पुढेपुढे राष्ट्रीय प्रतिष्ठाही पणाला लागली. तथापि, १९४५ नंतर मात्र वसाहतीचे युग संपले व जागतिक राजकारणामध्ये 'शीतयुद्ध' (Cold-War) ही कल्पना महत्त्वाची मानली जाऊ लागली. १९४५ नंतर वसाहतवादाची जागा साम्यवादी विचाराने घेतली. १९९० पर्यंत साम्यवादाची भरभराट होती. १९४५ पासून जागतिक स्तरावर वसाहतवादासंबंधी विश्लेषणाला सुरुवात झाली.

**वसाहतवादाचे विश्लेषण**

वसाहतवादासंबंधी पहिली चर्चा १८७०-१९०५ या काळात राष्ट्रीय चळवळीच्या नेत्यांमध्येच सुरू झाली होती. पहिल्या महायुद्धानंतर कम्युनिस्ट पक्ष व नियतकालिके यामध्ये चर्चा सुरू झाली. ही चर्चा युरोप, अमेरिका व खुद्द भारतामध्ये सुरू झाली. 'फॉर ईस्टर्न क्वॉर्टली' न्यूयॉर्क व अमरेशिया या नियतकालिकांमधून वसाहतवादासंबंधी प्रो. ओवेन लॅटिमोर, किंथ मिशेल, जोसेफ बार्नस यांनी विश्लेषण केले. लॅटिन अमेरिकेमधील वसाहतवादासंबंधी लेलॅण्ड जेक्स यांनी लिखाण केले. आफ्रिकेमधील वसाहतवादासंबंधी लिऑनॉर्ड वूल्फ यांनी संशोधनपूर्ण लिखाण केले. बिगर मार्क्सवादी विद्वानांमध्ये प्रो. जे. एस. फर्निवल यांनी वसाहतवादासंबंधी विश्लेषण केले. भारतामध्ये के. टी. शहा, सी. एन. वकील, प्रो. बाळकृष्ण वाडिया, मर्चंट यांनी राष्ट्रवादी दृष्टिकोणातून वसाहतवादाची समीक्षा केली. भारतीय मार्क्सवादी लेखकांमध्ये रजनी पामदत्त यांनी 'इंडिया टूडे' व प्रो. ए. आर. देसाई (मुंबई विद्यापीठ) यांनी "Social Background of Indian Nationalism" या ग्रंथातून वसाहतवादासंबंधी आपले विचार मांडले. वसाहती या परावलंबी (Dependent) असतात असे गृहीत धरून लिखाण केले जाते. याला "Dependancy theory" परावलंबित्वाचा सिद्धांत' म्हणतात. या सिद्धांतानुसार 'रॉल प्रिबिश' (Raul Prebisch) यांनी आपले विचार मांडले. दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकेमध्ये कम्युनिस्टाला हुडकून काढून त्यांना शासन करण्याची प्रक्रिया सुरू झाली. याला "ferreting out" किंवा गुप्तचरांनी शोधून काढणे असेही म्हणतात. अमेरिकन सेनापती जनरल मॅकआर्थर याने या कम्युनिस्टविरोधी मोहिमेत प्रो. ओवेन लॅटिमोर डॅनिअल थॉर्नर, लॉरेन्स रॉसिनजर यांना देशाबाहेर हाकलून लावले. याच सुमारास क्यूबा, अल्जेरिया, व्हिएतनाम, ब्राझील व चिली येथे वसाहतवादाविरुद्ध चळवळी सुरू झाल्या.

Scanned with ACE Scanner

जगभरातून विद्वानांनी वसाहतवादाचे खरे स्वरूप जगापुढे मांडले. दिवसेंदिवस वसाहतवादाविरुद्ध मोठी चळवळ सुरू झाली. १९५९-६० नंतरच्या चळवळीमध्ये गुंडर फ्रँक, सी. फर्टाडो, थिओडर डास सॅन्टॉस, पॉल बॅरन यांनी प्रभावी लिखाण केले. १९९० मध्ये साम्यवादी जगाचा मुख्य आधार सोव्हिएत रशियाचे पतन झाल्यावर हे विश्लेषण कमी होत गेले. इंग्लंड, फ्रान्स, अमेरिकेमध्ये वसाहतवादाविरुद्ध एकही अक्षर लिखाण झाले नाही. परंतु १९९० नंतर जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन यांच्यामार्फत श्रीमंत राष्ट्रे जगामध्ये नवा वसाहतवाद आणू पाहत आहेत. पण दुर्दैवाने भारतीय राज्यकर्ते याबाबत अतिशय गाफिल आहेत.

भारतीय व्यापार मंत्री मुरुसोली मारन व अरुण जेटली यांनी अविकसित राष्ट्रांची बाजू मांडली.

## ४. साम्राज्यवाद (Imperialism)

साम्राज्यवाद म्हणजे वसाहतवादाचे विकसित रूप होय. वसाहतवादामध्ये एखादी वसाहत (प्रदेश) मिळविणे असा हेतू असतो, परंतु साम्राज्यवादामध्ये अनेक वसाहती मिळवून तेथील नैसर्गिक साधनसंपत्ती आपल्या देशात (मायदेशात) आणणे व आपल्या देशाची भरभराट घडवून आणणे अशी वृत्ती असते. साम्राज्यवादाची अनेक वैशिष्ट्ये आहेत, त्यामध्ये नुसतेच राजकीय स्वरूप नसते तर आर्थिक, सामाजिक, धार्मिक व प्रतिष्ठा या बाबीसुद्धा मानल्या जातात. प्राचीन काळापासून साम्राज्य ही संकल्पना अस्तित्वात आहे. प्राचीन भारतामध्ये चंद्रगुप्त मौर्य, हर्षवर्धन इत्यादींची साम्राज्ये होती,त्यांचे स्वरूप मूलभूतपणे राजकीय होते. मध्ययुगात भारताप्रमाणेच युरोपीय राष्ट्रांची साम्राज्ये होती पण या वसाहतीचा मायदेशाला आर्थिकदृष्ट्या उपयोग होत नसे उलट मायदेशातून वसाहतीकडे साधनसंपत्तीचा ओघ वाहत असे म्हणून मध्ययुगीन वसाहतींचा उल्लेख ब्रिटिश पंतप्रधान बेंजामिन डिझरायली, 'मायदेशाला लागलेल्या गोचड्या' (Leeches clung to the homeland) अशा शब्दांत करतो. तथापि, १८ व्या शतकात इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाली व मायदेशातील उद्योगधंदे टिकविण्यासाठी कच्च्या मालाची आवश्यकता वाटू लागली व तयार झालेला पक्का माल विकण्यासाठी बाजारपेठांची नितांत गरज भासू लागली. यामधूनच १९ व्या शतकामध्ये बड्या राष्ट्राचा साम्राज्यवाद निर्माण झाला त्याला 'नवसाम्राज्यवाद' (New Imperialism) असे म्हणतात. अत्यंतिक राष्ट्रवाद, वांशिक श्रेष्ठता, औद्योगिकीकरण व आक्रमकवृत्ती यामधून नवसाम्राज्यवादाचा पाया घातला गेला. भिन्न वंश, भाषा, धर्म व संस्कृती असलेल्या समाजावर वर्चस्व गाजविणे ही नवसाम्राज्यवादाची मूळची प्रेरणा होय. औद्योगिकीकरण व व्यापारवाद ह्यामुळे साम्राज्यवादाला वेगळाच अर्थ प्राप्त झाला. साधनसामग्रीमधील विकास, भौतिकशास्त्रामधील प्रगती, सुएझ कालव्याची उभारणी यामुळे साम्राज्यवादाचा विकास झाला.

१९ व्या शतकामध्ये इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, पोर्तुगाल, इटली यांनी आफ्रिका व आशिया खंडामध्ये साम्राज्यविस्तार केला. इंग्लंडने आफ्रिका खंडामध्ये अनेक वसाहती

Scanned with ACE Scanner

मिळविल्या. ईजिप्त, सुदान, द. आफ्रिका येथे तसेच आशिया खंडामध्ये भारतासारखी मोठी वसाहत मिळविली. फ्रान्सने आफ्रिकेमध्ये अल्जेरिया, ट्युनेशिया, उत्तर व पश्चिम किनारा, सहारा, सेनेगल, आयव्हरी कोस्ट, मादागास्कर इत्यादी वसाहती मिळविल्या. प्रत्येक युरोपीय राष्ट्राने काही ना काही वसाहती मिळविल्या. याशिवाय चीन हा इंग्लंड, जर्मनीच्या आक्रमणाला बळी पडला. जपानमध्ये अमेरिकेने प्रवेश केला. हा सर्व साम्राज्यवाद १९४५ नंतर संपला व जगाच्या पार्श्वभूमीवर मार्क्सवादाचा मोठ्या प्रमाणात प्रसार झाला. पुढील ५० वर्षे रशिया म्हणजे कम्युनिझम व अमेरिका यांचा संघर्ष झाला. १९९० साली सोव्हिएत रशियाचा पाडाव झाला. त्यानंतर सध्याच्या काळी अमेरिकेची दादागिरी जगावर सुरू आहे. इराक हे सध्याच्या अमेरिकन साम्राज्यवादाचे स्वरूप आहे. साम्राज्यवादासंबंधी विविध नेत्यांनी आपले विचार मांडले आहेत.

## साम्राज्यवादाविषयी विश्लेषण

साम्राज्यवादाचा पाया म्हणजे भांडवलशाही होय. या मूलभूत आधारावरच लेनिन, माओ-त्से-तुंग क्वॉमे एन्क्रुमा या मार्क्सवादी नेत्यांनी टीका केली आहे. या प्रत्येकाने आपापल्या परीने साम्राज्यवादाची लक्तरे जगाच्या वेशीवर टांगण्याचा प्रयत्न केला आहे. या चर्चेच्या संदर्भात प्रो. राजन हर्षे यांचा ग्रंथ 'ट्वेंटिएथ सेंचुरी एम्पॅरियालिझम' 'शिफ्टिंग कंट्रस व चेंजिग कन्स्पशन्स' हा ग्रंथ वाचनीय आहे. प्रो. हर्षे यांच्या मते, साम्राज्यवादाचा प्रत्यक्ष संबंध विकसित होत जाणाऱ्या भांडवलशाहीशी आहे.'[१०] साम्राज्यवादामध्ये भौतिकदृष्ट्या पूर्ण विकसित राष्ट्रे व मागासवर्गीय राष्ट्रे यांचा संबंध असल्याचे आपल्याला दिसून येते.'[११] सोव्हिएत रशियाचा जनक लेनिन याच्या मते, साम्राज्यवाद ही भांडवलशाहीची उच्चतम स्थिती आहे. मार्क्सपेक्षा लेनिनने भांडवलशाहीचे जास्त साकल्याने मूल्यमापन केले आहे. साम्राज्यवादासंबंधीचे लेनिनचे विचार आपल्याला त्याच्या "Imperialism; The Highest Stage of Capitalism" या प्रबंधामध्ये दिसून येतात.

**लेनिनचे साम्राज्यवादाविषयीचे विश्लेषण :** कार्ल मार्क्सने केलेल्या साम्राज्यवादाच्या समीक्षेमध्ये 'भांडवलशाही' या संकल्पनेवर अवास्तव भर दिला. लेनिनने साम्राज्यवाद व भांडवलशाहीमधील मक्तेदारी या संकल्पनेचा विचार केला. लेनिनचा साम्राज्यवादाकडे पाहण्याचा दृष्टिकोण असा होता. मार्क्सवादावर आधारित, लेनिनने भांडवलशाही व मक्तेदारी यांची सांगड घालून व्यवहारी मार्क्सवाद निर्माण करण्याचा प्रयत्न केला. मार्क्सचा सिद्धांत तात्त्विक स्वरूपाचा होता तर लेनिनने रशियासारख्या आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या देशात मार्क्सवादावर आधारित समाज निर्माण करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. लेनिनच्या मते, एखाद्या देशामधील सामाजिक व आर्थिक विकास घडवून आणण्याचे सामर्थ्य मक्तेदारीवर आधारित भांडवलशाही अर्थव्यवस्थेमध्ये आहे.'[१२] बिल वॅरन या मार्क्सवादी तत्त्ववेत्त्याच्या मते, लेनिन हा पोथीनिष्ठ मार्क्सवादी नव्हे. असा फरक पडण्याचे कारण प्रो. राजन हर्षे यांच्या मते, लेनिनच्या वेळेची समाजव्यवस्थाच ही होय. मार्क्सने तात्त्विकदृष्ट्या उत्पादन प्रक्रियेला (पद्धतीला) Mode of Production महत्त्व दिले. त्याचे हे ऋण लेनिनने मान्य

Scanned with ACE Scanner

केले आहे. लेनिनच्या दृष्टीने साम्राज्यवादाची पुढील पाच वैशिष्ट्ये आहेत.

१. मानवी जीवनामध्ये उच्च प्रकारची अर्थव्यवस्था निर्माण करावयाची असेल तर उत्पादनाची प्रक्रिया व भांडवल यांचे मक्तेदारीमध्ये रूपांतर झाले पाहिजे.

२. पतपेढी (बँक) मधील भांडवल व उद्योगधंद्यामधील भांडवल याचे एकीकरण झाले पाहिजे. अशा स्थितीमधूनच आर्थिक सत्तास्थाने निर्माण होऊ शकतील.

३. मालाच्या जोडीलाच भांडवलांचीसुद्धा निर्यात झाली पाहिजे.

४. औद्योगिक मक्तेदारी, भांडवलशाही संघटना निर्माण करून जगाचे तशा प्रकारे विभाजन झाले पाहिजे.

५. संपूर्ण जगाचे मोठ्या भांडवलशाही गटांमध्ये विभाजन झाले पाहिजे.

**माओत्से-तुंगचे विश्लेषण :** लेनिनच्या सिद्धांताचा परिणाम जगामधील तिसऱ्या स्वातंत्र्य चळवळीवर झाला. रशियाप्रमाणे चीनमध्येही साम्यवादी विचारसरणी वाढू लागली होती. तेव्हा चिनी जनतेचा साम्यवादी नेता माओत्से-तुंग याने मार्क्स व लेनिन यांच्या सिद्धांताचा व त्यामधील विरोधाभासाचा/विसंगतीचा अभ्यास सुरू केला. माओने विसंगतीचा अभ्यास करण्यासाठी हेगेलप्रणीत अंतर्विरोध (Dialectic) तत्त्वाचा अवलंब केला व आपला 'विसंगतीचा सिद्धांत' (Theory of Contradictions) मांडला. माओने, मार्क्स व लेनिन यांच्या विचारांमधील विसंगतीचा अभ्यास करून साम्राज्यवादासंबंधी आपले विचार मांडले. मार्क्स व लेनिन यांनी सामाजिक व आर्थिक विकासासंबंधी आपले विचार मांडले पण मार्क्सने भांडवलशाहीवर हल्ला चढविला तर लेनिनने मक्तेदारीमधून निर्माण होणाऱ्या भांडवलशाहीवर आपले विचार मांडले. हे सिद्धांत दिसावयास जरी विरोधी/विसंगत वाटले तरी ते प्रत्यक्षात कसे एकच आहेत हे माओने दाखवून दिले. दोन्ही विचारप्रणालींमधील तत्त्वामध्ये कसे समान गुण आहेत व त्यावरच जागतिक साम्राज्यवाद अवलंबून होता असा सिद्धांत माओने मांडला. या विचारप्रणालीमध्ये अंतर्संबंध आर्थिक बाबीवर आधारित असतात हे दाखवून देऊन माओने मार्क्सवादाला अधिक व्यापक व सर्वसमावेशक बनविले.

**क्वामे एन्क्रुमाचे विश्लेषण :** क्वामे एन्क्रुमा हा आफ्रिकेमधील 'घाना' देशाचा अध्यक्ष होता. तो समाजवादी तत्त्वज्ञानावर विश्वास ठेवणारा होता. एन्क्रुमाने साम्राज्यवादासंबंधीचे आपले विचार, "Neo-Colonialism : The Last Stage of Imperialism" या निबंधामध्ये मांडले आहेत. एन्क्रुमाचे तत्त्वज्ञान समकालीन विद्वानांच्या विचाराचे प्रतिनिधित्व करते. म्हणून त्यांच्या मतांना तत्कालीन विश्वामध्ये विशेष महत्त्व प्राप्त झाले. त्याच्या समकालीन जागतिक नेत्यांमध्ये पं. नेहरू, अब्दुल गमाल नासर, सुकार्नो, सेकोयुटोरो, मोडिबो केटा यांचा समावेश होता. एन्क्रुमाच्या साम्राज्यवादावरील मताला महत्त्व येण्याचे आणखी कारण असे की आशिया व आफ्रिका खंडांमधील साम्राज्यशाही विरुद्धच्या लढ्यामध्ये मूलभूत फरक होता. म्हणून एन्क्रुमाची मते अभ्यासण्याकडे तिसऱ्या जगातील विद्वानांचा कल असतो. त्याच्या साम्राज्यवादावरील विचारांना 'नववसाहतवादी' (Neo-colonialism) म्हणतात.

Scanned with ACE Scanner

साम्राज्यवादासंबंधीच्या एन्क्रुमाच्या मतांना पुढील कारणांमुळे महत्त्व प्राप्त झाले.

१. तो स्वत: आर्थिक इतिहासाचा (Economic history) विद्यार्थी होता.

२. तो मूलत: अत्यंत सामान्य परिस्थितीमधून वर आल्याने साम्राज्यवादाची झळ त्याला पोहोचली होती.

३. दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकेमार्फत सुरू झालेल्या 'नववसाहतवादा'(Neo-colonialism) ची पावले एन्क्रुमाने ओळखली होती. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँक ही नववसाहतवादाची छुपी शस्त्रे आहेत हे त्याने सर्वांच्या निदर्शनास आणून दिले. 'नव वसाहतवादा'संबंधी त्याचा सिद्धांत असा की, 'साम्राज्यवादाला हाणून पाडण्यासाठी आफ्रिकन राष्ट्रांनी एकत्रितपणे लढा दिला पाहिजे. अन्यथा' वेगळ्या पावलांनी साम्राज्यवाद पुन्हा डोके वर काढेल.' आज आफ्रिकेचा इतिहास पाहता एन्क्रुमाचा द्रष्टेपणा आपल्या सहज लक्षात येतो. थोडक्यात, साम्राज्यवाद ही संकल्पना जागतिक राजकारणाच्या क्षितिजावर कोणत्या ना कोणत्या स्वरूपात आपल्याला दिसून येते.

## ५. भांडवलशाही (Capitalism)

जगाची वाटचाल मध्ययुगीन सरंजामशाहीमधून आधुनिक काळातील भांडवलशाही युगात झाली. युरोपीय इतिहासामध्ये इ. स. १४५३ हे वर्ष आधुनिक युगाची सुरुवात मानतात तर भारतामध्ये १७५७ हे साल आधुनिक युगाची सुरुवात मानतात. हे वाचकांनी ध्यानात घेतले पाहिजे. ज्या घटनेचा युगावर परिणाम होतो ती घटना आधारभूत मानून इतिहासाचे कालखंड ठरविले जातात. त्यामुळे युरोपमध्ये १५ व्या शतकात वाणिज्यवादाला सुरुवात झाली त्याचे उघड स्वरूप म्हणजे भांडवलशाही युग होय. वाणिज्यवादातून कारखानदारी, त्यामधून आयात-निर्यात व्यापार व त्यामधून भांडवल संचय अशी ही प्रक्रिया आहे.

भांडवलशाहीची व्याख्या करण्याचा अनेकांनी प्रयत्न केला आहे. या व्याख्या विपुल, वादग्रस्त व आर्थिक इतिहासामध्ये वादंग निर्माण करणाऱ्या ठरल्या आहेत. काही विद्वानांनी भांडवलशाहीची व्याख्या प्राचीन कालापासून करण्याचा प्रयत्न केला आहे. या व्याख्या परस्परविरोधी असतात. विसंगत अशा असून आर्थिक इतिहासावर प्रकाश टाकण्यास असमर्थ ठरतात. भांडवल या शब्दामध्ये काही व्याख्याकारांना नफा-तोटा, गुंतवणूक व निर्माण प्रक्रिया आहेत असे वाटते. काही विद्वानांनी हा विषय अधिक संकुचित करून स्पर्धा, बाजारपेठ, विनिमयाच्या क्षेत्रामधील पैशाचे महत्त्व यांच्याशी जोडण्याचा प्रयत्न केला आहे. काही अर्थतज्ज्ञांच्या मते, औद्योगिकीकरणाशी देशाची आर्थिक चौकट जोडून त्याच्या संदर्भात भांडवल या संज्ञेचा विचार केला आहे.[१३] प्रो. रॉबर्ट डुप्लेसिस यांनी भांडवलाची अशी व्याख्या केली आहे-'भौतिक संपत्ती निर्माण करण्यासाठी चोखाळलेला सूत्रबद्ध, वैशिष्ट्यपूर्ण मार्ग म्हणजे भांडवल होय.'[१४] भांडवलशाही अर्थव्यवस्थेमध्ये व्यक्ती किंवा गट भांडवल संचय करतात हा संचय पैशाच्या स्वरूपात असतो. हा पैसा रोखीच्या स्वरूपात , पतनिर्मिती, जमीनजुमला, वस्तुनिर्मितीची साधने (Productive equipment), कच्चा माल अशा स्वरूपात

Scanned with ACE Scanner

असतो. अशा भांडवलाच्या साहाय्याने कामगार, शेतमजूर उपलब्ध होत असतात.

भांडवलशाही जगामध्ये भांडवलदारांत स्पर्धा असते. त्याचा फायदा गिऱ्हाईकाला होतो. स्पर्धेमध्ये टिकण्यासाठी किंमत कमी करावी लागते व त्यामुळे उत्पादनशक्ती वाढते. अशा स्पर्धेमधून नव्या संशोधनाच्या वाटा भांडवलदारांना मिळतात. भांडवलशाही अर्थव्यवस्थेमध्ये वस्तू, पैसा, जमीन, श्रम करणारे कामगार, दूर पल्ल्याचा व्यापार व बुद्धीला पटेल एवढा फायदा मिळविता येतो. भांडवलशाही अर्थव्यवस्थेमध्ये विविध गटांमधील आर्थिक संबंध, संस्था, नव्या निर्माण झालेल्या प्रवृत्ती या संकल्पनांचा विकास झाला. उत्पादन प्रक्रियेमध्ये क्रांतिकारक बदल झाले. अर्थात, ही भांडवलशाही व्यवस्था सर्वत्र समान पद्धतीने विकसित झाली नाही. बाजारामधील अनिश्चितता ही भांडवलशाही व्यवस्थेला मिळालेला वारसा आहे.

## भांडवलशाहीचा विकास

भांडवलशाही, तिचा विकास व अनेक पैलू यासंबंधी अनेक विद्वानांनी आपले विचार मांडले आहेत. अशा विद्वानांमध्ये प्रो. रॉडनी हिल्टन, कार्ल मार्क्स, प्रो. मॉरिस डॉब, मॅक्स वेबर, अर्ल हॅमिल्टन, हेन्री प्रिएन, प्रो. बर्नर सोम्बार्ट, लिप्सन इत्यादींचा समावेश होतो. प्रो. हिल्टन यांच्या मते, भांडवलशाहीचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे ही अर्थव्यवस्था समाजाचे मालमत्ता विहीन वर्ग व उद्योजक असे विभाजन करते. प्रो. हेन्री प्रिएन यांच्या मते, या व्यवस्थेमध्ये समाजामध्ये हळूहळू संपत्ती जमा करणारा एक वर्ग निर्माण होतो. त्यालाच भांडवलशहा असे म्हणतात. कार्ल मार्क्सने मार्क्सवादी दृष्टिकोणातून भांडवलशाहीचे वर्णन केले. भांडवलशाही म्हणजे एक विशिष्ट उत्पादन पद्धती होय. (A Mode of Production) अशा प्रकारच्या उत्पादन पद्धतीवरच समाजाची भौतिक संपत्ती, स्वास्थ्य, राजकीय संस्था, विचारधारा व कार्य अवलंबून असते.'

मार्क्सच्या मते, समाजाचे मध्ययुगातून आधुनिक उद्योगप्रधान जगामध्ये परिवर्तन होत असताना म्हणजेच शेतीव्यवसायामधून उद्योगप्रवण अर्थव्यवस्थेमध्ये परिवर्तन होत असताना त्या समाजाकडे उत्पादन पद्धतीची साधने कोणती व कशी आहेत यामधूनच भांडवलशाहीचा उदय होतो. भांडवलशाहीच्या विकास प्रकियेचा अभ्यास करीत असताना उत्पादनाचे तंत्र (Technique of Production) व उत्पादन तंत्राचे इतर घटकांशी असणारे नाते याचा अभ्यास केला पाहिजे. भांडवलशाहीमध्ये खाजगी मालकीला महत्त्व असते. अशा भांडवलामधून मालाचे उत्पादन (Production), विनिमय (Exchange) व सुलभ सेवा (Service) या सर्वांचा हेतू फायदा मिळविणे हाच असतो. भांडवलशाहीमध्ये जेव्हा उद्योजकांना आपल्या व्यवसायामध्ये मोकळीक, स्वातंत्र्य असते. सरकारी हस्तक्षेप कमीतकमी असतो तेव्हा त्या अर्थव्यवस्थेला 'मुक्त व्यापारी अर्थव्यवस्था' (Free Market Economy) असे म्हणतात.

१९ व्या शतकामधील अर्थतज्ज्ञांनी भांडवलशाहीच्या विकासाची पुढील तीन कारणे मान्य केली आहेत. (१) वाढता व्यापार (२) तांत्रिक प्रगती व (३) लोकसंख्यावाढीमुळे निर्माण झालेली मागणी. प्रो. मॉरिस डॉब यांनी वरील तीन कारणांवर आधारित भांडवलशाहीचे

Scanned with ACE Scanner

विश्लेषण केले आहे. प्रो. वर्नर सोम्बार्ट यांना भांडवलशाही निर्माण होण्यासाठी समाजाच्या ठिकाणी ही मनोवृत्ती निर्माण झाली पाहिजे असे प्रकर्षाने वाटते. उत्पादन प्रक्रियेचे नियोजन कशा प्रकारे केले आहे यावर भांडवलशाहीचे भवितव्य अवलंबून असते, दूरचा व्यापार (Distant trade) व दूरची बाजारपेठ (Distant market) यासाठी भांडवलशाही उपयुक्त आहे असा निर्वाळा प्रो. वर्नर सोम्बार्ट यांनी दिला आहे. भांडवलशाहीच्या उदयामुळे किरकोळ खरेदी-विक्री (retail sale-purchase) या संकल्पना कमी महत्त्वाच्या ठरू लागल्या. प्रो. अर्ल हॅमिल्टन यांच्या मते, भांडवलशाही पद्धतीचा हेतू मूलत: उत्पन्न वाढविणे हाच असतो. या हेतूमध्ये जमीन हा घटक समाविष्ट होत नाही. प्रो. हेन्री प्रिएन यांच्या मते, कोणतीही बाब मिळविण्यासाठी पैसा महत्त्वाचा असतो त्यामुळे भांडवलशाही व्यवस्थेमध्ये पैशाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त होते. 'प्रो. नॉसबॉय यांच्या मते, या व्यवस्थेला 'विनिमयाचे अर्थशास्त्र' म्हणता येईल. १९ व्या शतकापासून भांडवलशाहीचा विकास होत गेला. या विकासाची कारणे प्रो. हेन्री प्रिएन यांच्या मते, अशी होती - (१) व्यापारवृद्धी झाली (२) उत्पादन तंत्रामध्ये खूप बदल झाले. (३) व्यापारवृद्धीमुळे सरंजामशाही अर्थव्यवस्था मोडकळीस आली. प्रो. मॉरिस डॉब यांना काही मते मान्य नाहीत. कारण काही वेळा व्यापारामधून मिळालेल्या पैशातून जमिनी खरेदी करण्यात आल्या. अशा जमिनीवर जे मजूर कामावर लावण्यात आले त्यांचे शोषण, सरंजामशाहीप्रमाणे होत आहे. रशियन अर्थतज्ज्ञ इतिहासकार ओटो कुसिनेन (Otto Kuusinen) यांच्या मते, भांडवलशाही प्रधान उत्पादन तंत्राने हस्तकला व्यवसाय कायमचा संपविला. जुन्या ग्रामीण व्यापारश्रेणी (Trade Guilds) यांचा शेवट झाला. प्रो. स्विझी (Sweezy) यांनी भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा उल्लेख "Putting out system" किंवा व्हेरलागॅस सिस्टीम (verlagas system) असा केला आहे.'

## सरंजामशाही व भांडवलशाही यांच्यामधील भेद

**सरंजामशाही :** १. या व्यवस्थेमध्ये जमीन हा उत्पादनाचा मुख्य स्रोत असतो.

२. या व्यवस्थेमध्ये शेती, ग्रामीण अर्थव्यवस्था, नागरी अर्थव्यवस्था, अंतर्गत व बाह्य व्यापार व प्रयोगशीलता यावर बंधने असतात.

३. या व्यवस्थेमध्ये उदरनिर्वाहाची अर्थव्यवस्था (subsistance economy) असते म्हणजेच उत्पादन व उत्पन्न मर्यादित स्वरूपाचे असते.

४. या व्यवस्थेमध्ये फक्त वैयक्तिक गरजा भागू शकतात.

**भांडवलशाही :** १. या व्यवस्थेमध्ये उत्पादनाची साधने जास्त प्रगत असतात व ती जादा उत्पादन करू शकतात.

२. श्रमविभागणी चांगल्या प्रकारे झालेली असते. मालाची वाहतूक करण्याची साधने सुधारित असतात त्यामुळे कारखान्यामध्ये तयार होणारा माल गिऱ्हाईकापर्यंत लवकर पोहोचतो.

३. विविध क्षेत्रांमध्ये झालेल्या शास्त्रीय शोधांचा व तंत्रज्ञानाचा उपयोग करून ही अर्थव्यवस्था 'अतिरिक्त अर्थव्यवस्था' (surplus economy) बनते.

Scanned with ACE Scanner

४. या व्यवस्थेमध्ये व्यक्तीच्या बुद्धिमत्तेला, कार्यक्षमतेला, उत्पादन निवडीला व गुणवत्तेला खूप संधी असते. मालाचा दर्जा व संख्या गिऱ्हाईकाला पुरेशी होईल अशा प्रकारे उत्पादन करता येते.

५. मालाची किमत ठरविण्याचा अधिकार उत्पादकाला असतो. त्यामुळे त्याचा व्यापार वाढतो. केलेले उत्पादन बाजारपेठ लक्षात घेऊन केले जाते. मागणी तसा पुरवठा (Demand and Supply) या तत्त्वाचा अंमल उत्पादनावर असतो.

## नव्या शास्त्रीय संशोधनाचा प्रभाव

इ. स. १५५० ते १७०० या काळात झालेल्या शास्त्रीय संशोधनाने भांडवलशाही संकल्पनेच्या मुळावरच घाव घातला. खगोलशास्त्र, तंत्रशास्त्र व वैद्यकशास्त्रामध्ये नवे संशोधन झाले. या क्षेत्रामध्ये गॅलिलिओ, केप्लर, बॉईल, हार्वे, न्यूटन या शास्त्रज्ञांनी शोध लावून, तेच शास्त्रीय जिज्ञासेचे तत्त्व इतर क्षेत्रांमध्येही आणण्याचा प्रयत्न केला त्यामुळे भांडवलशाहीवर त्याचा प्रभाव पडला. या संशोधनामधून प्रगत राष्ट्रांना पैशाचा ओघ कोठून कोठे वाहत आहे याची कल्पना आली. विशेषत: १९४७ भारत स्वतंत्र झाल्यावर हे सर्व ज्ञान प्राप्त झाल्यावर भांडवलशाही प्रगती शक्य होती. परंतु भारतीय राजकारणी एकाच वेळी समाजवाद व लोकशाहीच्या घोड्यावर स्वार होत असल्यामुळे आपली अर्थव्यवस्था समाजवादी आहे, साम्यवादी आहे का भांडवलशाहीवादी आहे हेच निश्चित नाही. सध्या तर साम्यवादी गटाच्या नियंत्रणाखाली भारतीय अर्थव्यवस्था असल्याने भारताच्या अर्थव्यवस्थेची पीछेहाट होण्याचा धोका वाटतो.

## ६. लोकशाही (Democracy)

आधुनिक जगामधील सजीव, प्रेरणादायी, मानवी समाजाला आधार देणारी व हुकूमशाहीसारख्या दृश्य प्रवृत्तीचा नि:पात करणारी राजकीय संस्था म्हणून लोकशाही संकल्पना ओळखली जाते. लोकशाहीची प्रेरणा जिवंत राखण्यासाठी २० व्या शतकामध्ये जगाला दोन महायुद्धांना सामोरे जावे लागले. त्यासाठी मानवी समाजाला मोठी किमतही मोजावी लागली. प्राचीन ग्रीकांपासून अनेक विद्वानांनी लोकशाहीची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे. तथापि, अमेरिकन अध्यक्ष अब्राहम लिंकन याने केलेली व्याख्या "It is the Government of the people, for the people and by the people." जास्त सयुक्तिक वाटते. वस्तुत: हे विचार थिओडोर पार्कर या विचारवंताचे आहेत. परंतु अध्यक्षपदाच्या निवडणुकीच्या रणधुमाळीत लिंकनने 'गेटसबर्ग' येथील आपल्या भाषणात याचा उल्लेख केला व शॉर्टहॅन्ड लिपीचा निर्माता पिटमन याने हे विधान दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात प्रसिद्ध केले व ही व्याख्या लिंकनच्या नावावर कायमची खपली. लोकशाही ही नुसतीच राजकीय प्रणाली नव्हेतर त्याच्याही पेक्षा तिचे स्थान फार मोठे आहे. ही नुसतीच राजकीय संस्था नसून राज्य, समाज व व्यक्ती यांच्याशी निगडित आहे. लोकशाहीला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. यापैकी सर्वांत महत्त्वाची समस्या म्हणजे योग्य व्यक्तीला संसदेमध्ये पाठविणे. लोकशाही



Scanned with ACE Scanner

प्रत्यक्ष स्वरूपाची असावी का अप्रत्यक्ष स्वरूपाची असावी ? लोकांचे प्रतिनिधित्व प्रांतवाद असावे का व्यवसायाधिष्ठित असावे ? अशा अनेक समस्या आहेत. या संदर्भात भारतीय लोकशाहीचा विचार शेवटी करू.

## लोकशाहीच्या विकासासाठी आवश्यक बाबी

कोणत्याही देशामध्ये लोकशाही यशस्वी व्हावयाची असेल तर पुढील बाबींची आवश्यकता आहे. (१) जनता सुशिक्षित असावी. (२) जनतेमध्ये सहिष्णुता वृत्ती असावी. (३) जनतेमध्ये उत्तम प्रकारच्या नागरिकत्वाची जाण असावी. (४) मूलभूत आर्थिक विषमता असू नये. (५) जनता राष्ट्रहितासंबंधी सतत जागरूक असावी. (६) राज्यघटना लिखित स्वरूपाची असावी. (७) नागरिकांना विचार, लेखन व मत स्वातंत्र्य असावे. (८) समाजाची उभारणी विषमतेच्या तत्त्वावर नसावी. (९) देशामध्ये स्वतंत्र न्यायसंस्था असावी: (१०) लोकमत जागृत असावे. या सर्व बाबींचा भारतीय लोकशाहीच्या संदर्भात विचार करण्याची आज गरज आहे. देशामध्ये स्वाभिमान व निःस्पृहपणाच्या गुणांचा विकास होणे गरजेचे आहे.

लोकशाहीचा पुढील विचार करण्यापूर्वी विद्वानांनी लोकशाहीच्या केलेल्या काही व्याख्या पाहू. प्रो. जॉन सिली यांच्या मते, 'लोकशाही सरकारमध्ये प्रत्येकाचा वाटा असतो. किंबहुना ज्या सरकारमध्ये प्रत्येकाचा वाटा असतो त्याला लोकशाही म्हणतात.' प्रो. जॉन ब्राईस यांच्या मते, 'लोकशाही सरकारमध्ये बहुमताला किंमत असते.' प्रो. डायसी यांच्या मते, 'संपूर्ण देशाच्या तुलनेत अत्यंत छोट्या गटाच्या हातात सत्ता असते.' ग्रीक इतिहासकार हेरोडोटस यांच्या मते, 'लोकशाही म्हणजे सत्ता.' प्रो. गेटेल यांच्या मते, "Democracy is that form of government in which the mass of population possesses the right share in exercise of sovereign power." सर हेन्री मेन यांच्या मते, 'लोकशाही ही एक शासनव्यवस्था आहे यापेक्षा जादा काही नाही.' जेम्स रसेल लॉवेल यांच्या मते, 'राज्य चालविण्याच्या प्रक्रियेमधील एक प्रयोग' एवढीच लोकशाहीची व्याख्या करता येईल.

## लोकशाहीचे प्रकार

लोकशाहीचे मुख्य दोन प्रकार आहेत - (१) शुद्ध लोकशाही किंवा प्रत्यक्ष लोकशाही (२) अप्रत्यक्ष किंवा प्रातिनिधिक लोकशाही. प्रत्यक्ष लोकशाहीमध्ये सामान्य नागरिकाला हजर राहून आपले मत मांडण्याचा अधिकार असतो. अप्रत्यक्ष लोकशाहीमध्ये जनतेची मते मांडण्याचे काम त्यांचे प्रतिनिधी करीत असतात. प्रत्यक्ष लोकशाहीमध्ये व्यक्ती स्वतःची मते स्पष्टपणे, निर्भयपणे मांडू शकते. प्रो. गार्नर यांच्या मते, राज्याची धोरणे आखण्यामध्ये व्यक्तीचा प्रत्यक्ष संबंध असतो. अशा व्यक्ती समाजात मिसळून, लोकांना एकत्र आणून, सरकारी धोरणे ठरविण्याचे काम करीत असतात. अप्रत्यक्ष वा प्रातिनिधिक लोकशाहीमध्ये लोकनियुक्त प्रतिनिधी संसदेमध्ये आपल्या मतदार संघामधील अडीअडचणी मांडत असतात व कारभारात सुधारणा सुचवित असतात. प्रो. गार्नर यांच्या मते, अप्रत्यक्ष लोकशाहीमध्ये सरकारला धोरण ठरविण्याच्या कामात जनतेचे प्रतिनिधी सहकार्य करीत असतात.

Scanned with ACE Scanner

प्रत्यक्ष लोकशाहीमध्ये सरकारला ताळ्यावर आणण्यासाठी जनमत चाचणी, प्रतिनिधीने काम न केल्यास त्याला परत बोलाविण्याचा हक्क जनतेला असतो, सार्वमत घेणे इत्यादी मार्गांचा अवलंब केला जातो. अप्रत्यक्ष लोकशाहीमध्ये निवडून गेलेले प्रतिनिधी आपली मते मांडून सरकारला ताळ्यावर आणण्याचा प्रयत्न करतात.

**लोकशाही यशस्वी होण्याची सूत्रे**

कोणत्याही देशात लोकशाही यशस्वी व्हावयाची असेल तर पुढील निकष आवश्यक मानले जातात.

१. जनता सुशिक्षित असली पाहिजे.

२. जनतेमध्ये सहिष्णुतेचा गुण बाणला गेला पाहिजे.

३. समाजामध्ये ऐक्याची भावना निर्माण झाली पाहिजे.

४. सार्वजनिक जीवनामध्ये नेता व जनता यांच्या अंगी प्रामाणिकपणा बाणला पाहिजे.

५. जनतेमध्ये नागरिकत्वाचे उत्तम गुण निर्माण झाले पाहिजेत.

६. शक्यतो आर्थिक विषमता असू नये.

७. समाज सतत संकटापासून सावध असला पाहिजे.

८. राज्यघटना लिखित स्वरूपाची असावी.

९. जनता व नोकरशाही यांच्यामध्ये समन्वय असणे आवश्यक आहे.

१०. जनतेला मूलभूत स्वातंत्र्य असावे.

११. कनिष्ठ सभा किंवा वरिष्ठ सभेमध्ये निवडून गेलेल्या सभासदांना कायदेमंडळाच्या कार्यपद्धतीची माहिती असावी.

१२. राज्यघटनेने सामाजिक समता प्रस्थापित केलेली असावी.

१३. सत्तेचे योग्य प्रकारे विभाजन झालेले असावे.

वरील गृहीतके पाहिली असता भारतीय लोकशाही विकासाच्या कोणत्या टप्प्यावर आहे याची अभ्यासूंना कल्पना यावयास हरकत नाही. ज्या देशामध्ये व्यक्तिपूजा, घराणेशाही चालते तो देश अजूनही मध्ययुगात वावरत आहे हे आपल्या लक्षात येईल.

**७. साम्यवाद** (Communism)

साम्यवाद व समाजवाद या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. साम्यवादाचे मूळ मार्क्सप्रणीत तत्त्वज्ञानामध्ये आहे तर याच वादाचे व्यवहारी स्वरूप म्हणजे समाजवाद होय. इ. स. १८४८ साली मार्क्स व एंगल्स यांनी साम्यवादाचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. (Communist Manifesto) व नंतर पुढे मार्क्सने प्रसिद्ध केलेला 'कॅपिटल' या ग्रंथाच्या तीन खंडामध्ये मार्क्सचे तत्त्वज्ञान मांडण्यात आले आहे. कार्ल मार्क्सचा कालखंड (१८१८-१८८३) या काळात त्याने युरोपला फार मोठे वैचारिक धन पुरविले. मार्क्स याला आपण १९ व्या व २० व्या शतकामधील सर्वांत प्रभावी, जनहिताची काळजी असणारा तत्त्वज्ञ

Scanned with ACE Scanner

म्हणून ओळखतो. मार्क्सच्या जन्माआधी जगात दारिद्र्य होते, दलित लोक होते, त्यांची स्थिती कशी सुधारावी, याचा विचार करणारे विचारवंतही होते.

एकमेकांशी प्रेमाने वागून सहकारी संघ स्थापून, समविचारांच्या लोकांची एखादी आदर्श वसाहत निर्माण करून सर्वांना सुखी करणारा, समतेवर आधारित समाज निर्माण करता येईल अशी या लोकांची भाबडी आशा होती. या लोकांना स्वप्नाळू समाजवादी (Utopian Socialist) म्हणतात.[१५] या स्वप्नाळू अवस्थेमधून समाजाला व समाजवादाला जागे करण्याचे काम कार्ल मार्क्सने केले. मार्क्स ज्या वेळी आपले विचार मांडत होता त्या वेळी औद्योगिक भांडवलशाही (Industrial Capitalism) अस्तित्वात होता. संपत्तीचे केंद्रीकरण झाले होते व सत्ता मूठभर लोकांच्या हातात एकवटली होती. अशा वेळी स्वप्नाळू समाजवाद किंवा साम्यवाद यांना वैचारिक चालना मिळाली. कार्ल मार्क्सने समाजवादी विचारांच्या दिशेने पुढील तीन पावले टाकली. (१) साम्यवादी विचारसरणीला मार्क्सने विरोध-विकासाचे तात्त्विक अधिष्ठान मिळवून दिले. (२) अतिरिक्त श्रममूल्यांचा (The Theory of Labour Surplus Value) सिद्धांत मांडून मजुरांचे भांडवलदारांकडून कसे शोषण होते आहे हे दाखवून देण्याचा प्रयत्न केला. (३) आर्थिक घटनांच्या आधारे मानवी इतिहासाची एक उपपत्ती लावून दाखविली. मार्क्स हा हेगेलचा एका अर्थाने विद्यार्थी होय. हेगेलने इतिहासाची उपपत्ती मांडताना सिद्धांत (Thesis) प्रतिसिद्धांत (Anti-thesis) व समन्वय (Synthesis) या तत्त्वांचा आधार घेतला. मार्क्सने याच सिद्धांताला विरोध केला. म्हणून मार्क्स अभिमानाने म्हणत असे हेगेलचा सिद्धांत डोक्यावर उभा होता, त्याला मी पायावर उभा केला. (I have turned Hegel upside down). मार्क्सने असे दाखवून दिले की प्रतिसिद्धांतामध्ये सिद्धांताच्या नाशाची बीजे आहेत. त्यातच समाजवादाच्या उदयाची बीजे आहेत असे मार्क्सला वाटत असे. मजुरांचे शोषण करणे ही भांडवलदारांची स्वाभाविक प्रेरणा असते. त्यांचे लक्ष्य नफा हेच असते. मजुरी कमी ठेवली तरच नफा वाढू शकतो. ही आर्थिक बाब मार्क्सने अतिरिक्त श्रम मूल्याचा सिद्धांत मांडून मार्क्सवादी तत्त्वज्ञानाला वैचारिक बैठक मिळवून दिली. मजुरांच्या संघटित होण्याला मार्क्सने महत्त्व दिले. मजुरांचे हित व भांडवलदारांचे हित परस्परविरोधी आहे हे मार्क्सने दाखवून दिले. भांडवलशाही अर्थव्यवस्थेमध्येच क्रांतीची बीजे आहेत असे मार्क्सचे मत होते. मार्क्सने आपल्या विचारसरणीला 'शास्त्रीय समाजवाद' (Scientific Socialism) म्हटले आहे. समाजामध्ये वर्ग कसे पडतात याचे मार्मिक विश्लेषण मार्क्सने केले आहे. समाजाच्या गरजा - अन्न, वस्त्र, निवारा इ. निर्माण करणारा एखादा वर्ग समाजात तयार होतो. त्या वर्गाच्या हातात उत्पादनाची साधने (Modes of Production) असतात, याद्वारे हा वर्ग समाजावर आपले वर्चस्व बसवितो. हा वर्ग मूठभर धनिकांचा असतो. इतर वर्गांकडे श्रमशक्ती असते पण पैसा नसतो अशांचा दुसरा वर्ग तयार होतो. अशा प्रकारे समाजामध्ये दोन वर्ग निर्माण होतात. मार्क्सच्या मते, मानवी समाजाची उत्क्रांती पुढील पद्धतीने होते.

१. प्राचीन साम्यवाद (Primitive Communism)

Scanned with ACE Scanner

२. गुलामगिरीचा कालखंड (Period of Slavery)
३. सरंजामशाहीचा कालखंड (The Age of Feudalism)
४. भांडवलशाहीचा कालखंड (The Age of Capitalism)
५. समाजवादी अवस्था (Socialistic Stage)

यापैकी पहिली अवस्था सोडली असता प्रत्येक काळात दोन वर्गांमधील संघर्ष अटळ असतो अशी मार्क्सची भूमिका आहे. गुलामगिरीच्या टप्प्यामध्ये किंवा सरंजामशाहीच्या काळात सरंजामदार व त्यांच्या जहागिरीमधील कुळे यांच्यामध्ये संघर्ष होतात. भांडवलशाहीच्या काळात मालक, कामगार असा संघर्ष आहे. म्हणून मार्क्सवादी तत्वानुसार 'इतिहास म्हणजे वर्गकलहाचा इतिहास होय.' मार्क्सने केलेले भाकीत 'राज्य विसरून जाईल व प्राचीन साम्यवाद' निर्माण होईल. हे मात्र पूर्णपणे खोटे ठरले आहे. वर्गव्यवस्था नष्ट होणार असा आशावाद त्याला वाटत असे. मार्क्सने असे प्रतिपादन केले की, ''ऐतिहासिक घटनांमागे व स्थित्यंतरामागे सर्वस्वी आर्थिक कारण असते'' हे विधानसुद्धा बदलत्या काळात टिकू शकत नाही. धर्म ही अफूची गोळी आहे असा मार्क्सचा आवडता सिद्धांत आहे. समाजाला पिळणारे लोक इतर शोषित वर्गाला धर्माची भीती घालतात व आपला स्वार्थ साधतात म्हणून धर्म हा अफूची गोळी आहे असे मार्क्सला वाटते. आंतरराष्ट्रीय अर्थकारणावरही मार्क्सवादाची 'शास्त्रीय' भूमिका आहे. कम्युनिस्ट जाहीरनाम्यात मार्क्सने ''जगातील कामगारांनो एक व्हा'' अशी हाक दिली आहे.

Scanned with ACE Scanner